सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ३७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |


डी आमची ई-पेपर आवृत्ती असून ही 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### शेअर बाजारांत पुन्हा घसरण



**मुंबई** : मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत गुरुवारी घसरण झाली. निर्देशांक २३६ अंकांनी घसरून ८१,२८९ वर, तर निफ्टी ५० निर्देशांक ९३ अंकांच्या घसरणीसह २४,५४८ या पातळीवर स्थिरावला. आजच्या व्यवहारात आयटी वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात बंद झाले. पुढील आठवड्यात अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपात होणार असल्याच्या अपेक्षेने आज आयटी शेअर्समध्ये तेजी राहिली. पण, देशांतर्गत महागाई आकडेवारीच्या आधी गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याने इतर क्षेत्रांमध्ये घसरण झाली. बीएसई मिडकॅप ०.५ टक्के आणि स्मॉलकॅप १ टक्के घसरला. सेन्सेक्सवर एनटीपीसी, हिंदुस्थान युनिलिव्हर, टाटा मोटर्स, मारुती, एलटी, एशियन पेंट्स, रिलायन्स हे शेअर्स १ ते ३ टक्क्यांपर्यंत घसरले.

### नोव्हेंबरमध्ये घटली किरकोळ महागाई

**नवी दिल्ली** : खाद्यान्न विशेषतः भाजीपाल्याच्या दरात घसरण झाल्याने नोव्हेंबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबरमधील ६.२१ टक्क्यांच्या तुलनेत घसरून ५.४८ टक्क्यांवर आल्याचे सरकारने गुरुवारी जारी केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जारी केलेल्या ग्राहक किंमत निर्देशांकानुसार, नोव्हेंबरमध्ये खाद्यान्नातील किमती घसरून ९.०४ टक्क्यांवर आल्या. ऑक्टोबरमध्ये खाद्यान्नातील किमती १०.८७, तर नोव्हेंबर २०२३ मध्ये ८.७० टक्के होत्या. नोव्हेंबरमध्ये भाजीपाला, डाळी आणि उत्पादने, साखर तसेच मिठाई, फळे, अंडी, दूध व उत्पादने, मसाले, वाहतूक, दळणवळण, वैयक्तिक निगेच्या वस्तूंमध्ये घसरण झाल्याने किरकोळ महागाईचा दर कमी झाला, असे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले. किरकोळ महागाई जुलै-ऑगस्ट दरम्यान सरासरी ३.६ टक्क्यांवरून सप्टेंबरमध्ये ५.५ टक्क्यांपर्यंत वाढली आणि ऑक्टोबरमध्ये ६.२ टक्क्यांपर्यंत गेली. सप्टेंबर २०२३ नंतर ती सर्वाधिक ठरली.

### तेलाची फोडणी आणखी महागणार!

**मुंबई** : सध्या खाद्य तेलाच्या भावात तेजी कायम आहे. सामान्य नागरिकांना भाजीच्या फोडणीला महागाईची झळ बसत आहे. विशेष म्हणजे, इतर देशांमध्ये पाम तेलाचा बायोडिझेलसाठी वापर वाढल्याने सोयाबीन तेलापेक्षा पाम तेलाचे दर अधिक झाले आहेत. हे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. मागील काही महिन्यांपासून खाद्य तेलाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. केंद्र शासनाने तेलावर २२ टक्के आयात शुल्क लावले, याशिवाय रशिया, मलेशिया येथून येणाऱ्या पाम तेलाची आवक घडली आहे. या देशांमध्ये पाम तेलाचा बायोडिझेल तयार करण्यासाठी वापर होत आहे. शिवाय, रशियाने सूर्यफुल तेलावरील निर्यात कर दुपटीने वाढविला आहे. त्यामुळे खाद्य तेलाचे भाव वाढत चालले आहेत. सोयाबीन तेलापेक्षा पाम तेल महाग झाल्याचे चित्र आहे.

### अक्षयकुमारच्या डोळ्याला दुखापत

**मुंबई** : हाऊसफुल ५ च्या शूटिंगदरम्यान गुरुवारी अक्षय कुमार जखमी झाला. एका क्शन सीक्वेन्सचे शूटिंग करत असताना सेटवर कुठली तरी वस्तू उसळली आणि त्याच्या डोळ्यावर आदळली. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, डोळ्याला दुखापत झाल्यानंतर लगेचच एका नेत्रतज्ज्ञाला चित्रपटाच्या सेटवर बोलावण्यात आले. अक्षयचा डोळा तपासल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मलमपट्टी केली. त्यांनी अक्षयला शूट न करण्याचा आणि आराम करण्याचा सल्ला दिला आहे. मार्च २०२३ मध्ये, बडे मियाँ छोटे मियाँ चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान, स्कॉटलंडमध्ये क्शन सीन शूट करताना अक्षय जखमी झाला होता. हाऊसफुल्लच्या सेटवर अक्षयला दुखापत झाली, हाऊसफुल्लच्या सेटवर अक्षयला दुखापत झाली, चित्रपटाचे शूटिंग अंतिम टप्प्यात आहे. अक्षयच्या दुखापतीमुळे चित्रपटाचे शूटिंग काही काळ थांबवण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा शूटिंग सुरू करण्यात आले. मात्र, अक्षयच्या सीनचे शूटिंग सध्या थांबवण्यात आले आहे.

# डी. गुकेश ६४ घरांचा राजा



◆ **सिंगापूर, १२ डिसेंबर**

**येथे आयोजित फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या १४ व्या व अंतिम फेरीच्या सामन्यात भारतीय ग्रॅण्डमास्टर १८ वर्षीय डी. गुकेशने विद्यमान विश्वविजेत्या चीनच्या डिंग लिरेनवर शानदार विजय नोंदवत जगज्जेतेपदाचा मान मिळविला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीसाठी गुकेशचे अभिनंदन केले आहे.**

डी. गुकेश हा १८ वा आणि सर्वांत तरुण-निर्विवाद शास्त्रीय बुद्धिबळ जगज्जेता ठरला. १४व्या डावात विजय मिळवल्यानंतर डोमराजू गुकेशला आपल्या कर्तृत्वाची जाणीव होऊन अश्रू अनावर झाले. गुकेशने लिरेनच्या ६.५ विरुद्ध आवश्यक ७.५ गुण मिळवले.

जागतिक विजेतेपद पटकावणारा तो महान विश्वनाथन् आनंदनंतरचा दुसरा भारतीय आहे. पाच वेळा विश्वविजेता असलेल्या आनंदने शेवटचा २०१३ मध्ये हा मुकुट जिंकला होता.

गुरुवारी गुकेशच्या पराक्रमापूर्वी रशियाचा दिग्गज गॅरी कास्पारोव्ह हा सर्वांत तरुण जागतिक बुद्धिबळ विजेता होता, जेव्हा त्याने वयाच्या २२ व्या वर्षी १९८५ मध्ये अनातोली कार्पोव्हला पराभूत करून विश्वविजेतेपद जिंकले होते. या वर्षाच्या सुरुवातीला कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा जिंकून गुकेशने जागतिक मुकुटासाठी सर्वांत तरुण आव्हानवीर म्हणून या स्पर्धेत प्रवेश केला होता. (वृत्तसंस्था)

## छत्तीसगडमध्ये चकमकीत सात नक्षलवाद्यांचा खात्मा

◆ **दंतेवाडा, १२ डिसेंबर**

दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवर गुरुवारी नक्षलवादी आणि सुरक्षा दलांची चकमक झाली. दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात सात नक्षली ठार झाल्याचे वृत्त आहे.

नक्षलविरोधी शोधमोहिमेत नारायणपूर, दंतेवाडा, जगदलपूर, कोंडागाव जिल्ह्यातील जिल्हा राखीव रक्षक, विशेष कृती दल आणि सीआरपीएफच्या जवानांचा सहभाग असलेले संयुक्त दल दक्षिण अबुझमाड परिसरात रवाना झाले होते. गुरुवारी पहाटे तीन वाजल्यापासून संयुक्त सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये अधूनमधून चकमक सुरू होती. नक्षलवाद्यांच्या गोळीबाराला पोलिसांना चोख प्रत्युत्तर दिले. आतापर्यंत सात नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. परिसरात चकमक आणि शोधमोहीम सुरू आहे, असे बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# 'एक देश एक निवडणूक' विधेयकाला केंद्राची मंजुरी

### • हिवाळी अधिवेशनात होणार सादर • जेपीसी गठित केली जाणार

◆ **नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

देशभरात लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकत्र घेण्याची तरतूद असलेल्या 'एक देश एक निवडणूक' विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी मंजुरी दिली. हे विधेयक संसदेच्या सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात सादर केले जाण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली, अशी माहिती उच्चस्तरीय सूत्रांनी दिली. हे विधेयक संसदेत सादर केल्यानंतर त्यावर विचारविनिमय करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती अर्थात जेपीसी गठित केली जाईल. यावर विविध राजकीय पक्षांचे मत विचारात घेतले जाईल आणि नंतर विधेयकाला अंतिम रूप दिले जाईल, असे सूत्रांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वीच माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने 'वन नेशन वन इलेक्शन' संदर्भातील अहवाल तयार केला होता. या अहवालात विधेयकाच्या बाजूने शिफारस करण्यात आली होती. सरकारने या शिफारशी मान्य केल्या होत्या.

सध्या देशभरात वेगवेगळ्या राज्यांमध्ये दरवर्षी कुठे ना कुठे निवडणुका घेतल्या जातात. यामुळे खर्चात वाढ होतेच; शिवाय तिथे सुरक्षा दलांचे जवान आणि पोलिसांना तैनात करण्याची अडचणींचाही सामना निवडणूक आयोगाला करावा लागायचा. सोबतच, आचारसंहितेमुळे विकास कामांवर परिणाम व्हायचा. हा सर्व प्रकार टाळण्यासाठी देशभरात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका घेण्याचा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षीच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणातून सादर केला होता. (वृत्तसंस्था)



#### नागरिकांचेही मत मागविणार

सरकार या विधेयकावर बुद्धिजीवी, विशेषज्ञ आणि सिव्हिल सोसायट्यांच्या सदस्यांसोबतच सर्वसामान्य नागरिकांचेही मत मागविणार आहे. यामुळे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत आणखी पारदर्शकता येण्यास मदत मिळणार आहे.



# ईव्हीएम मशिनच्या समर्थनार्थ राज्यातील पहिला ठराव मंजूर

### पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सदस्यांमध्ये एकमत



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ डिसेंबर -**

सध्या देशामध्ये आणि महाराष्ट्र राज्यांमध्ये चालू असलेल्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात वेगवेगळे मतप्रवाह सुरू आहेत. याबाबत अनेक ठिकाणी विरोध दर्शवित तक्रारी सुरू आहेत. मात्र पंढरपूर शहरालगत असलेल्या लक्ष्मीटाकळी ग्राम पंचायत सदस्यांकडून बैठकीत ईव्हीएम समर्थनार्थ एकमत झाल्याचे दिसून आले आहे. ईव्हीएम समर्थनाचा ठराव मंजूर करुन घेतलेली लक्ष्मीटाकळी ग्रामपंचायत राज्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सदस्याच्या बैठकीत ईव्हीएम मशीनच्या समर्थनार्थ आज गुरुवारी एकमुखाने ठराव करून घेतला आहे. या ग्राम पंचायती मध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सत्ता असून या ठिकाणी शिंदे गटाचे सरपंच संजय साठे व भाजपचे उपसरपंच संदीप भैय्या सोनवणे अशी महायुतीची सत्ता आहे . सध्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात चालू असलेले तक्रारी संदर्भात राज्यामध्ये प्रथमच लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतने ईव्हीएम मशीनच्या संदर्भात राज्यामध्ये पहिला ठराव एकमताने मंजूर केला आहे. यावेळी झालेल्या बैठकीसाठी सरपंच संजय साठे, ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे, नंदकुमार वाघमारे, नागरबाई साठे, आशाबाई देवकते, रेश्मा साठे, रोहिणी साठे, माजी उपसरपंच महादेव पवार, माजी सरपंच विजयमाला वाळके, समाधान देटे, सुरेखा खपाले ,शितल कांबळे, रुक्मिणी जाधव, गोवर्धन देठे यांच्यासह सर्व गावातील इतर नागरिक व ग्रामसेवक जयंतकुमार खंडागळे व कर्मचारी उपस्थित होते.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली आणि त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट म्हणून दिली. यानंतर फडणवीस यांनी राजनाथसिंह यांच्यासह अन्य नेत्यांच्याही भेटी घेतल्या (वृत्त पान ३ वर)

### वायुयान विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

**नवी दिल्ली** : भारतात विमानांची संरचना आणि □उत्पादन घेण्यात सुलभता व्हावी म्हणून संसदेत पारित करण्यात आलेल्या विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली. ९० वर्षे जुन्या एअरक्राफ्ट ॲक्टची जागा घेणारे भारतीय वायुयान विधेयक या महिन्याच्या सुरुवातीला संसदेत पारित करण्यात आले. या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे.

# भाजपा २०, शिवसेना १२, राकाँला १० मंत्रिपदे

### महायुतीच्या जागा वाटपाचे सूत्र ठरले!

◆ **नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची बुधवारी रात्री भेट घेतली. या भेटीत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. या बैठकीत महायुतीमधील कोणत्या पक्षाला किती मंत्रिपदे मिळावी, यावर निर्णय झाली. यानुसार भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला अनुक्रमे २०, १२, १० मंत्रिपदे या सूत्रावर शिक्कामोर्तब झाल्याचे समजते.

५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र, मंत्रिमंडळ विस्तार अजून बाकी असल्याने या पृष्ठभूमीवर महत्त्वाची बैठक दिल्लीत अमित शाह यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र मंत्रिमंडळातील खातेवाटपाचे आणि कोणाला किती मंत्रिपदे याविषयीचे सूत्र ठरवण्यात आल्याचे समजते. सूत्रांच्या मते, महाराष्ट्र मंत्रिमंडळ विस्तारात भाजपाकडे २० कॅबिनेट मंत्रिपद असण्याची शक्यता आहे. शिवसेनेकडे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडे १० मंत्रिपद असू शकतात. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील या काळात दिल्लीत होते आणि त्यांनीही भाजपा नेत्यांच्या भेटी घेतल्या. (वृत्तसंस्था)

#### शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार शक्य

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी १४ डिसेंबरचा मुहूर्त निश्चित मानला जात आहे. गृह खात्यासोबतच नगरविकास खातेही एकनाथ शिंदे यांना देण्यास भाजपाने नकार दिल्याने शिंदे अस्वस्थ असल्याचे कळते.

### जगभरात इंस्टाग्राम, फेसबुक तीन तास ठप्प

**नवी दिल्ली** : इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप आणि थ्रेड्स मेसेजिंग ॲपसारखे सर्व ॲप्स जगभरात सुमारे तीन तास बंद राहिले. जगभरातील हजारो वापरकर्त्यांनी याबद्दल तक्रार केली. आऊटेज ट्रॅकिंग वेबसाईटनुसार, फेसबुक ५० हजारांपेक्षा जास्त वापरकर्त्यांच्या फोनवर काम करुत नव्हते. त्याच वेळी, २३ हजारांवर वापरकर्त्यांनी इन्स्टाग्राम ठप्प झाल्याची तक्रार केली. युजर्सना मेसेज पाठवणे, पोस्ट करणे किंवा स्टेटस पोस्ट यात अडचणी येत होत्या.

# आजपासून दोन दिवस आकाशात उल्का वर्षाव

### खगोलीय घटनेचा आनंद घ्या : प्रभाकर दोड



◆ **अकोला, १२ डिसेंबर**

निरभ्र रात्री आकाशात अचानक एखादी प्रकाशरेषा क्षणार्धात चमकून जाते, ती उल्का असते. शुक्रवारी आणि शनिवारीदेखील अवकाशात उल्का वर्षाव होणार असून, खगोलप्रेमींसाठी ही पर्वणी ठरणार आहे. आकाशातील या घटनेचा आनंद घेण्याचे आवाहन येथील विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी केले आहे.

सरत्या वर्षात अनेक खगोलीय घटना अनुभवता आल्या आहेत. यात चंद्रग्रहण, सूर्यग्रहण यांचा समावेश आहे. वर्षाच्या शेवटी डिसेंबर महिन्यात उल्का वर्षाव पाहता येणार आहे. सूर्यकुलाचेच घटक असलेले धूमकेतू, ग्रह, लघुग्रह किंवा उपग्रहांदीचे कण भ्रमण कक्षेत विखुरलेल्या स्वरूपात असतात, अशी माहिती त्यांनी दिली.

पृथ्वी या लहान-मोठ्या कणांजवळून फिरते, तेव्हा या वस्तू गुरुत्वाकर्षणाने ओढल्या जातात. वातावरणात घर्षणामुळे ते कण पेट घेतात. त्यांच्या उंची व घटकांप्रमाणे लाल, पिवळ्या, पांढऱ्या व निळ्या रंगात चमकताना दिसतात. बहुतांश उल्का वातावरणातच नष्ट होतात. अपवादात्मक एखादी पूर्णांशाने न जळता पृथ्वीवर येऊन आदळते. त्याला अशनी असे म्हणतात, असे प्रभाकर दोड म्हणाले.

१३ आणि १४ डिसेंबरच्या रात्री फेथेन लघुग्रहाचे कण उल्कांच्या रूपात पडताना पाहता येतील. आदर्श स्थितीत सरासरी ताशी १२० या प्रमाणात या उल्का पडतील. हे दृश्य पाहण्यासाठी अधिक अंधाराच्या भागातून कमी प्रदूषित जागा अधिक सोयीची ठरणार आहे. हेमंत ऋतूतील गुलाबी थंडीत मिथुन राशीतील उल्का वर्षाव पूर्वेच्या समृद्ध आकाशात रात्री ९ नंतर सुरू होऊन पहाटेपर्यंत वाढत्या संख्येने बघता येईल, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.

**तारा कधीच तुटत नाही**

अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करताना क्षणार्धात एखादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपण पाहतो. या घटनेस 'तारा तुटला' असे म्हटले जाते; परंतु, तारा कधीच तुटत नाही. ही एक खगोलीय घटना आहे व यालाच 'उल्का वर्षाव' म्हणतात. (तभा वृत्तसेवा)

#### पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राजवळ उल्कांचे उगमस्थान

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राजवळ उल्कांचे उगमस्थान असल्याने त्याची तेजस्विता काहीशी कमी दिसेल. त्याचे दर्शन शांत, निवांत घेणे सोयीचे होईल. दोन्ही दिवशी पहाटे अंतराळ संशोधन केंद्र अर्थात् फिरत्या चांदणीचा आकाश नजारा १३ डिसेंबरला ६.०९ ते ६.१५ या वेळेत पश्चिम ते उत्तर बाजूस तर १४ डिसेंबरला पहाटे ५.२४ ते ५.२६ या वेळेत उत्तर आकाशात पाहता येईल, असे दोड यांनी सांगितले.

# सीई-२० क्रायोजेनिक इंजिनची यशस्वी चाचणी

### इस्रोने गाठला महत्त्वाचा टप्पा



◆ **बंगळुरू, १२ डिसेंबर**

सीई-२० क्रायोजेनिक इंजिनची वातावरणीय परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. यात इंजिन पुन्हा सुरू करण्याचे वैशिष्ट्य आहे, अशी माहिती इस्रोने गुरुवारी दिली. या माध्यमातून इस्रोने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

हे यश भविष्यातील मोहिमांसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचे इस्रोने सांगितले.

इस्रोने २९ नोव्हेंबर रोजी तामिळनाडूच्या महेंद्रगिरी येथील संकुलात सीई-२० क्रायोजेनिक इंजिनची समुद्रसपाटीवरील उष्ण चाचणी यशस्वीरीत्या पार पाडली, ज्यात १०० नोझल गुणोत्तर क्षेत्र आहे, असे अंतराळ संस्थेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

सीई-२० क्रायोजेनिक इंजिन तरल प्रणोदन यंत्रणा केंद्राने विकसित केले असून, ते प्रक्षेपण वाहन मार्क-३ अर्थात् एलव्हीएम-३ ला बळ देणार आहे. हे इंजिन १९ टन थर्स्ट लेव्हलवर काम करण्यास पात्र ठरले आहे, असे इस्रोने सांगितले. या इंजिनने आतापर्यंत सहा एलव्हीएम-३ मोहिमांसाठी वरच्या टप्प्यावर यशस्वीपणे बळ दिले आहे.

२० टनच्या थर्स्ट लेव्हलसह अलिकडेच हे इंजिन गगनयान मोहिमेसाठीही पात्र ठरले आहे. एलव्हीएम-३ प्रक्षेपण वाहनाची वहनक्षमता वाढवण्याच्या दिशेने भविष्यातील टप्प्यासाठी यात २२ टन थर्स्ट लेव्हलची वाढ केली, असे इस्रोने सांगितले. गगनयान ही इस्रोची पहिली मानवी अंतराळमोहीम आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बाजार समितीची निवडणूक दोन महिने पुढे जाण्याची शक्यता

## मतदार यादीची मुदत आली संपुष्टात; नव्याने तयार होणार मतदार यादी?

### स्थानिक नेते मंडळींची तयारी जोरदार; कार्यकर्त्यांकडून चाचपणीही सुरु

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

विधानसभा निवडणुकीनंतर आता वेध महापालिका, बाजार समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे लागले आहेत. सद्य:स्थितीत सोलापूर महापालिका आणि बाजार समितीच्या निवडणुकीसाठी शहर जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळी आत्तापासूनच सरसावले आहेत. सत्ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडी यांच्यातच खरी लढत असणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी बाजार



समितीच्या निवडणुकीसाठीची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु विधनाभा निवडणुकीमुळे बाजार समितीच्या निवडणुकीला ३१ डिसेंबर पर्यंत स्थगिती देण्यात आली होती. आता बाजार समितीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला असला तरी, बाजार समितीच्या मतदार यादीचा प्रश्न प्रशासनासमोर उभा ठाकला आहे. कायद्याच्या तरतुदीनुसार कोणत्याही निवडणुकीची मतदार यादी तयार करताना सहा महिन्याचा कालावधीचा विचार केला जातो. दर सहा महिन्यांच्या कालावधीतनंतर नवीन मतदार यादी बनविण्याचे कामकाज केले जाते. त्यानुसार मृत, किंवा स्थलांतरित नागरिकांची नोंद घेऊन अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येते.

दरम्यान, जेव्हा बाजार समितीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी बनविण्यात आली तेव्हा ती सहा महिन्याच्या कालावधीतील होती. मात्र त्यानंतर बाजार समितीच्या निवडणुकीला स्थगिती देण्यात आली. त्यामुळे मतदार यादीची सहा महिन्याची मुदत संपली आहे. आता पुन्हा नव्याने मतदार यादी तयार करणार का? का अगोदरच्या मतदार यादीवरच निवडणूक घेणार आहे. हा प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. वास्तविक पाहता, दि. १ जून ते २ डिसेंबर रोजीचा सहा महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे त्यामुळे बाजार समितीच्या निवडणुकीसाठी पुन्हा नव्याने मतदार यादी बनविण्याचे काम सुरू केले जाते का हे पाहणे आवश्यक बनले आहे. जर नवीन मतदार यादी बनवण्याचे कामकाज हाती घेतले तर, निवडणुकीसाठी आणखीन एक ते दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे बाजार समितीच्या निवडणुका या फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात होऊ शकतात असा अंदाज आता वर्तवला जात आहे.

> **नव्याने मतदार यादी बनवण्याचे कामकाज होऊ शकते**
>
> कायद्याच्या तरतुदीनुसार कोणत्याही निवडणुकीसाठी सहा महिन्यांच्या कालावधीनंतर नवीन मतदार यादी केली जाते. जुन्या मतदार यादीतील मतदारांची नावे तपासली जातात. त्यानंतर सदरची मतदार यादी अपडेट होते. नियमानुसार सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला असल्याने, मतदार यादी बनवण्याचे कामकाज होऊ शकते. मात्र नवे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानंतर यावर निर्णय होईल. अशी शक्यता आहे.
>
> **- मोहन निंबाळकर,**
> पणन उपसंचालक तथा प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

# दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये कर्तृत्व दाखवण्याची क्षमता : कोहिनकर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

कोणी धावले तर कोणी जागेवर उभा राहून लांब उडी घेतली. कोण पोहचले तर कोण दिव्यांगत्वावर मात करून स्पर्धेत जिंकण्याच्या आव्हानांना आव्हान देत स्वत:मधील क्रीडा नैपुण्य सिद्ध करीत होते जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व दिव्यांग कल्याण विभागाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत तब्बल ९३० दिव्यांग विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या हस्ते हेलन केलर व लुई ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले, नरेंद्र खराडे, शशिकांत ढेकळे, नॅबचे सचिव शशिभूषण यलगुलवार, दिव्यांग संस्था चालक चित्रसेन पाथरुट, राजकुमार पाटील, अरुण धोत्रे, रामचंद्र कुलकर्णी, समीर तडवळकर यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला राज्य स्तरावर क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविले.

# पंचमहाभूतांकडून सृष्टीकडे पाहण्याचा समान दृष्टिकोन शिकलो : कलढोणे

### जैन गुरुकुलमध्ये सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर**



पंचमहाभूतांकडून केवळ माणसाकडेच नव्हे तर सृष्टीकडे पाहण्याचा समान दृष्टिकोन शिकलो. पृथ्वीकडून पाय जमिनीवर असावेत, आकाशाकडून उंची कशी असावी? अग्नीकडून तेज, वायूकडून चपळता तर पाण्याकडून अडेल तेथे वाट काढण्याची प्रवृत्ती या गोष्टी शिकल्याचे संगीत विभागप्रमुख दीपक कलढोणे यांनी सांगितले. श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील संगीत शिक्षक कलढोणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. भूतपूर्व सचिव भाऊसाहेब गांधी, विद्यमान सचिव डॉ. रणजित गांधी यांच्याप्रती आदर व्यक्त करून कलढोणे यांनी आपल्या नियुक्ती ते निवृत्तीपर्यंतचा प्रवास यावेळी उलगडून सांगितला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक राजकुमार काळे हे होते.

यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, प्रा. जवाहर चोथे, एअर इंडियाचे निवृत्त आर्टिस्ट नारायण तारळेकर, गोरखनाथ व विजया कलढोणे, बालक मंदिर विभागप्रमुख विभावरी रणदिवे व आप्तेष्ट, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी तांत्रिक विभाग प्रमुख राजेश महोळकर व नृत्यविभागप्रमुख तृप्ती दुर्गे व विद्यार्थिनी साक्षी रोकडे यांची समयोचीत भाषणे झाली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिलिंद खोबरे यांनी केले तर सत्कारमूर्तींचा परिचय प्रीती काळेगोरे यांनी करुन दिला. यानंतर 'गुरुकुल स्वरमंच' मधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. २९ वर्षे ४ महिने सेवा पूर्ण करीत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीप्रीत्यर्थ दीपक कलढोणे व त्यांच्या सुविद्य पत्नी मनीषा कलढोणे यांचा प्रशाला व संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी सर्व विभागाकडून विद्यार्थी प्रतिनिधींनीही श्रीफळ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी कलढोणे यांची कन्या निरंजनी कलढोणे यांनी वडिलांनी केलेले संस्कार व आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या भगिनी ज्योती चोथे यांनी सत्कारमूर्तींच्या सेवाभावी वृत्तीत जीवन जगणे हे शिक्षकाचे कर्तव्य कलढोणे यांनी निष्ठेने पार पाडल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक काळे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.



# आ. विजयकुमार देशमुखांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे

### मार्कंडेय महामुनींना घातले साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून पाचव्यांदा आमदारपदी विराजमान झालेले माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांना राज्याच्या मंत्रीमंडळात संधी मिळावी आणि त्यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती व्हावी यासाठी पद्मशाली समाजाच्या वरिष्ठ नेते मंडळी, समाज बांधवांनी एकत्र येऊन भगवान मार्कंडेय देवांना साकडे घातल्याची माहिती अंबादास गोरंटला यांनी आज (दि. १२) दिली.

पाचव्यांदा निवडून आलेले आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते पद्मशाली समाजाचे कुलदैवत भगवान मार्कंडेय महामुनी यांचे पूजन करण्यात आले आणि मंत्रीमंडळात स्थान मिळावे यासाठी भगवान मार्कंडेय चरणी आ. विजयकुमार देशमुख यांनीही प्रार्थना केली. यावेळी पद्मशाली ज्ञाती संस्था अध्यक्ष सुरेश फलमारी, दत्तात्रय बडगू, गोपीकुष्ण वड्डेपल्ली, मेघनाथ येमुल, अंबादास बिंगी, विजय मद्दा, सत्यनारायण गुर्रम, सदानंद गुडेटी, पुरूषोत्तम पोबत्ती, पांडुरंग दिडडी विजय चिप्पा, विजय इप्पाकाईल, अंबादास गोरंटला, सुधाकर नराल, यादगीरी बोम्मा,नरेश दासरी, उमेश मामड्याल, नागेश गंजी, आनंद गोसकी, नागेश कटकम, लक्षण सिंगराल, अनिल वंगारी, श्रीनिवास सिद्राल, विनोद केंजरला, महेश इंजामुरी, राजू गुजर, हणमंतू श्रीराम,पवन कल्याण फॅन्स असोसिएशन सोलापूर जिल्हाध्यक्ष नागराज कटकम, उपाध्यक्ष नरेंद्र बल्ला, लक्ष्मीकांत सिगराल, वृंदा वडलाकोंडा, अंबादास कोंगा, लक्ष्मण दावत,शेखर इगे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# होनसळच्या रेवतीला ट्रम्पकडून लॅपटॉप

### अमेरिकेच्या उद्योगपतीचे दातृत्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**



अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील प्रसिद्ध उद्योगपती मायकल हाऊस ट्रम्प यांनी आधुनिक पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी होनसळ येथील रेवती पवार हिला अमेरिकेमधून डेल कंपनीचा लॅपटॉप पाठवला आहे.

लॅपटॉप रेवतीने उत्तर सोलापूर तालुका पोलीस स्टेशनच्या वतीने स्वीकारला. रेवती हिने मायकल हाऊस ट्रम्प यांच्या पत्नीच्या स्मृतीप्रित्यर्थ काही शाळात शालेय साहित्य वाटप केले होते. ही वार्ता ट्रम्प यांना कळताच त्यांनी तिचे सामाजिक कार्य पाहून हा लॅपटॉप पाठविल्याचे नेताजी पवार यांनी सांगितले. यावेळी उपसरपंच बापूसाहेब खेडकर, बालाजी चिंचोळ, ग्रा. पं. सदस्य सूर्यकिरण भोसले, राळेरासचे पोलीस पाटील आकाश कांबळे, द्राक्ष बागायतदार मकसूद शेख आणि विश्रांतवाडी पुणे येथील सचिन शिरसाट हे उपस्थित होते. हा लॅपटॉप उत्तर सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे गोपनीय शाखेचे प्रमुख सचिन मागाडे, सपोनि गोपाळराव साखरे यांनी दिला.

# खराब कांद्याची जास्त आवक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची विक्रमी आवक सुरूच आहे. बुधवारीही ४०६ ट्रकमधून तब्बल ४२ हजार ४३५ क्विंटल कांदा विक्रीसाठी आला होता. तर गुरुवारी देखील ४२ हजार ००४ क्विंटल कांदा आवक झाली. त्यात ओल्या व खराब झालेल्या कांद्याचे प्रमाण अधिक होते.

त्यामुळे कांद्याच्या दरात दररोज घसरण होत आहे. सद्या कांद्याला घाऊक दर हा कमीत कमी ५०० प्रती क्विंटल तर जास्तीत जास्त ६००० प्रती क्विंटल आणि सर्व साधणार दर हा २७०० प्रती क्विंटल इतका राहिला. दरम्यान, महाराष्ट्रासह आंध्र, तेलंगण व कर्नाटकातून खरीप व लेंट खरीप हंगामातील कांद्याची आवक सुरू आहे. बाजार समितीत दररोज सरासरी ३५ ते ४० हजार क्विंटल कांद्याची आवक होत आहे.

> **किरकोळ बाजारातील दरात तफावत**
>
> सोलापूर बाजार समितीत कांद्याला सरासरी ३५ तर उच्चांकी ७५ रूपयांचा दर आहे. किरकोळ बाजारात मात्र जादा दराने विक्री होत आहे. चांगल्या प्रतीचा कांदा प्रती किलो १०० रूपये तर सरासरी ३५ रूपये दराचा कांदा ५० रूपयांनी किरकोळ बाजारात विकला जात आहे.
>
> **- शीला दीक्षित, गृहिणी**

# मोफत गणवेश योजनेचा बोजवारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

समग्र शिक्षा अभियान व राज्य शासनामार्फत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत स्वरुपात दोन गणवेश देण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आली होती. मात्र, यंदाचे शैक्षणिक वर्ष शेवटच्या टप्यात असून अद्याप विद्यार्थी स्काऊट ॲन्ड गाईडच्या गणवेशापासून विद्यार्थी वंचित आहेत. तालुकानिहाय विद्यार्थी संख्या संकलित करण्याचे काम अद्याप सुरु असल्याने पुढील आणखी एक ते दीड महिना सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळण्याबाबत साशंकताच आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात सोलापूर जिल्ह्यात विद्यार्थी गणवेश वाटप योजनेचा बोजवारा उडाला आहे. विद्यार्थ्यांना दोन गणवेश शासनस्तरावरून देण्याचा निर्णय झाला. पहिला गणवेश मिळण्यासाठी जवळपास सप्टेंबर महिना उजाडला होता. बहुतांश विद्यार्थ्यांनी जुना गणवेशमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा केलेलात्यासंदर्भात ओरड सुरु झाल्यानंतर गणवेश वाटप करण्यात आले. पण, त्यानंतरही ते अनेक विद्यार्थ्यांच्या मापानुसार मिळाले नव्हते. काहींना खूप लांब, काहींना अखूड, विद्यार्थिनींना ड्रेसवरील ओढणी न मिळणे अशा तक्रारींचे प्रमाण अधिक होते. यामुळे पहिल्या शैक्षणिक सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या मोफत गणवेश योजनेचा बोजवारा उडालेला दिसत आहे.

> **कापड आले, विद्यार्थी संख्येचे एकत्रीकरण सुरु**
>
> **स्काऊट गाईड गणवेशाचे कापड शासनाकडून पुरवठा झाला असून बचत गटाकडून शिवून देण्यात येणार आहे. विद्यार्थी संख्येची आकडेवारी घेण्याचे काम सुरु आहे, इतर ठिकाणी शिलाई सुरु आहे. पण, कोणत्याही तालुक्यात गणवेशाचे वाटप झालेले नाही. येत्या दोन दिवसांमध्ये त्यासंदर्भातील सविस्तर माहिती देण्यात येईल.**
>
> **-सोमनाथ लामगुंडे, व्यवस्थापक,**
> **महिला आर्थिक विकास महामंडळ**

# राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेत्यांचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**



१९ व्या राष्ट्रीय एरोबिक्स स्पर्धा २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर शिर्डी येथे पार पडलेल्या स्पर्धेत विविध १५ राज्यातील ८७५ खेळाडू सहभागी झाले होते. विविध गटात व विविध प्रकारात ही स्पर्धा घेण्यात आली.

महाराष्ट्र संघास सर्वसाधारण प्रथम क्रमांक मिळाला. महाराष्ट्र संघात सोलापूरातील स्ट्रिमलाईन अकॅडमीकडून ९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. वृंदा बोध्दूल व स्वरा गणेर यांनी मुलींच्या १४ वर्ष खालील गटात राष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले. त्याचबरोबर ११ वर्षांखालील मिक्स ग्रुपमधे हिर गाला, ध्रुव वाघमारे, शौर्या साळुंके, पर्यूल दोशी, अनुष्का चव्हाण, विरंश भंडारी, प्रिषा कुलकर्णी आदी खेळाडूंनी कास्यंपदक पटकावले. या सर्व राष्ट्रीय पदक विजेत्यांचा सत्कार सोहळा सोलापूर ऑफिसर्स क्लब येथे महसूल विभाग जिल्हाधिकारी अमृत नाटेकर, माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार अंकुश चव्हाण, मनोरमा बँक अध्यक्ष श्रीकांत मोरे, मनोरमा मल्टी स्टेट अध्यक्ष शोभा मोरे, स्पोटर्स पॅव्हेलियन अध्यक्ष प्रकाश भुतडा, बॉस्केटबॉल असोसिएशन अध्यक्ष कॅप्टन शफी, प्रशिक्षक डॉ. मोहिनी मोरे, शिवबा संस्था अध्यक्ष निरंजन बोध्दूल यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन अनघा वडजे यांनी केले. बिजल वनिशांत गाला, पल्लवी व सचिन गानेर, स्वाती व देवदत्त वाघमारे, हर्षदा व अभिजीत सांळुके, डॉ.प्रियल, अमेय दोशी, मनिषा व अंकुश चव्हाण, स्नेह व परिमल भंडारी, ज्योती व राजेश कुलकर्णी, राहूल झिपरे, लखन बोध्दूल, सतीश जगताप आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### संत बुरुड केतेश्वरांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर शहर बुरुड समाजाच्यावतीने सोलापूर महापालिकेत संत बुरुड केतेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटक बुरुड समाज महिला आघाडीच्या अध्यक्षा व नगरसेविका मेनका कोरडे (बेळगाव) उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शहर बुरुड समाजाचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी महापालिकेच्या नगर अभियंता सारिका आकुलवार उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संत बुरुड केतेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. संघटनेचे कार्याध्यक्ष विठ्ठल साळुंके यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष सूर्यकांत शेंद्रे यांनी प्रास्ताविक केले तर जिल्हा प्रतिनिधी विष्णू साळुंके यांनी आभार मानले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस नवनाथ सुरवसे यांचे भाषण झाले. कुमारी अनुष्का शिवानंद वडतिले या चिमुकलीने भाषण करुन वाहवा मिळविली. कार्यक्रमास संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश शेंद्रे, जिल्हा सहचिटणीस भारत वडतिले, शहर संघटनेचे संघटक पंडित वडतिले, सरचिटणीस अरुण साळुंके, खजिनदार नितीन वडतिले, सहखजिनदार मारुती साळुंके, रोहित कुकडे, राम मोरे, मनोज कुकडे तसेच रामचन्द्र जतकर, प्रशांत रोहिटे, गंगाराम वडतिले, शंकर रोहिटे, विलास रोहिटे, शुभम वडतिले, योगेश वडतिले, शुभम वडतिले, सत्यम वडतिले, शिवानंद वडतिले, युवराज सुरवसे, सोलापूर जनता बँकेच्या अधिकारी संगीता वडतिले, नागनाथ वाडकर, रेणुका वडतिले, सारिका मोरे, रेणुका शेंद्रे, ज्योती वडतिले, पूजा रोहिटे, कविता वडतिले उपस्थित होते.कार्यक्रमानंतर सिद्धेश्वर मंदिर परिसरातील गरिबांना मिठाई वाटण्यात आली.



### परभणी येथील घटनेचा भिमशक्ती संघटनेच्यावतीने सोलापुरात निषेध

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील संविधानाची प्रतिकृती मंगळवारी एका इसमाने नियोजित जागेवरती असलेली प्रतिकृती एक इसमाने काढल्याने भिमप्रेमी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याची भावना दुखावल्या. हे केलेले कृत्य निंदणीय व संतापजनक असून त्याचा भिमशक्ती सामाजिक संघटनेच्यावतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. त्या इसमावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष मिलिंद प्रक्षाळे, राज्य उपाध्यक्ष नागेश बंगाले, सचिव संजय रणदिवे, डॉ. सतीश खारवे, विलास सरवदे, लतिफ नदाफ, आदम बागवान, अशपाक शेख, अभिलाष चंदनशिवे, सुदर्शन जानराव, नागनाथ कांबळे, संदीप वाघमारे, रोहन मिसाळ, पप्पू गायकवाड, अण्णासाहेब प्रक्षाळ, बबलू शेरखाने, निखिल चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे, संदिपान सोनवणे, नागनाथ शरवणे, प्रभाकर तुपारे, रमेश गायकवाड उपस्थित होते.



### गट्टी फंड सेवा संघम् संस्थेच्या सुवर्ण महोत्सवाला दीपोत्सवाने प्रारंभ

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाज अंतर्गत असलेल्या सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम या संस्थेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव समाजाची कुलदैवत श्री चौडेश्वरी मंदिरात दिपोत्सवाने शुभारंभ झाला. सुरूवातील कन्ना चौक येथील चौडेश्वरी मंदिर हार-तुरे फुले व रांगोलीने सजावट करुन श्री चौडेश्वरी मातेचा विधीवत पुजा व होमहवन करण्यात आले. समाज अध्यक्ष नागनाथ कोंतम, सोमवार पेठ गट्टी फंडीचे मानकरी रमेश गट्टी, रामचंद्र पुडूर, श्री चौडेश्वरी पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल बडगंची, महिला मंडल अध्यक्ष सरस्वती सोमनाथ, युवक संघटना अध्यक्ष दत्तात्रय बडगंची, शिक्षण संस्था अध्यक्ष सुभाष चिलवेरी आदी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली. याकामी सोमवार पेठ गट्टी फंड व महिला मंडल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास फंड अध्यक्ष मोहन पोसा, अरविंद पुडूर, तुकाराम गट्टी, श्रीनिवास पुरुड, विलास चिंता तसेच नागनाथ मायकुंटे आदी मान्यवर उपस्थित होते.

### पोलिस उपनिरीक्षक पदासाठी वयोमर्यादा वाढवण्याची भीमशक्ती संघटनेची मागणी

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

पोलिस उपनिरीक्षक पदासाठी वयोमर्यादा वाढवावी आणि पदसंख्याही वाढवावी, अशी मागणी भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यामार्फत राज्य शासनाकडे केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एपीएससी अराजपत्रात गट ब व क जाहिरात फेब्रुवारी महिन्यात येणे अपेक्षित होते मात्र ती ९ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिध्द झाली. या जाहिरासाठी बराच कालावधी गेल्याने अनेकांची वयोमर्यादा ओलांडली आहे. त्यामुळे त्यांना अर्ज करता आले नाहीत. ही जाहिरात लोकसभा, विधानसभा निवडणुका, आरक्षण वर्गवारीमुळे लांबविण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेबाबत हिरमोड झाला आहे. यामुळे पोलिस उपनिरीक्षक पदासाठीची वयोमर्यादवा वाढवून जागाही वाढविण्यात याव्यात. हे निवेदन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने प्रदेश सचिव संजय रणदिवे यांनी दिले आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे येणार एकत्र?

## संजय शिरसाट म्हणाले आम्हाला वाटून काय उपयोग? टाळी दोन्ही हातांनी वाजण्याची गरज

मुंबई

शरद पवार व अजित पवार यांच्या भेटीमुळे पवार कुटुंबात मनोमिलनाचे पर्व सुरू झाल्याची चर्चा आहे. त्यानंतर आता शिवसेनाही त्याच मार्गाने पुढे जाण्याची शक्यता वाढली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी यासंबंधी एक महत्त्वाचे विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन्ही बाजूने टाळी वाजत आहे. तसे शिवसेनेतही कुणीतरी टाळी देण्यास तयार हवे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या वाढदिवसानिमित्त भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांत जवळपास अर्धा तास चर्चा झाली. या भेटीविषयी राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या असताना आता शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी तुटलेले नाते कसे जोडावे हे शरद पवारांकडून शिकण्यासारखे असल्याचे म्हटले आहे. एकप्रकारे त्यांनी उद्धव ठाकरे यांनाच उद्देशून हे विधान केल्याचा दावा केला जात आहे.

संजय शिरसाट गुरुवारी 'झी २४ तास'शी शरद व अजित पवारांच्या भेटीवर भाष्य करताना म्हणाले की, ते एकत्र आले तर शिवसेना त्यांचे अभिनंदनच करेल. आम्हाला काय प्रॉब्लेम आहे. आम्ही भांडण लावणारे नाही तर जोडणारे लोक आहोत. नाते जोडणे हे शरद पवारांकडून शिकावे. यावेळी पत्रकाराने त्यांना तुमच्यात म्हणजे शिवसेनेत असे व्हावे असे वाटत नाही का? असा प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले की, आम्हाला वाटून काय उपयोग? टाळी दोन्ही हातांनी वाजण्याची गरज आहे. त्यांच्या (राष्ट्रवादी) टाळ्याही वाजतात व गळ्यात हारही घालतात. आमचे सोडून द्या, पण ते एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे.



त्यांच्या या विधानंतर पत्रकाराने तुम्ही टाळी देण्यास तयार आहात का? असा उलटप्रश्न केला. त्यावर आम्ही काय करू हे नंतरचा भाग आहे. आज शरद पवारांचा दिवस आहे, त्यामुळे आपण त्यावरच बोलू, असे संजय शिरसाट म्हणाले. संजय शिरसाट यांच्या 'टाळी दोन्ही हातांनी वाजण्याची गरज आहे', या विधानामुळे आता एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे आपसातील कटुता विसरून एकत्र येणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**शिंदे गटानेच अजित पवारांकडून ज्ञान घ्यावे : सचिन अहिर**

दुसरीकडे, ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर यांनी याविषयी सावध प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, आमचे हात कापण्यास निघालेले लोक आता टाळीची भाषा करत आहेत. राजकारणात संकुचित भूमिका घेऊन चालत नाही. राजकारणात संस्कृती व नाती जपावी लागतात. पण जे लोक सर्वच नाती तोडून व पाठीत खंजीर खूपसून गेलेत, त्यांच्या विषयी असा विचार करणेही शक्य नाही. पण राजकीय संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम अजूनही आमच्याकडून होते. त्यांनी (शिंदे गट) आम्हाला कुणाकडून शिकण्याचा सल्ला देऊ नये. तेच सत्तेत अजित पवार यांच्या बाजूला बसलेत. त्यामुळे त्यांनीच त्यांच्याकडून जेष्ठता विशेषतः ज्यांच्याकडून आपण घडलो त्याची जाणीव कशी ठेवावी याचे ज्ञान घ्यावे. सध्या ते त्यांच्या मांडीला मांडी लावून बसल्यामुळे त्यांचा सल्ला ते लगेच आत्मसात करतील अशी अपेक्षा आहे, असे सचिन अहिर यांनी म्हटले आहे.

# अमित शहांनी घेतली शरद पवारांची भेट

## भाजप नेते म्हणाले पवार महायुतीत आले तर आनंदच

**नवी दिल्ली**

अजित पवार यांनी आज सकाळी शरद पवार यांची निवासस्थानी भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर आता सायंकाळी भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील शरद पवार यांची निवासस्थानी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा की, भेटीमागे काही वेगळे राजकारण आहे का? अशा चर्चांना सध्या सुरुवात झाली आहे. तर शरद पवार महायुतीत येत असतील तर त्याचा आम्हाला आनंदच होईल, असे भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी या भेटीवर प्रतिक्रिया देताना म्हटले.

शरद पवार यांचा आज ८४ वा वाढदिवस आहे. देशातील विविध क्षेत्रातील मान्यवर शरद पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करीत आहेत. आज सकाळीच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रातील विविध मंत्री पवार यांना शुभेच्छापर संदेश पाठवीत होते. या दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी शरद पवार यांची सहकुटुंब आणि पक्षाच्या नेत्यांसह भेट घेतली होती. त्यानंतर आता अमित शाह यांनी देखील भेट घेतली आहे. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अमित शाह ६ जनपथवरती दाखल झाले. खासदार सुप्रिया सुळे यांनी अमित शाह यांचे स्वागत केले. काहीच मिनिटांत अमित शाह आणि पवार यांची भेट झाली. अमित शाह यांनी पुष्पगुच्छ देऊन पवार यांचा सत्कार केला तसेच निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. दरम्यान, शरद पवार यांचा आज वाढदिवस असल्यामुळे ही भेट झाली असावी, असा अंदाज काढला जात आहे. मात्र, भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, जर शरद पवार महायुतीत येत असतील तर त्याचा आम्हाला आनंदच होईल.

**आशीर्वाद घेतला : अजित पवार**

अजित पवार यांच्यासोबतच खासदार सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे, पार्थ पवार हे देखील शरद पवार यांच्या निवास्थानी शुभेच्छा देण्यासाठी पोहोचले होते. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर शरद पवार यांचा आर्शीवाद घेण्यासाठी आलो.आज शरद पवार तर उद्या काकींचा वाढदिवस असतो. त्यामुळे त्यांचे आर्शीवाद घेतले असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

**आमच्या कुटुंबाने पातळी सोडली नाही : पवार**

अजित पवार आणि शरद पवार यांची भेट ही कौटुंबिक होती. आमच्या कुटुंबाने कायमच राजकारण वेगळे ठेवले असल्याचे युगेंद्र पवार यांनी म्हटले आहे. आम्ही एकमेकांविरोधात कधीही खालच्या पातळीवर टीका केली नसल्याचेही पवार यांनी म्हटले आहे.

# एनआयएची महाराष्ट्रासह पाच राज्यांत छापेमारी

## 'जैश'चा तरुणांना कट्टरवादी बनवण्याचा कट

◆ **नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

प्रतिबंधित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदने तरुणांना कट्टरवादी बनवण्याचा तसेच दहशतवादी प्रचार राबवण्याच्या कटाचा तपास करताना राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने महाराष्ट्र, आसाम, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि उत्तरप्रदेश या पाच राज्यांतील १९ ठिकाणांवर छापेमारी केली.

जम्मू-काश्मिरात अनंतनागच्या बामझू मट्टन, बारामुल्लातील क्रीरी आणि बडगाममधील खानसाहिब येथे छापेमारी करण्यात आली. गुजरातमध्ये अहमदाबाद ग्रामीण पोलिसांच्या मदतीने सानंद गावातील ऑनलाईन कट्टरवादी संघटनेचा सदस्य आदिल वेपारीच्या घरावर छापेमारी केली. आदिल बनासकंठा जिल्ह्यातील चेखला गावातील मदरशात काम करतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.

झाशी येथे स्थानिर मदरसा चालवणाऱ्या मुफ्ती खालिदवर छापेमारी करण्यात आली. लोकांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर त्यांनी येथे निदर्शने केली. एनआयएचे पथक कायद्याप्रमाणे त्यांचे काम करीत आहे, काळजी करण्याचे कारण नाही, अशा शब्दांत संतप्त जमावाला समजावण्याची जबाबदारी खालिदला पार पाडावी लागली. मात्र, त्याला नंतर ताब्यात घेण्यात आले. आजच्या छापेमारीत एनआयएच्या पथकाने आक्षेपार्ह दस्तावेज, पत्रके आणि मासिकांसह इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली. छापेमारी करण्यात आलेले देशभरात हिंसक हल्ले घडवण्यासाठी लोकांना प्रवृत्त करण्यात गुंतले होते, असे एनआयएच्या अधिकाऱ्याने सांगितले.

**भिवंडीतही छापे**

एनआयएच्या पथकाने भिवंडीतील खादीपूर येथे छापेमारी करीत कामरान अन्सारी नावाच्या व्यक्तीला अटक केली. ◀(वृत्तसंस्था)

## अमरावतीतील युवक ताब्यात

### पाकिस्तानशी संबंध असल्याचा संशय



राजापेठ पोलिस ठाण्याच्या आवारात पथकातील सदस्य व त्यांची वाहने

◆ **अमरावती, १२ डिसेंबर**

एनआयएच्या पथकाकडून अमरावतीत एका युवकाला पाकिस्तानशी संबंध असल्याच्या प्रकरणात ताब्यात घेण्यात आले. एनआयएचे पथक या कारवाईसाठी गुरुवारी पहाटेच अमरावतीत दाखल झाले होते.

अमरावतीतील छाया नगर परिसरात राहणाऱ्या एका युवकाला पहाटे साडेतीनच्या सुमारास एनआयए आणि राजापेठ पोलिसांच्या संयुक्त कारवाईत ताब्यात घेण्यात आले. हा युवक गत काही दिवसांपासून पाकिस्तानमधील काही संघटनांसोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात होता. या युवकाचा नेमका कोणत्या संघटनांशी संपर्क होता, या संदर्भात पथक चौकशी करीत आहे.

यापूर्वी अमरावती शहरात एनआयएचे पथक २०२२ मध्ये उमेश कोल्हे हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी आले होते. आता पुन्हा एकदा आल्याने शहरात दिवसभर चर्चा सुरू होती. चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेल्या युवकाची दिवसभर चौकशी सुरू होती. ◀(तभा वृत्तसेवा)

# टेंपोच्या धडकेत ग्रामविकास अधिकारी ठार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ डिसेंबर-**

तालुक्यातील कडबगाव शिवारातील अक्कलकोट ते अक्कलकोट रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवर टेम्पो व मोटारसायकलच्या धडकेत मोटारसायकलवरील ग्रामविकास अधिकारी जागीच ठार झाला. राहुल शंकर चव्हाण (वय २८, रा. जेऊरवाडी, ता. अक्कलकोट) असे मयत तरूणाचे नाव आहे. दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये टेम्पो चालकाविरूद्ध गुन्हा दाखल झाला.



१२ डिसेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास राहुल शंकर चव्हाण (वय २८, रा. जेऊरवाडी) हे मोटारसायकलवर (क्र. एम. एच. १३/ ए. के. ७८०४) वरुन अक्कलकोट रेल्वे स्टेशनकडे जात असताना कडबगाव शिवारातील इरण्णा शंकरशेट्टी यांच्या शेतालगत टेम्पो (क्र. एम. एच. १३/ ए. एक्स. २९०६) वरील चालक महम्मद इसाक इस्माईल शेख (वय २५, रा. चिंचोलीकाटी, ता. मोहोळ) याने टेम्पो हयगयीने, अविचाराने, भरधाव वेगात रॉंग साईडने येऊन यातील मयत राहुल शंकर चव्हाण यांच्या दुचाकीला समोरुन जोराची धडक दिली. याबाबत फिर्याद मयताची बहीण कांचन शंकर चव्हाण (वय ३१) यांनी दिली आहे.

काका श्रीमंत रामचंद्र राठोड हे दुसऱ्या मोटारसायकलवर सोबतच येत होते. अपघातानंतर लागेच काकाने मोटारसायकल थांबवून पाहिले असता मोठी जखमी झाली होती. त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे दाखल केले असता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

### अनुकंपावर मिळाली होती नोकरी

ग्रामसेवकाचे भाऊ मयत झाल्याने त्याच्या जागी अनुकंपावर मयत तरूण राहुल शंकर चव्हाण मागील आठ महिन्यांपूर्वी ग्रामविकास अधिकारी म्हणून अक्कलकोट पंचायत समिती येथे नोकरीस लागले होते. आत्ता त्याचे निधन झाल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



**ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गुरुवारी वयाची ८४ वर्षे पूर्ण करून ८५ व्या वर्षात पदार्पण केले. पवार कुटुंबीयांनी राजधानी दिल्लीतील निवासस्थानी त्यांचा वाढदिवस मोठ्या थाटात साजरा केला. यावेळी पवारांनी तलवारीने केकही कापला. विशेष म्हणजे, राजकीय मतभेद बाजूला सारून, उपमुख्यमंत्री अजित पवारही या कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी झाले होते.**

# परदेशातील मीटिंगमध्ये तोंड लपवण्याचा प्रयत्न करतो


## गडकरी यांचे प्रतिपादन

## रस्ते अपघात कमी करण्याचे लक्ष्य होते, त्यात आणखी वाढ

**नवी दिल्ली**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी सांगितले की, जेव्हा जेव्हा मी आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी जातो आणि रस्ते अपघातांबाबत चर्चा होते तेव्हा मी तोंड लपवण्याचा प्रयत्न करतो.

लोकसभेत रस्ते अपघातांवरील चर्चे दरम्यान गडकरी म्हणाले की, जेव्हा मी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला तेव्हा मी रस्ते अपघात ५०% कमी करण्याचे लक्ष्य ठेवले होते. अपघात कमी करणे तर सोडा. हे प्रमाण वाढले आहे हे मान्य करायला मला लाज वाटत नाही. त्यामुळे कोणत्याही आंतरराष्ट्रीय परिषदेत जेव्हा रस्ते अपघातांची चर्चा होते तेव्हा मी तोंड लपवण्याचा प्रयत्न करतो. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी म्हणाले की, भारतातील परिस्थिती बदलेल जेव्हा मानवी वर्तन आणि समाजात बदल होईल आणि कायद्याचा आदर होईल. त्यांचा वैयक्तिक अनुभव सांगताना त्यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वी त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा मोठा रस्ता अपघात झाला, ज्यामध्ये त्यांना बराच काळ रुग्णालयात राहावे लागले. ते म्हणाले, 'देवाच्या कृपेने मी आणि माझे कुटुंब वाचलो. मला अपघातांचा वैयक्तिक अनुभव आहे.



### रस्त्यावर ट्रक उभ्या राहिल्याने अपघात वाढतात

गडकरी म्हणाले की, रस्त्यावर ट्रकचे पार्किंग हे अपघातांचे प्रमुख कारण आहे आणि अनेक ट्रक लेनची शिस्त पाळत नाहीत. गडकरी म्हणाले की, भारतात बस बॉडी तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करण्याचे आदेश दिले आहेत. बसच्या खिडकीजवळ हातोडा असावा, जेणेकरून अपघात झाल्यास खिडकी सहज तोडता येईल, असे त्यांनी सांगितले.




# सुनेत्रा पवार दिल्लीत शरद पवारांच्या शेजारी!

## परंपरेला फाटा देत पहिल्या कारकीर्दीतच मिळाला मोठा बंगला

**नवी दिल्ली, १२ डिसेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना दिल्लीत मोठा बंगला मिळाला आहे. सामान्यतः पहिल्यांदा खासदार होणाऱ्या व्यक्तीला मोठा बंगला मिळत नाही. पण, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील राष्ट्र वादी काँग्रेसच्या यशामुळे सुनेत्रांना हा बंगला देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. विशेषतः याचा संबंध अजित पवारांच्या दिल्लीत वाढलेल्या दबदब्याशी जोडला जात आहे. सुनेत्रा पवार यांना दिल्लीच्या लुटियन्सच्या ११ जनपथवरील टाईप-७ बंगला देण्यात आला. खास गोष्ट म्हणजे, हा बंगला शरद पवार यांच्या ६ जनपथ स्थित टाईप-८ बंगल्याला अगदी लागून आहे. शरद पवार तिथे आपल्या कन्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबत राहतात. पहिल्यांदा खासदार होणाऱ्यांना मोठा बंगला मिळत नाही लुटियन्समधील सुनेत्रा पवार यांचा टाईप-७ बंगला सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. कारण, सुनेत्रा या प्रथमच खासदार बनल्या आहेत. वृत्तानुसार, पहिल्यांदा खासदार म्हणून संसदेत पोहोचलेल्या व्यक्तीला दुसऱ्या सर्वोच्च श्रेणीचा बंगला दिला जात नाही. पण, सुनेत्रांना तो देण्यात आला. उल्लेखनीय बाब म्हणजे, सुनेत्रा पवार यांचा लोकसभा निवडणुकीत खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना राज्यसभेवर पाठवले होते.

### कोण-कोण आहेत सुनेत्रांचे शेजारी?

सुनेत्रा पवार यांच्या शेजाऱ्यांध्ये काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, भाजपाचे अध्यक्ष तथा केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आदी बड्या नेत्यांचा समावेश आहे.

# बदल्या झालेले २१५ पोलीस निरीक्षक पुन्हा पूर्ववत जागी!

## निवडणूक काळात झाल्या होत्या बदल्या; पोलिस महासंचालकांकडून नवीन आदेश जारी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१२ डिसेंबर:**

निवडणूक आयोगाने बडगा दाखवल्यानंतर दीड महिन्यापूर्वी हलविण्यात आलेल्या २१५ पोलीस निरीक्षकांच्या पुन्हा त्याच पोलीस घटकात बदल्या करण्यात आहेत. निवडणूक आचारसंहिता समता राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे पोलीस महासंचालकाकडून बुधवारी रात्री त्याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

त्यामध्ये मुंबईतील तब्बल १५५ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महासंचालक कार्यालयाच्या या निर्णयामुळे निवडणूक आयोगाचे आदेश म्हणजे 'रात गयी बात गयी 'असे ठरले असल्याचे चर्चा आता पोलीस वर्तुळातूनच सुरू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमाला शासन कसे बगल देऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्यात विधानसभेच्या निवडणुका २० नोव्हेंबरला झाल्या त्यापूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिलेल्या सूचनेनुसार चार ऑक्टोबर व ३० ऑक्टोबर रोजी मुंबईसह राज्यातील सर्व पोलीस घटकातील निवडणूक आयोगाच्या निकषांमध्ये म्हणजे एकाच जिल्ह्यात तीन वर्षाहून अधिक काळ कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बदलांच्या ठिकाणी




हजर होण्यासाठी कार्यमुक्त करून नवनियुक्त ठिकाणी हजर करण्यात आले होते. २३ नोव्हेबरला निवडणुकीचा निकाल लागून महायुती पुन्हा बहुमताने विजयी झाले त्यानंतर पाच डिसेंबरला नवे सरकार स्थापन झाले आहे. मंत्रिमंडळ विस्तार व खातेवाटप अद्याप जाहीर झाले नसले तरीही सध्या ग्रह खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाहत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईबाहेर बदल्या झालेले अनेक अधिकारी नाराज होते त्यांना नक्षलग्रस्त व दुर्गम भागात पाठवण्यात आले होते त्यामुळे मुंबईतील अधिकाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन संबंधित अधिकारी पुन्हा मुंबई आयुक्तालयात काम करण्याची संधी द्यावी अशी त्यांच्याकडून मागणी होत होती त्याला अनुसरूनच पोलीस महासंचालकाकडून ११ डिसेंबरला राज्यातील २१५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या त्यामध्ये चार व ३० ऑक्टोबरला मुंबई बाहेर बदल्या करण्यात आलेल्या १५५ अधिकाऱ्यांना पुन्हा मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत बदली करण्यात आली आहे .तर त्यावेळी अन्य विविध घटकातून मुंबईत बदली केलेल्या ६० अधिकाऱ्यांच्या त्यांच्या विनंतीनुसार त्यांना पूर्ववत हव्या त्या घटकात बदली करण्यात आली आहे या अधिकाऱ्यांना संबंधित ठिकाणी तातडीने हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात यावे असे सूचनाही घटक प्रमुखांना देण्यात आले आहेत.

### अन्य अधिकाऱ्यांच्याही होणार पूर्ववत बदल्या

पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांबरोबरच उपनिरीक्षक सहाय्यक निरीक्षक व उपाधीक्षक सहाय्यक अधीक्षक, उपायुक्त आदी दर्जाच्या ज्या अधिकाऱ्यांच्या निवडणूक आयोगाच्या निकषाप्रमाणे बदल्या झाल्या आहेत. त्यांना पुन्हा त्यांच्या इच्छेनुसार पूर्ववत घटकांमध्ये बदल्या केल्या जातील ,असे गृह विभागातील सूत्रांकडून सांगण्यात आले.



# अंजली कुलकर्णी यांच्या कविता समाजभान जपणाऱ्या : प्रा. जोशी

## ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी यांचा काव्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ डिसेंबर-**

आजची मराठी कविता इझमच्या जोखडातून मुक्त झाली असली तरी मुक्तछंदाचा वापर करताना भाषा, शब्दमाधुर्य, लय, आशय आणि भावोत्कटता याकडे दुर्लक्ष होत आहे, अशी टीका महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केली. जागतिकीकरणाच्या रेट्यात अडकलेली समाजव्यवस्थेतील नाती, भावना, बदलती मूल्ये यांचे मार्मिक चित्रण टिपणारी कवयित्री म्हणून अंजली कुलकर्णी यांची ओळख असून त्यांनी निर्हेतूक मनाने लिहिलेल्या कविता संवेदनशील, समाजभान जपणाऱ्या, शुद्ध प्रतिच्या आहेत, असे त्यांनी गौरवोद्गार नमूद केले. रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी यांचा काव्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे वितरण प्रा. जोशी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. ॲड. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी तर मानपत्राचे वाचन ऋचा कर्वे यांनी केले. पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त आयोजित कविसंमेलनात विजय सातपुते, सुजित कदम, स्वप्नील पोरे, मिलिंद शेंडे, राजश्री सोले, राजश्री महाजनी, स्वाती दाढे, मेना सातपुते, स्वाती यादव, माया मुळे, डॉ. मृणालिनी गायकवाड, आशा ठिपसे, डॉ. रेखा देशमुख, वैजयंती विझे-आपटे यांचा सहभाग होता. ज्येष्ठ कवयित्री प्रभा सोनवणे अध्यक्षस्थानी होत्या. केतकी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वाद आणि दावा!

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीस सत्ता मिळाली तर सरकारचे नेतृत्व कोणी करावयाचे यावरून निवडणुकीआधी सुरू झालेली महाविकास आघाडीतील धुसफूस आता वेगळ्या कारणामुळे अधिक धुमसू लागली आहे. महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवा, असा आग्रह निवडणुकीआधी धरणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस आता विरोधी पक्षनेतेपद मिळविण्यासाठी आणि विधान परिषदेतील आहे ते विरोधी पक्षनेतेपद टिकविण्यासाठी आघाडीतील पक्षांची मनधरणी करण्याची वेळ यावी, हा त्यांच्या पक्षास पाहावा लागलेला राजकीय दैवदुर्विलास म्हणावा लागेल. २०२१ च्या जुलै महिन्यात ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी एक भाकीत वर्तविले होते. राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर असलेल्या ठाकरे यांना कोणा एका सर्वेक्षणात देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक पसंती लाभल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर, ठाकरे यांनी देशाचे नेतृत्व करावे या अपेक्षांना त्या वेळच्या शिवसेनेत धुमारे फुटले होते. त्यामुळेच उद्धव ठाकरे हे देशाचे भावी पंतप्रधान होऊ शकतात, असे ते भाकित राऊत यांनी ठाकरे यांच्या वाढदिवसाचा मुहूर्त साधून वर्तविले होते. त्याआधी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे नाव या यादीत केव्हापासूनच समाविष्ट झाले होते. पुढे पवार यांचे नाव या पदाच्या प्रतीक्षा यादीत दाखल झाले, तरीही या पदासाठीची त्यांची उमेदवारी कायमच होती. २०१९ मध्ये रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या तत्कालीन प्रवक्त्यांनी तर त्यांचे नाव जाहीरच करून टाकले होते. २०१९ च्या निवडणुकीनंतर शरद पवार हे पंतप्रधान होतील, असा दावा त्या वेळचे प्रवक्ते प्रफुल्ल पटेल यांनी केल्यानंतर शरद पवार यांना जातीने त्यावर सारवासारव करावी लागली होती. या पदावर दावा करण्यासाठी बहुमताचे संख्याबळ सोबत असावे लागते आणि ते आमच्या पक्षाकडे नसल्याने पटेल यांनी सदिच्छा व्यक्त केल्या तरी वस्तुस्थिती तशी नाही, असे सांगून स्वतः पवार यांनी त्या दाव्याचा वाद मिटवून टाकला होता. ठाकरे यांनी मात्र तसे काहीच न केल्याने, ते स्वतःस या पदाचे लायक उमेदवार समजत असावेत, असा सर्वांचा समज झाला. त्यानंतरच्या महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी आता सर्वांस ठाऊक आहेत. एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे मुख्यमंत्रिपदाचा दावादेखील सोडून उद्धव ठाकरे पुन्हा पक्षप्रमुख पदावर रुजू झाले आणि पुढे पक्षच फुटल्याने एका गटाच्या प्रमुखपदावर समाधान मानण्याची वेळ त्यांच्यावर आली. ठाकरे यांच्या संदर्भातील राऊत यांचा पंतप्रधानपदाचा तो दावा आजही कायम आहे किंवा नाही, हे स्पष्ट झालेले नाही. पण अलिकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील निकालांनी त्यांना त्या अपेक्षांपासून दूर नेऊन ठेवले आहे, यात मात्र शंका नाही. आता पुन्हा तसा दावा करण्यासाठी पवार यांच्यासोबतच, उद्धव ठाकरे यांनाही आपल्या व्यापक नेतृत्व क्षमता नव्याने सिद्ध कराव्या लागतील. अन्यथा, शरद पवार यांच्या पाठोपाठ पंतप्रधानपदाच्या स्पर्धेतील महाराष्ट्रातील दुसरे नाव म्हणूनच उद्धव ठाकरे यांना प्रतीक्षा यादीत ताटकळत बसावे लागेल. सध्या या उभय नेत्यांचे राष्ट्रीय राजकारणातील स्थान काहीसे डळमळीतच झाले असल्याने आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान संख्याबळाअभावी नगण्य राहिल्याने, पंतप्रधानपदाच्या वादापाठोपाठ विधानसभा निवडणुकीआधी सुरू केलेला मुख्यमंत्रिपदाचा वादही महाविकास आघाडीस गुंडाळून ठेवावा लागला. आता किमान विरोधी पक्षनेतेपद तरी आपल्या पक्षाच्या पदरात पडावे यासाठी ठाकरे यांच्या गटाची कसरत सुरू झाली आहे. कारण विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदावर दावा करण्यासाठी आवश्यक असणारे किमान संख्याबळही त्यांच्या गटाकडे नाही. कधी काळी स्वप्नवत असलेले पंतप्रधानपद वास्तवात दूरच राहिले, हाताशी आलेल्या मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली आणि आता तर, विरोधी पक्षनेतेपदासाठी विनवण्या करण्याची वेळ आली, ही सध्या महाविकास आघाडीतील या नेत्यांची राजकीय शोकांतिका ठरली आहे. निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल स्वीकारण्याचा समंजसपणा दाखवावा लागतो, पण अलिकडच्या निवडणुकीत मतदारांनी या आघाडीस सत्तेपासून दूर ठेवलेच; पण विरोधी पक्षनेतेपदाचा दावा करण्याएवढे संख्याबळही त्यांच्याकडे दिले नाही, हा या शोकांतिकेचा कळसाध्याय म्हणावा लागेल.

विधिमंडळात प्रबळ विरोधी पक्ष असणे ही भक्कम लोकशाहीची शक्ती असते. विरोधी पक्षांचे संख्याबळ कमी असले, तरी प्रसंगी सरकारला वैधानिक आयुधांचा वापर करून धारेवर धरणे, सरकारच्या कारभारावर अंकुश ठेवणे आणि राजकारणापलीकडे जाऊन राज्यातील जनतेच्या हिताचा विचार करणारे निर्णय घेण्यास सरकारला भाग पाडणे, ही जबाबदारीची कामे विरोधी पक्षास पार पाडावीच लागतात. त्यासाठी संख्याबळासोबतच प्रगल्भ राजकीय समजदेखील गरजेची असते. सध्या मात्र विरोधी पक्षनेतेपदावर हक्क प्रस्थापित करण्याकरिता आवश्यक असलेले संख्याबळ नसल्याने सत्ताधारी महायुतीने मनाचा मोठेपणा दाखविला तरच हे पद विरोधकांतील मोजक्या संख्याबळाच्या कोणा एका पक्षास मिळेल अशी स्थिती आहे. त्यामुळे विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के म्हणजे किमान २८ सदस्य असलेला पक्ष विरोधकांतील अन्य पक्षाहून मोठा असेल, तर त्या पक्षास विरोधी पक्षनेतेपद मिळू शकते, अशी तरतूद आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतील कोणत्याही एका पक्षाकडे २८ एवढी सदस्यसंख्या नसल्याने विरोधी पक्षनेतेपदासाठी पुन्हा आघाडीची मोट बांधून या पदासाठी सत्ताधारी पक्षाकडे मागणी करण्याची तयारी महाविकास आघाडीने केल्याने, सरकार पक्षाकडून त्यास मान्यता मिळाली तरच हे पद विधानसभेत दिसू शकते. तसे झाल्यास, महाविकास आघाडीतील घटक पक्षांत या पदावरून पुन्हा एकदा जोरदार रस्सीखेच पाहावयास मिळेल, अशी चिन्हे आहेत. निवडणुकीआधी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याच्या मागणीवरून जी परिस्थिती महाविकास आघाडीत उद्भवली होती, तीच स्थिती आता विरोधी पक्षनेत्याच्या मागणीवरून आघाडीच्या अंतर्गत राजकारणात पाहावयास मिळू शकते असे चित्र असल्याने, अगोदरच फुटीच्या उंबरठ्यावर असलेल्या महाविकास आघाडीतील धुसफूस पुन्हा डोके वर काढेल, अशी चिन्हे आहेत. महाविकास आघाडी ही विरोधकांच्या राष्ट्रीय स्तरावरील इंडिया आघाडीचाच घटक असल्याने व सध्या इंडिया आघाडीतच नेतृत्वाचा वाद उफाळून आला असल्याने, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतील घटक पक्षांना केंद्रीय स्तरावरील वादाकडे डोळेझाक करून सामंजस्याने विरोधी पक्षनेतेपदाचा वाद सोडवावा लागेल. सध्या तशीही परिस्थिती दिसत नाही. इंडिया आघाडीचे नेतृत्व राहुल गांधींकडून काढून घेतले नाही, तर आघाडीला भवितव्य नाही या जाणिवेने आघाडीत हताशा दाटली आहे. काँग्रेस व काँग्रेसेतर पक्षांत आता आघाडीच्या नेतृत्वावरून सुरू झालेल्या वादाची मुळे महाराष्ट्रातच रुजल्याचे स्पष्ट होऊ लागले असून महाराष्ट्रातील महाविकास आघाडीची मोट सांभाळणे सोपे नाही, याची जाणीव या आघाडीतील काँग्रेस, शरद पवार गट आणि ठाकरे गटास आहे. त्यामुळेच या पदावरचा दावा भविष्यात वादाचे मूळ ठरू शकतो, याचेही भान या नेत्यांना राखावे लागणार आहे.

उद्धव ठाकरे यांच्या गटास लागलेल्या या ओहोटीतून पुन्हा सावरायचे असेल, तर त्यांना भविष्यात अनेक राजकीय तडजोडी कराव्या लागतील, असा सद्यस्थितीचा अर्थ आहे. त्यातच विधान परिषदेतील ठाकरे गटाकडे असलेल्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा करण्याच्या काँग्रेसच्या हालचालींनी अस्वस्थतेत भर टाकली आहे. विधानसभेतील या पदाचा वाद सामंजस्याने मिटण्याआधीच विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाचा नवा वाद ठाकरे कशा रीतीने हाताळतात, त्यावर महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या भावी वाटचालीचा मार्ग स्पष्ट होणार आहे. अन्यथा, केंद्रात डळमळीत झालेल्या इंडिया आघाडीप्रमाणे महाराष्ट्रातील या महाविकास आघाडीची अवस्था होईल आणि अशा आघाड्या म्हणजे गाजराची पुंगी ठरतात हे पुन्हा एकदा स्पष्ट होईल. भक्कम लोकशाहीसाठी विरोधक सक्षम असणे ही लोकशाहीची अपेक्षा पूर्ण करण्याकरिता तरी या पक्षांनी एकत्र राहावयास हवे. ▮

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

'महाभारतात जे नाही ते कुठेच असू शकत नाही' असे महाभारताविषयी म्हटले जाते. 'व्यासोच्छिष्ट जगत् सर्वम्' ही म्हण सर्वांना विदितच आहे. भरतवंशाच्या 'फाळणी'मुळे महाभारत घडले म्हणजे कुरुक्षेत्रावरील महायुद्ध घडले. त्यांत पांडवांचा विजय झाला. सत्याचाच विजय होत असतो. 'यत्र योगेश्वर कृष्ण आणि महाधनुर्धर असतो तेथेच यश असते, विजय असतो,' हे सत्य ऐकायला बरे वाटते; पण निरपेक्षपणे, घडलेल्या घटनांचा परिणामस्वरूप उत्तरार्धाचे चिंतन किती होते? महाभारताचाच इतिहास पाहिला तर 'सत्यासाठी पांडव लढले' याचा सुखद परिणाम भोगायला पांडवांची पुढील पिढी आजच्या परिभाषेत 'न्यू जनरेशन' शिल्लक राहिली का? संतानविहीन झालेल्या पांडवांना कौटुंबिक सुख, राज्य सुख तरी भोगता आले का? काळ बदलला, युग बदलले तरी परिस्थितिजन्य परिणामात काहीही बदल होत नसतो. वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या रूपाने त्याचे दुष्परिणाम हे भोगावेच लागतात. महाभारतात कोणत्याही प्रकारचा संकोच न करता असे घडू नये म्हणून देशप्रमुखाने, समाजाने कोणत्या टोकाचा विचार केला पाहिजे, याचा वैचारिक, सैद्धांतिक (ब्ल्यू-प्रिंट) आलेखच दिला आहे. 'जुने जाऊ द्या मरणालागूनी' या अभिनिवेशात आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष केले, पण त्याचे परिणाम 'हसत कर्म करावे; भोगावे रडत तेच परिणामी' या न्यायाने कुणाला भोगावे लागून राहिले आहेत? समाजाला, देशाला दुर्गतीला नेणाऱ्या स्वार्थी, सत्तांध, चुकीचा विचार करणाऱ्या, तथाकथित श्रेष्ठ, महान समजल्या जाणाऱ्या नेत्यांकडे आपली विचारशक्ती, बुद्धी कोणी शहाणं टाकली होती? आम्हीच ना? लोकशाहीच्या कटोऱ्यात मतस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे 'शुद्ध पायस' आम्ही सतत सात दशके ज्यांना पाजत आलो, त्या दुधाचे विष होऊन तेच आज 'भारत तेरे टुकडे होंगे' 'हमने भरत पार आठसौ साल राज किया है, आज भी हम करेंगे' (बांगला देशमधील मौलाना) 'लव्ह जिहाद', 'व्होट जिहाद', 'गजवा-ए-हिंदुस्तान', 'सर तनसे जुदा' या घोषणांचे, कृत्यांचे, तक्षकापेक्षाही जहरी विषाक्त फुत्कारांनी आज भारताचे वातावरण प्रदूषित करीत आहेत.

बांगला देशातील जिहादी, आतंकवादी झालेले परिवर्तन, तेथे हिंदू समाज, हिंदू स्त्रियांवर होणारे अत्याचार, बलात्कार, हिंदू मंदिराचा होणारा विध्वंस, संत-महंतांना कारावास या गोष्टी औरंगजेबाचे खरे वारसदार म्हणून ते करीत आहेत. आम्ही शिवाजीचे वारस भरतवंशीयाच्या कुळात जन्माला आलेलो 'भारतवासी' काय करीत आहोत? त्या बाबतीत आपण महाभारतकार व्यासांना विचारले तर ते म्हणतील, 'देशाचे, राष्ट्राचे, धर्माचे, संस्कृतीचे रक्षण कसे करावे हे मी विस्ताराने सांगितले आहे. राष्ट्र जीवनात कोणत्या प्रश्नांना प्राधान्यक्रम द्यायचा आणि कोणत्या प्रश्नांना निम्नक्रम द्यायचा, हे विविध आख्यानांच्या माध्यमातून सांगून ठेवले आहे. पण तुम्ही त्याकडे पाहत नाही. विचार करीत नाही, चिंतन करीत नाही; त्याला माझा काय बरे दोष आहे वत्सांनो! महर्षी व्यासांचे म्हणण्यात काय चूक आहे? त्या दृष्टीने विचार केला तर लक्षात सहज येईल की, □

गत सहस्रावधी वर्षांपासून हिंदू आणि मुसलमान हा एकच यक्षप्रश्न भारताच्या ऐतिहासिक कालखंडात ऐरणीवरचा आणि हिंदू धर्म, समाज, संस्कृतीच्या अस्तित्वाच्या लढ्याचा (वॉर ऑफ एक्झिस्टन्स) राहिला आहे. इंग्रजी राजवटीचे 'मध्यंतर' सोडले तर 'पिक्चर' तेच चालू आहे. पात्र बदलताहेत, स्वातंत्र्य पूर्व काळात बॅ. जिना होते तर आताच्या काळात कुणी वेगळे आहे. 'दि राष्ट्र सिद्धांत की गाडी पुरानी है, लेकिन रफ्तार वही है और गाडी की दिशा भी वही है की- हंसके लिया पाकिस्तान; लढ के लेंगे हिंदुस्तान.' पण, समोरासमोरच्या युद्धात तीन वेळा मार खाल्ल्याने 'थ्रू टेररिझम अँड थ्रू बॅलेट बॉक्स, नॉट थ्रू बुलेट, वुई हॅव टु क्रॉकर इंडिया' (मुस्लिम स्कॉलर) त्यांचे ठरले आहे की, आम्हाला अखंड पाकिस्तान करायचे आहे आणि तो प्रयत्न आम्ही करणारच. त्या दृष्टीने आमचा प्राधान्यक्रम कसा पाहिजे-

थ्रू बॅलेट बॉक्स : मुस्लिम व्होट बँकेच्या माध्यमातून जर ते आव्हान देणार असतील तर समान नागरी कायदा आणि लोकसंख्या प्रतिबंधक कायदा प्राधान्यक्रमाने अंमलात आणणे जरूर आहे. पण गेल्या १० वर्षांत निदान एक कोटी संख्या आम्ही वाढू दिली ना?

महाभारतात जनमेजयाने आयोजन केलेल्या सर्पसत्राचे फार मोठे आख्यान आहे. जनमेजय कोण? परीक्षिताचा मुलगा म्हणजे अभिमन्यूचा नातू. परीक्षिताचा मृत्यू नागकुळातील अत्यंत क्रूर, तामसी आणि भयानक विषारी असलेल्या तक्षकाच्या दंशाने झाला होता. कुरुवंशोत्कुलोत्पन्न जनमेजय राजा हस्तिनापूरचा राजा म्हणून चांगल्या प्रकारे राज्य कारभार करीत असताना उत्तंक महामुनी हस्तिनापूरला गेले. राजदरबारात त्यांनी पाहिले की, राजा जनमेजय आनंदाने आपल्या मंत्र्यांसमवेत गप्पा मारीत बसला होता. कारण त्याने नुकताच तक्षशिला नगरीवर विजय संपादन केला होता. त्यामुळे विजयोत्सवाचे वातावरण होते. परंपरेप्रमाणे पाद्यपूजा वगैरे करून राजाने ऋणी उत्तंकाचे स्वागत केले. कुशल मंगल प्रश्न विचारणे झाल्यावर उत्तक ऋषी तीव्र स्वरात जनमेजयाला म्हणाले-

''हे राजन्, प्राधान्यक्रमाने जे कार्य करणे आवश्यक आहे ते न करता, त्याला महत्त्व न देता तू एखाद्या अज्ञानी मनुष्यासारखे दुसरीच कामे करून राहिला आहेस. तुला वाटत असेल, तू प्रजांचे सर्वप्रकारे रक्षण करून धर्माचे पालन करीत आहेस; पण ते चूक आहे. अरे बाबा! ज्या तक्षकाने भरतवंशीयाला म्हणजे तुझ्या पूर्वजांना विषारी डंख मारून नष्ट केले; त्यांची मदत करायला येणाऱ्यांनाही त्याने विषभारीत केले, त्याचा हिशेब प्राधान्यक्रमाने कर. त्याला आवश्यक असलेला कार्यकाळ आता प्राप्त झाला आहे. जो आपल्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त होत नाही, त्याला सद्गती मिळत नाही. त्याने काहीही दोष नसलेल्या तुझ्या पूर्वजाला दंश करून मारून टाकले आहे. त्यांचे तुझ्यावर पितृऋण आहे. त्यामधून तू मुक्त हो. (आदिपर्व - अ. ३ रा श्लोक १७९ ते १८३)

मुस्लिम आक्रमणाच्या प्रारंभ काळापासून ज्यांनी आमच्या पूर्वजांचे मुंडक्यांचे मनोरे रचलेत, आमच्या गावागावांतील मंदिरे उद्ध्वस्त करून तेथे मशिदींचे मनोरे बांधलेत, त्यांचा हिशेब चुकता करणारा पितृऋण आणि देवऋण फेडणारा त्यासाठी 'इंद्राय स्वाहा - तक्षकाय स्वाहा'ची आहुती देणारा एखादा जनमेजय भरत कुळात कधी जन्माला येईल काय? ▮

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**संजय रामगिरवार**

# कुटुंब संस्कार...

महिला सक्षमीकरण हवेच. किंबहुना, त्याच दिशेने आपल्या देशाची वाटचाल सुरू आहे. आजची स्त्री साऱ्याच क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहे, नव्हे उत्तम कर्तृत्व गाजवत आहे. मात्र, तिच्यावरील अन्याय-अत्याचार थांबला, असे म्हणण्याचे धाडसही करता येणार नाही. पण त्याच वेळी एक स्त्री व तिचे कुटुंब पुरुषालाही त्रस्त करून सोडू शकते आणि एवढे की, त्याला आपले जीवनच संपवावे लागते, तेव्हा आमची कुटुंब व्यवस्थाही सक्षम होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. गडद तपकिरी रंगाचा टी-शर्ट आणि हेडफोन लावलेल्या एका तरुणाची आत्महत्येपूर्वीची चित्रफीत समाजमाध्यमांवर पसरते आणि 'जस्टिस ईज ड्यू...' सारखा गंभीर प्रश्न सोडून जाते.

बेंगळुरूमधील एका खाजगी कंपनीतील एआय अभियंता असलेला अतुल सुभाष याच्या आत्महत्येच्या घटनेने देशात एका आगळ्या चिंतनाला सुरुवात केली आहे. अतुलने आत्महत्येपूर्वी लिहिलेले २४ पानांचे पत्र पुरुषांवरील अन्यायाच्या घटनांकडेही गंभीरपणे बघितले पाहिजे, असाच इशारा देत आहे. या पत्रात, अतुलने पत्नी आणि तिच्या नातेवाईकांकडून झालेल्या छळाची कहाणी लिहीत आपले आयुष्य संपवले आहे. आत्महत्येपूर्वी त्याने केवळ पत्रच लिहिले नाही तर ८० मिनिटांची चित्रफीतही समाजमाध्यमांवर टाकली. त्यातील शेवटचे वाक्य तर न्यायव्यवस्थेबद्दलही चिंता व्यक्त करणारे आहे. तो म्हणतो, ''माझ्या अस्थी विसर्जित करू नका. न्याय मिळाला तर गंगेत, नाही तर न्यायालयासमोरील कुठल्या तरी नालीत त्या विसर्जित करा...!''

अतुल सुभाष या चित्रफितीत सांगतो की, त्याच्या पत्नी आणि नातेवाईकांनी त्याच्यावर ९ खटले भरले. अतिशय गंभीर आरोप लावले. या खटल्यांसाठी त्याला न्यायालयाच्या १२० तारखांना सामोरे जावे लागले. स्वतः ४० वेळा जोधपूर कोर्टात उभे राहावे लागले. तो राहत




असलेले बेंगलुरू आणि जौनपूर हे अंतर पार करण्यासाठी त्याला दोन दिवस लागायचे. कंपनीकडून वर्षाला २३ सुट्या मिळायच्या. अशावेळी तो खरंच न्यायालयीन लढाई लढू शकणार होता? पत्नी व तिच्या नातेवाईकांनी त्याच्यावर आणि त्याच्या भाऊ तसेच वडिलांवर लावलेल्या ९ खटल्यांमध्ये ३०२, ३७७, ४९८(अ), ३२३, ४०६, ५०४, ५०६ आणि हुंड्याच्या कायद्यातील काही कलमांचाही समावेश होता. त्यातील काही खटले नंतर त्याच्या पत्नीने मागे घेतले खरे; पण पोटगीच्या खटल्यांत अतुल पिचून गेला असल्याचे त्यांच्या चित्रफितीतून जाणवते. आणखी अनेक गंभीर आरोप त्यातून त्याने केले आहेत.

अतुल सुभाषच्या आत्महत्येवरून सुरू झालेल्या वादाच्या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने आता हिंदू जोडप्याच्या घटस्फोटाच्या प्रकरणात अंतिम पोटगीची रक्कम ठरवण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे मांडली आहेत. ज्यात पक्षांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती, पत्नी आणि अवलंबून असलेल्या मुलांच्या वाजवी गरजा, पक्षांची वैयक्तिक पात्रता आणि रोजगार स्थिती, स्वतंत्र उत्पन्न किंवा अर्जदाराच्या मालकीची मालमत्ता, वैवाहिक घरात पत्नीने उपभोगलेले जीवनमान, कौटुंबिक जबाबदाऱ्यांसाठी केलेला रोजगाराचा त्याग, काम न करणाऱ्या पत्नीसाठी वाजवी खटल्याचा खर्च, पतीची आर्थिक क्षमता, त्याचे उत्पन्न, देखभालीची जबाबदारी आणि दायित्व आदींचाही विचार होणे गरजेचे आहे. कायमस्वरूपी पोटगीची रक्कम पतीला दंड करणार नाही तर पत्नीचे जीवनमान चांगले राहील अशा पद्धतीने ठरवले जावे, असे न्यायालयाचे निरीक्षण आहे.

या साऱ्या प्रकरणांतून एक गोष्ट मात्र आवर्जून जाणवते आणि ती म्हणजे कुटुंब प्रबोधनाची. आपण समाजजीवनात निश्चितपणे प्रगती करीत आहोत. पण आपली सामाजिक कुटुंब व्यवस्था, संस्कार खरेच प्रगतीकडे वाटचाल करीत आहे का, लग्नानंतर होणारी विभक्त कुटुंब चिंतेचा विषय नाही का, ठिकठिकाणी लग्नानंतर महिलांवरील अत्याचाराच्या घटना थांबत नसतानाच, आता पुरुषांवरील अत्याचाराच्याही घटना वाढल्या नाहीत का, ठिकठिकाणी पत्नी पीडितांच्या संघटना तयार होत आहेत, हे कशाचे द्योतक आहे. पती म्हणजे आपला गुलामच, अशी मानसिकताही तोंड वर करीत असल्याची उदाहरणे समोर येत आहे. कायदे महिलांच्या बाजूने आहेत आणि ते असायलाही हवे, मात्र, महिलांनीही त्याचा दुरुपयोग करायचा हे गंभीर नाही का, अशा सगळ्या प्रश्नांची उत्तरे शेवटी कुटुंब संस्कारातूनच यायला हवी. ▮

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# नागपूर अधिवेशन फडणवीसांना सोपं...!

**मोरेश्वर बडगे**

राज्य विधिमंडळाचे सहा दिवसांचे हिवाळी अधिवेशन येत्या १६ डिसेंबरपासून उपराजधानी नागपुरात सुरू होत आहे. अधिवेशन छोटेखानी असले, तरी त्याचे वेगळे महत्त्व आहे. विदर्भाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतरचे त्यांच्या गावातले हे पहिले अधिवेशन आहे. साहजिकच याकडे राज्याच्या आणि विदर्भाच्या नजरा लागल्या आहेत. नागपूर अधिवेशन म्हटले की, राजकारण तापते. देवेंद्र फडणवीस नशीबवान आहेत. नवा नवा मामला आहे. सरकारला धोका असण्याचा विषय नाही. सत्ताधारी महायुती सरकारला धारेवर धरता येईल असा कुठला विषय विरोधकांच्या हाती नाही. त्यामुळे नागपूरच्या गुलाबी थंडीत हुरडा पार्ट्या हाणण्याची पूर्ण संधी दोन्हीकडच्या आमदारांना आहे. छप्परफाड बहुमत घेऊन सरकार उपराजधानीत येत आहे. टेन्शन असेल तर विरोधकांना आहे. 'महाविकास आघाडी आणि काँग्रेस यांचे खासदार-आमदार आमच्या संपर्कात आहेत' असे सांगून प्रदेश भाजपाचे अध्यक्ष आणि आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाना पटोले यांची झोप उडवली आहे. झटपट महाआघाडीचे काही आमदार फुटतील अशातला भाग नाही. मुळात होतेच ५०. त्यातले समाजवादी पक्षाचे दोन आमदार केव्हाच बाहेर पडले आहेत. म्हणजे उरले ४८. तुम्ही पाहाल, पुढची निवडणूक येईल तेव्हा महाआघाडी रिकामी झालेली असेल! का थांबतील ते? विरोधी पक्षाच्या कुठल्याही आमदाराला केवळ निवडून येऊन भागत नाही. कामं करावी लागतात. त्यासाठी फंड खेचून आणावा लागतो. तो आता मिळेल काय? त्यामुळे विरोधी बाकांवर बसण्यात अर्थ नाही, हे बहुतेकांना लक्षात येईल. दुसराही फॅक्टर आहे. काँग्रेस म्हणा की उद्धव ठाकरे म्हणा, यांना माणसं सांभाळता येत नाहीत. शरद पवारसारख्या नेत्याला माणसं सांभाळता आली नाहीत. पुतण्यासह ४० आमदार फुटले. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन-दोन पक्ष फुटले. पक्ष फोडणे आणि तेही कायद्याच्या चौकटीत फोडणे तसे आता सोपे झाले आहे. ठाकरे सेनेचे २० आमदार यावेळी निवडून आले आहेत. यातल्या १४ आमदारांनी ठरवलं की भाजपात जायचे. जाऊ शकतात. आमदारकी टिकवून जाऊ शकतात. हेच भविष्यात होणार आहे. मग शरद पवारांचं काय? पवारांनी कधीही संघर्षाचे राजकारण केले नाही. 'जिधर बम, उधर हम' असेच त्यांचे राजकारण होतं. उद्धव ठाकरेंनीही हेच केलं. स्वतःचा पक्ष बुडवून मुख्यमंत्री झाले. सध्याच्या राजकीय हवेत तर विरोधकांचे आमदार फोडायचीही गरज नाही. थोडे थांबा. ते स्वतःहून फुटाण्यासारखे फुटतील. 'युतीत २५ वर्षे सडलो' असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. 'मी राहीन, नाहीतर तू राहशील' अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना ललकारले होते. उद्धव आता कुठे राहणार? महाआघाडीमध्ये तर सडायलाही नाही. मोठी दयनीय परिस्थिती आहे, विधानसभेत विरोधी नेतेपद मिळावे यासाठी विरोधकांना गयावया कराव्या लागत आहेत. हे काय सरकारला धारेवर धरतील? २९ आमदार असतील त्या पक्षाला विरोधी नेतेपद मिळते. यावेळी कुठल्याही विरोधी पक्षाला एवढ्या जागा जिंकता आल्या नाहीत. त्यामुळे किमान आघाडीचे नेते म्हणून विरोधी नेतेपद द्या, अशी विनवणी सुरू आहे. अर्थात तो निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना घ्यायचा आहे. फडणवीस देवाकडून नशीब घेऊन आले असावेत. २०१४ ते २०१९ या काळात सलग पाच वर्षे त्यांनी मुख्यमंत्रिपद टिकवलं. चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या शरद पवारांनाही हे जमले नाही. तो रेकॉर्ड फडणवीस पुन्हा करतील. तुम्ही लिहून ठेवा; पुढची निवडणूकही फडणवीस यांच्या नेतृत्वात लढली जाईल. राष्ट्रवादीचा जयंत पाटील यासारखा ज्येष्ठ नेता 'योग्य वेळी योग्य निर्णय' म्हणतो, याचा अर्थ स्पष्ट आहे.

विधानसभा निवडणुकीत यावेळी जनतेने भाजपाला डोक्यावर घेतले. १३२ जागा जिंकवून दिल्या. आणखी १३ जागा मिळाल्या असत्या तर स्वबळावर भाजपाची सत्ता असती. तेवढी फोडाफोडी भाजपाला सहज करता आली असती. पण भाजपा युती धर्माशी प्रामाणिक राहिला. भाजपाने महायुती करून निवडणूक लढवली. शिंदे सेना आणि अजित पवारांना सोबत घेतले होते. या दोघांसोबत भाजपाने सत्ता स्थापन केली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी खुल्या मनाने या निकालाचे स्वागत करायला हवे होते; पण तसे करतील तर ते शरद पवार कसले? चारी मुंड्या चित करणाऱ्या या निकालाने बिथरलेल्या शरद पवारांनी या निकालावरच आणि तो देणाऱ्या ईव्हीएमवरच संशय व्यक्त केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी हे गाव घेऊन पवारांनी रान पेटवले आहे. इथे शरद पवार यांच्या पक्षाचे उत्तम जानकर नावाचे आमदार निवडून आले. 'या गावात भाजपाला जास्त मतं मिळालीच कशी?' असा सवाल या आमदाराचा आहे. त्यासाठी त्याने गावात मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तो हाणून पाडला. त्यावरून शरद पवारांनी हे गाव आपल्या ईव्हीएमविरोधी आंदोलनाचे केंद्र बनवले आहे. मारकडवाडीचे हे आंदोलन मोठा राजकीय इश्यू करायचा नाद त्यांनी चालवला आहे. तसे पाहिले तर काँग्रेसच्या राज्यात ईव्हीएम म्हणजे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर मतदान घ्यायला सुरुवात झाली. सुरुवातीच्या दोन निवडणुका काँग्रेसने याच ईव्हीएमवर जिंकल्या होत्या. त्यावेळी कोणी ओरडले नाही. मात्र गेल्या तीन लोकसभा निवडणुका विरोधक सलग हरत आले आहेत. या काळात वेगवेगळ्या पातळीवर ईव्हीएमला विरोध झाला. सुप्रीम कोर्टापर्यंत लोक गेले. निवडणूक आयोगानेही साऱ्या शंका दूर केल्या. ईव्हीएमशी छेडछाड करता येत नाही हे आयोगाने वारंवार दाखवून दिले आहे. तरीही शरद पवारसारख्या मंडळींचे रडगाणे सुरू आहे. याचीही मोठी गंमत आहे; जिंकले तर ईव्हीएम चांगले, हरले तर घोटाळा, अशी विरोधकांची नौटंकी आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला ८० लाख मतं मिळूनही एकुलती एक चंद्रपूरची जागा मिळाली होती; पण कोणी ओरडले नाही. आता ओरडताहेत. कारण राजकारण आहे. शरद पवारांना ओरडायला दुसरा मुद्दाच नाही.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांना महाराष्ट्रात चांगल्या जागा मिळाल्या. शरद पवारांची कन्या सुप्रिया सुळे निवडून आल्या तेव्हा ईव्हीएमला कोणीही बोटं दाखवली नाहीत. भाजपानेही लोकसभेचा निकाल मानला. आता विधानसभेत मार बसताच विरोधकांची कोल्हेकुई सुरू आहे. शरद पवार संविधान वाचवण्याची भाषा करतात, पण संविधानाने निर्माण केलेल्या निवडणूक आयोगासारख्या संस्था संशयास्पद करू पाहतात. काहीही करून भाजपाला विरोध करायचा, देवेंद्र फडणवीस यांना अडचणीत आणायचे, हा या पवारांचा धंदा आहे. दोन वर्षांपूर्वी त्यांनी मनोज जरांगे पाटील नावाचा बागुलबुवा उभा केला. आता ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांना सरकारच्या अंगावर सोडले. तीन दिवस उपोषणाला बसवले. तरीही पत्ते उलटे पडत आहेत हे पाहून त्यांनी आता चक्क मतदान यंत्रालाच संशयास्पद बनवले आहे. समाजात कुठलीही गोष्ट विश्वासार्ह ठेवायची नाही असा हा गेम आहे, संभ्रमावस्था हा पवारांचा डीएनए आहे. शरद पवार स्वतःवर विश्वास ठेवत नाहीत. मतलब नसेल तर ईव्हीएमवर कसे ठेवणार? स्वतःभोवती संभ्रमाचे जाळे विणून पवारांनी इतकी वर्षे राजकारण केले. आता दुकान बंद झाले म्हणून सारी आदळआपट सुरू आहे. पण देवेंद्र फडणवीस या साऱ्यांना पूर्ण ओळखून आहेत. त्यांना पुरून उरतील. ज्या पद्धतीने फडणवीसांनी काम सुरू केले ते त्यांच्या प्रगल्भतेचे दर्शक आहे. विरोधकांनी फडणवीसांना टार्गेट केले होते, नाही नाही ते बोलले. मात्र आपण सुडाचे राजकारण करणार नाही. 'त्यांना माफ करून आपण बदल घेतला' असे फडणवीस म्हणाले आहेत. विरोधकांच्या टीकेला तोंड देण्यात वेळ न घालवता राज्याला पुढे नेण्याच्या कामात त्यांनी स्वतःला जुंपून घेतले आहे. कोपर्डी पीडितेच्या बहिणीच्या लग्नाची जबाबदारी घेतो, असा शब्द त्यांनी आठ वर्षांपूर्वी दिला होता. त्या शब्दाला फडणवीस जागले. त्या मुलीच्या लग्नाला त्यांनी हजेरी लावली. त्यातून त्यांच्यातल्या संवेदना लक्षात येतात. 'तू राहशील किंवा मी राहीन' असे उद्धव म्हणाले होते. त्यावर उत्तर देताना 'आपण सगळेच राहू' एवढे संयमी उत्तर फडणवीसांनी दिले. आक्रमक विरोधी नेता ते संयमी मुख्यमंत्री असे फडणवीसांचे हे सुखद दर्शन आहे. नागपूर अधिवेशनाने अनेक मुख्यमंत्र्यांना घाम फोडल्याचा इतिहास आहे. फडणवीस यावेळी नवा इतिहास लिहितील. ▮

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### पालकांच्या अपेक्षांचे ओझे!




शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे एकमेव महत्त्वपूर्ण साधन आहे. आपण एखादी गोष्ट शिकतो म्हणजे ती गोष्ट नीट जाणून घेतो. जिज्ञासेने सुरू होणारी शिकण्याची प्रक्रिया कौशल्याच्या ठिकाणापर्यंत नेऊन आपणास पोहोचवते. ती थांबत नाही तर अव्याहत सुरू राहते. अधिकाधिक जाणून घेण्याकडे आणि अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे शिकणाऱ्याचा प्रवास हा निरंतर सुरू असतो. या प्रवासात अधिकाधिक कौशल्य आपल्या अंगी शिदोरीरूपाने जमा करत अध्ययनार्थी पुढे आगेकूच करीत असतो. याचाच अर्थ एखादी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा आपणास शिकण्यास प्रवृत्त करते आणि याच इच्छेला मूर्त रूप दिल्यानंतर शिकण्याच्या प्रक्रियेतून कौशल्य आपल्या अंगी प्राप्त होत असतात. शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस अधोरेखित होत आहे. समाजसुधारकांनी, महापुरुषांनी, विचारवंतांनी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानाशिवाय जीवन व्यर्थ आहे आणि ज्ञान हे आपल्याला शिक्षणातून, साधनेतून मिळत असते. शिक्षणाच्या पद्धती या स्थल-कालपरत्वे बदलत जरी गेल्या असल्या, तरी अज्ञानाकडून ज्ञानाकडे हे शिक्षण पद्धतीचे मूळ उद्दिष्ट मात्र चिरंतन राहणार आहे. आपले मूल मोठे व्हावे अशी पालकांची इच्छा असते. पण या सुप्त इच्छेला अपेक्षांचे रूप देऊन त्याचे ओझे मुलांवर लादले जात आहे. इथे मात्र पालकांनी अधिक सावध राहण्याची आवश्यकता आहे. याचा अर्थ मुलांना एकट्याला निर्णय घेऊ द्या, त्यांच्या कुठल्याही निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करू नका असा अजिबात नाही तर ते निर्णय घेत असताना मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहून आपल्याकडे असलेली ज्ञानरूपी, अनुभवरूपी शिदोरी त्यांना प्रगतीसाठी साहाय्य ठरेल तिथे देत राहणे, सहवास व संवादातून जिव्हाळा वृद्धिंगत करणे, अविश्वासाने ओतप्रोत भरलेल्या या दुनियेत त्याचा हक्काचा मित्र होऊन योग्य समयी त्याचा आनंद वाढवत नेणारी अशी त्याची वाट निवडण्यास मदत करणे हे आदर्श पालकत्वाचेच लक्षण आहे. तरच पालकांच्या अपेक्षांचे मुलांवर ओझे राहणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### देवाभाऊंचा साधेपणा



महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साधेपणाचा एक प्रसंग मला आजही आठवतो. त्यावेळी देवेंद्र नागपूरचे महापौर होते. विकृतिशास्त्र प्रयोगशाळा पडोळे चौकात पडोळे हॉस्पिटल बिल्डिंगच्या खालच्या मजल्यावर रिंग रोडवर आहे. बाजूला त्यावेळी काकाजी उपाहारगृह होते. सकाळी प्रयोगशाळेत येताच उपाहारगृहातून भूक चाळवणारा सुगंध मनाला प्रसन्न करत असे. सकाळी तयार होणारा बटाटा-वडा आणि सावजी स्टाईल तर्री अनेक नामवंत डॉक्टरांना उपाहारगृहात येण्याचे आमंत्रण देत असे. एकदा सकाळी रुग्ण नसताना मी वाचत असताना भाजपाचे काही कार्यकर्ते उपाहारगृहात आले आणि महापौर नाश्ता करायला येत असल्याचे मालकांना सांगितले. मालकांनी दोन टेबल आणि चार बेंचेस स्वच्छ करायला सांगितले. १०-१५ मिनिटात देवेंद्र चार-पाच अधिकाऱ्यांसोबत उपाहारगृहात स्थानापन्न झाले. कुठल्याशा महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू होती. अधूनमधून देवेंद्र काही बाबी डायरीत लिहून घेत होते. उपाहारगृहातील पोऱ्याने गरमागरम बटाटा-वडा आणि सावजी तर्री देवेंद्रच्या समोर ठेवताच त्यांनी डायरी बंद करून बाजूला ठेवली आणि उदरभरणावर लक्ष केंद्रित केले. एक प्लेट संपताच उपाहारगृहातील पोऱ्याने दुसरी प्लेट विनम्रपणे आणून ठेवली. पँटच्या खिशातील रुमाल काढून देवेंद्रने तिखट खा□ल्याने आलेला घाम पुसला आणि दुसऱ्या प्लेटचा आस्वाद घेऊ लागले. मी प्रयोगशाळेतून हे सर्व बघत होतो. महापौर कुठलाही बडेजाव न ठेवता आपल्या अधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत एका अतिशय साध्या रस्त्यावरील उपाहारगृहात नाश्ता करीत होते. इतर पक्षातील छोटासा नेतासुद्धा प्रत्येक ठिकाणी नेतागिरी दाखवत असतो. महापौरपदी असतानादेखील सर्वांशी मिळून मिसळून राहणारे देवेंद्र नेहमीसाठी लक्षात राहिले. देवाभाऊंना कोटी कोटी शुभेच्छा!

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### आठ रस्ता चौकातील बेशिस्त अतिक्रमण

लक्ष्मीनगर येथील आठ रस्ता चौक हा विविध दुकानांनी वेढलेला आहे. चौक ओलांडून जाणे म्हणजे मोठे दिव्य असते. त्यातच सुपर मार्केटसमोर अस्ताव्यस्त वाहने पार्क केलेली असतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्व जण त्रस्त आहे. मध्यंतरी तक्रार केल्यानंतर थोडा फरक पडला होता. पण पुन्हा येरे माझ्या मागल्या असे झाले आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, ही अपेक्षा. ▮

**विजय देशपांडे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# दोन वर्षांपासून लाचखोरांवरील कारवाई घटली

## गतवर्षाच्या तुलनेत यंदा १५ टक्क्यांनी कारवाई कमी; बेहिशोबी मालमत्तेचे गुन्हे दाखल करण्यात पुणे, सोलापूर अव्वल

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

गेल्या दोन वर्षांपासून लाचखोरांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सुरू केलेला कारवाईचा धडाका कमी झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी प्रत्येक महिन्यात लाचखोरांवर होणाऱ्या कारवाईत घट होत आहे. त्यामुळे लाचखोरांवर कारवाई करण्यात एसीबी कमी पडत आहे की खरोखरच लाच घेण्याचे प्रमाण कमी झाले, असा प्रश्न निर्माण झाला आहे. १० डिसेंबरअखेरपर्यंत लाच घेताना ९३४ जणांना अटक करण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्यावर्षी कारवाईत १५ टक्क्यांनी घट झाली आहे. बेहिशोबी मालमत्तेप्रकरणी (अपसंपदा) गुन्हे दाखल करण्यामध्ये मात्र पुणे विभाग राज्यात अव्वल असून पुणे व सोलापूरमध्ये सर्वाधिक गुन्हे दाखल झाले आहेत.

राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) आणि नांदेड असे एकूण आठ विभाग आहेत. या विभागात असलेल्या जिल्ह्यात पोलिस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली जाते. राज्यात २०१२ पर्यंत लाच घेताना कारवाईचा आकडा पाचशेच्या जवळ होता. मात्र, 'एसीबी'चे प्रमुख म्हणून प्रवीण दीक्षित यांनी पदभार स्विकारल्यानंतर लाचखोरांवरील कारवाईचा वेग वाढला. 'एसीबी'ने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लाचखोरांना पकडण्याच्या योजना आखल्या. टोल फ्री क्रमांक, मोबाइल ॲप सारख्या सुविधा सुरू केल्या. 'एसीबी'ची वेबसाइट सोपी व सुटसुटीत केली. नागरिकांना वेबसाइटवरही तक्रारी करण्याची सोय केली. विभागप्रमुखांच्या बैठका घेऊन लाचखोरांवर कारवाई कशी वाढविता येईल, यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याचा परिमाण पुढील वर्षी दिसून आला. कारवाईचा पाचशेचा आकडा पुढील वर्षी १२०० वर पोहचला. मात्र, दीक्षित यांनी एसीबी प्रमुखांचा पदभार सोडल्यानंतर पुढच्या वर्षी काहीशा प्रमाणात कारवाईची संख्या कमी झाल्याचे दिसून आले.

या वर्षी प्रत्येक महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत कारवाईचा आकडा कमी होत असल्याचे दिसून आले आहे. १० डिसेंबरअखेरपर्यंत लाच घेताना ९३४ जणांना अटक केली आहे. या प्रकरणात ६४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी याच वेळी एक हजार ५९ जणांस अटक करून ७५६ गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यामुळे लाचखोरांवर कारवाईत घसरण होताना दिसत आहे.






### न्यायव्यवस्थेतही एसीबीची कारवाई...

सर्वसामान्य व्यक्तीला शासनाच्या कुठल्याही यंत्रणेकडून न्याय मिळाला नाही, तरी न्यायालयाकडून न्याय मिळण्याची अपेक्षा असते. परंतु, सातारा येथे लाखों रुपयांच्या लाचेप्रकरणी न्यायाधीशावरच एसीबीने कारवाई करून एक मोठे धाडसच दाखविले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांकडून न्यायाची अपेक्षा करायची तरी कोणाकडून याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

### महसूल विभाग अव्वल

'एसीबी'ने केलेल्या कारवाईत लाच घेण्यात महसूल विभाग हा प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून आले आहे. त्यानंतर पोलिस विभागाचा क्रमांक लागतो. गेल्या काही वर्षात महसूल व पोलिस विभाग सर्वाधिक लाचखोरांवर कारवाई करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

### अपसंपदेच्या कारवाईत पुणे विभाग अव्वल

बेहिशोबी मालमत्ता (अपसंपदा) जमविल्याप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईत पुणे विभाग अव्वल ठरला आहे. या विभागाकडून १३ गुन्हे दाखल करण्यात आले असून पुणे व सोलापूर कार्यालयाकडून प्रत्येकी ५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### नाशिक विभाग कारवाईत अव्वल

लाचखोरांवर कारवाई करण्यात नाशिक विभाग या वर्षी अव्वल ठरला आहे. तरीही गतवर्षीच्या मानाने या वर्षी नाशिक विभागाचा कारवाईचा आकडा कमीच आहे. गेल्या वर्षी नाशिक विभागात लाच घेतानाचे १५४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. या वर्षी १० डिसेंबर अखेरपर्यंत लाचखोरांवर १३९ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नाशिक विभागातही काही प्रमाणात लाचखोरांवर कारवाईत घट झाली आहे.

### पुणे विभाग कारवाई दुसऱ्या क्रमांकावर

लाचखोरांवर कारवाई करण्यात पुणे विभाग राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. चालू वर्षी १० डिसेंबर अखेरपर्यंत १२३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गेल्यावर्षी पुणे विभागात लाच घेतानाचे १३५ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे पुणे विभागातही काही प्रमाणात लाचखोरांवर कारवाईत घट झाली आहे.

### चिरीमिरीची प्रकरणे जास्त

लाच म्हणून चिरीमिरी घेण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले आहे. कमी लाच मागितल्यानंतर येणाऱ्या तक्रारी फारच अल्प असताना झालेली कारवाई मोठी आहे. तक्रारीत वाढ झाल्यास कमी लाच मागणाऱ्यांवर मोठी कारवाई होऊ शकते.

# अतिरिक्त शिक्षकांची नावे यादीतून गायब

## जि. प. माध्यमिक विभागाचा अजब कारभार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने प्रसिध्द केलेल्या जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या यादीमध्ये गेल्या चार ते पाच वर्षापासून अतिरिक्त झालेल्या त्या संबंधित शिक्षकांची नावे आले नसल्याने अनेक शिक्षकांनी हरकती घेतल्या आहेत. तर जवळपास ७९ शिक्षकांनी हरकती घेतल्या त्यातील ५९ हरकतीवरील सुनावणी पूर्ण झाली.

दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने हरकती घेतल्या होत्या. विभागाने अतिरिक्त शिक्षणाधिकारी यांनी शिक्षकांचे समायोजन या आलेल्या जवळपास करण्यासाठी यादी प्रसिध्द करून कोणा शिक्षकांच्या काही तक्रार आहे का त्याबाबत हरकती मागविले होते. त्यावर ७९ शिक्षकांनी ५९ हरकतीवरील पूर्ण केली आहे. मात्र बरेच शिक्षक गेल्या चार ते पाच वर्षापासून अतिरिक्त होऊन ते निवडणुक शाखेत काम करतात. अशा अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे यादीमध्ये नावेच आले नाहीत. वास्तविक पाहता एकीकडे जिल्ह्यातील अनेक शाळेत रिक्त पदाची मोठी संख्या असताना शिक्षकांना निवडणूक शाखेत कामाला जुंपले आहे. त्यामुळे अतिरिक्त झालेल्या परंतु सध्या निवडणुक शाखेत काम करीत असलेल्या शिक्षकांनी या यादीवर हरकती घेतल्या आहेत. या शिक्षकांचे वेतन चालू असले तरी आम्हाला विद्यार्थ्यांना शिकवू द्या त्यासाठी आमचेही नाव अतिरिक्त शिक्षकांच्या यादीमध्ये घेण्यासाठी हरकती घेतल्या आहेत. परंतु काही शिक्षकांच्या हरकतीवरील सुनावणी झाली तर काही शिक्षकांची झाली नसल्याने आता नव्याने माध्यमिक शिक्षण विभागाकडून अतिरिक्त शिक्षकांची यादी प्रसिध्द करणार आहे. दरम्यान माध्यमिक शिक्षण विभागाच्या कारभारावर काही शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. माध्यमिक विभाग कामात तत्पर नसून, वेळकाढू पणा केला जात असल्याचे सांगितले.

### १९ डिसेंबर रोजी शिक्षकांचे समायोजन

**आमच्याकडे जवळपास ७९ शिक्षकांच्या हरकती आल्या होत्या. त्यापैकी ५९ शिक्षकांची हरकतीवरील सुनावणी झाली असून नव्याने अतिरिक्त शिक्षकांची यादी प्रसिध्द करणार आहोत. त्यानंतर १८ते १९ डिसेंबरदरम्यान शिक्षकांचे समायोजन करणार आहोत.**

**-सचिन जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी**

### कमल बिराजदार यांचे निधन

**अक्कलकोट, दि. १२ डिसेंबर-**



कमल इरण्णा बिराजदार (वय ७५ ) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ४ मुली, सून, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या एस. एस. शेळके प्रशाला, वागदरी येथील सहशिक्षक प्रशांत इरण्णा बिराजदार यांच्या मातोश्री तसेच सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या मोठ्या भगिनी तर आ. सचिन कल्याणशेट्टी, मीलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी यांच्या त्या आत्या होत.



# ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन

### १७ खेळाडूंना शूज जोड्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ डिसेंबर-**

हाय-परफॉर्मन्स क्रिकेट अकॅडमी, बार्शी व वर्तमान हेल्थ केअर (हिरेमठ हॉस्पिटल), अमित इंगोले व सुमित प्रकाश जैन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सोजर मूकबधिर शाळा, खांडवी येथील १७ खेळाडूंना शूज जोड्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी आयोजित करण्यात आला.

अध्यक्षस्थानी सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. सुजित करपे सर, सोजर मूकबधिर शाळेचे भोसले सर होते. यावेळी जगदाळे सर, सचिन आवटे सर, पंकज मुळे, तसेच सोजर आयटीआयचे प्राचार्य कारंडे सर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या यशस्वी भविष्यासाठी प्रोत्साहन दिले.सामाजिक बांधिलकीतून प्रेरणा हाय-परफॉर्मन्स क्रिकेट अकॅडमीचे डायरेक्टर अमित इंगोले व सुमित प्रकाश जैन यांनी क्रीडाक्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना उभारी देण्यासाठी या उपक्रमाची संकल्पना मांडली. विद्यार्थ्यांनी, मुलांनी जास्तीत जास्त खेळाकडे लक्ष द्यावे, तसेच आपल्या शरीराकडे ही लक्ष द्यावे, खेळाडूंना उत्तम क्रीडा सुविधा व संधी मिळाव्यात, यासाठी त्यांनी आपली बांधिलकी व्यक्त केली. हा पाठिंबा त्यांना स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी निश्चितच प्रेरणा देईल.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **TRUPTI ARVINDRAO GIRGAONKAR** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **MANSI MADHAV JOSHI** KINDALY NOTE THE SAME.

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी ४१३४०१**
Email ID : am_barshi@msamb.com फोन : ०२१८४-२२२९७६

**जाहिर प्रसिध्दिकरण**

बार्शी व वैराग परिसरातील तमाम शेतकरी बांधवांना कळविण्यात येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब बाजार आवारामधील जनावर बाजारातील शेणचिपाड खत गोळा करुन घेवून जाण्यासाठीचा ठेका दोन वर्ष कालावधीकरिता द्यावयाचा आहे. या कामाकरिता निविदा माग विण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपल्या निविदा बंद लिफाफामध्ये दि. १९/१२/२०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयामध्ये सादर कराव्यात. उशिरा आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. याबाबतच्या सर्व अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयामध्ये पाहावयास मिळतील.

सही/- सचिव | सही/- मुख्य प्रशासक
**कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे मंद्रप येथील शेतजमीन १) गट नं. १३/४ क्षेत्र १हे-२०आर, आकार १रू-२० पैसे, २) गट नं.१९५/१अ, क्षेत्र १हे-०१आर, आकार २ रू.-३५पैसे, ३) गट नं. २०१/१, क्षेत्र १हे-४७आर, आकार ४रू-४५पैसे यासी चतु:सिमा पुर्वेस - गट नं. -, दक्षिणेस - गट नं. -, पश्चिमेस - गट नं. -, उत्तरेस : -.

ज्याअर्थी गंगाबाई मलकप्पा घाले, गुरूबसप्पा मलकप्पा घाले, गजानन मलकप्पा घाले, म्हाळप्पा मलकप्पा घाले सर्व रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांनी अप्पर तहसिल कार्यालय मंद्रुप येथे वर नमुद शेतजमीनीचे वाटप होवून मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्यादरम्यान वाटप करून देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत मे. अप्पर तहसिलदार, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांच्याकडे लेखी हरकत घेण्यात यावी. तसे न झाल्यास अर्जदार यांचा वाटपाचा अर्ज मंजूर करून त्यांचे दरम्यान वाटप होवून मिळेल. तद्नंतर कोणाची काही हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख :- /१२/२०२४

सही/-
**ॲड. सोमनाथ ए. सुतार**
**८५अ, उद्धव नगर भाग-१ ओमगर्जना चौक,**
**महालक्ष्मी मंदिराजवळ, विजापूर रोड,**
**सैफुल, सोलापूर मो.नं.९७६३९४२४९४**

**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**

**(मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)**

जा. ७०१४ क. दि. ११/१२/२०२४

रेणूका भवन
रेणूका भवन, २ मजला सर्वे नं ३५/२अ+२ब पुष्पक हॉटेल जवळ
पाईप लाईन रोड सावेडी अ.नगर, अहमदनगर ४१४ ००१

**जाहीर नोटीस**

**श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर** --- **अर्जदार**

**विरुध्द**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ४११०/२०२४ | | **कर्जदार - श्री अतिश राजेंद्र देशमुख** रा. देशमुख गल्ली, पानगाव बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **जामीनदार - श्री प्रवीण प्रभाकर मोरे** रा. डी.सी.सी. बँकजवळ सुहारा मोरे चौक, पानगाव, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **जामीनदार - श्री गणेश शहाजी मोरे** रा. सुहास मोरे चौक, पानगाव, बार्शी, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की अर्जदार यांनी तुमचेविरुध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक २१/१२/२०२४ रोजी ठिक सकळी ११.०० वा. लवाद कार्यलयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोद घ्या सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

शिक्का
सही/-
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**

**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

मौजे खेड, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर आसपासचे तमाम लोकांना व समस्त जनतेला या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खेड, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथील बिनशेती गट क्रमांक व उपविभाग ११६/१पै/प्लॉट नं. ७ गाव खेड (५६२१७८) तालुका उत्तर सोलापूर अकृषिक क्षेत्रापैकी बिनशेती ०.७४.४२ हा प्लॉट श्री. सुभाष यशवंत दोरकर यांचे मालकी वहिवाटीची असून सदर श्री. सुभाष यशवंत दोरकर यांनी येणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट त्यांचे प्रापंचिक अडचणी व लोकांची देणी देण्याकरिता विक्रीस काढले असून त्यांनी सदर मिळकत विक्री बाबत आमचे अशिल सौ. शकुंतला संजय सुरवसे व सौ. सोनम विशाल सुरवसे यांना बोलणी करुन विक्री करण्याचा करार केलेला आहे व सदर मिळकतीचे खरेदी व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून इसारा दाखल रक्कमही स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सबब सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, गहाणखत, दान, लिज, हिस्सा अगर कोणत्याही स्वरुपाचा हक्क असल्यास त्यांनी त्यांचा तशा स्वरुपाचा हक्क, हरकत खालील नमूद केलेल्या पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवावा. वरील मुदतीत कोणाची हरकत, तक्रार न आल्यास सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली ता. १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. अशोककुमार माणिकराव वाघमारे**
**बी.ए., एलएल.बी.**
**रा. गाळा नं. ६, नाथ प्राईड अपार्टमेंट,**
**सिव्हील हॉस्पिटलच्या मागे, धर्मादाय**
**आयुक्त कार्यालयाच्या खाली, सोलापूर.**
**मोबाईल नंबर ९८२२१८०५४० .**
**९२८४२१६८०१**

**खरेदीपुर्व नोटीसीचे हरकतीस खुलासा**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर येथील रहिवाशी यांना ॲडव्होकेट श्री. अशोक आर. जालादी, रा. सोलापूर यांनी दैनिक तरुण भारत सोलापूर मध्ये दि. ०६/१२/२०२४ रोजी आमचे अशिल श्री. अमित रविंद्र कांगरे, रा. ९०एच/४, भवानी पेठ, सोलापूर व श्री. प्रविण तुकाराम गायकवाड, रा. मु.पो. चितली, ता. खटाव, जि. सातारा यांनी दिनांक २९/११/२०२४ रोजी दैनिक संचार या वर्तमानपत्रात ॲड. अमोल कल्याणी कोटीवाले व ॲड. सुरजसिंग हरिसिंग लोधा, रा. सोलापूर यांचे खरेदीपुर्व जाहीर नोटीसीस हरकत, उत्तर व प्रतिनोटीसीस खुलासा येणेप्रमाणे असे.

सदर खरेदीपुर्व नोटीसीस घेतलेली हरकत ही खोटी, लबाडीची व दिशाभुल करणारी असून, बेकायदेशीर आहे. डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील भवानी पेठ येथील मिळकत टी.पी. नं. २ फायनल प्लॉट नं. ९०एच/४, यांसी मिळकत क्र. ०५६२३८ एकूण क्षेत्र २४०.४ चौ.मी. पैकी श्रीमती राजश्री कांगरे यांचे ३७.१७ चौ.मी. लगत पश्चिमेकडील (म्हणजे एकूण क्षेत्राचे मध्यभागाची) जागा यांसी क्षेत्र ४०० चौ.फुट किंवा ३७.१७ चौ.मी दि.१६/१०/२०१५ रोजी आमचे अशिलांने रजिस्टर खरेदीखत क्र. ७३९०/२०१५ अन्वये फार मोठी रक्कम देवून खुषखरेदी घेतलेले आहे व सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलाचा प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे.

सदर खरेदीपुर्व जाहीर नोटीसीस हरकत मध्ये केलेले कथन की, आमचे अशिलास पोकळ खरेदीखत लिहून दिले आहे. व्याजाने घेतलेले पैसे परत केले आहे. वगैरे संपुर्ण मजकुर खोटा व दिशाभुल करणारा असून, आमचे अशिलास मान्य व कबुल नाही. आमचे अशिल श्री. प्रविण तुकाराम गायकवाड हे कायदेशीर मालक आहेत व त्यांना त्याचे मर्जीप्रमाणे सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार आहे.

कोणाचीही दिशाभुल होवू नये म्हणून हा खुलासा दिला. ता. १२/१२/२०२४

सही/-
**अशिल**

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**सही/-**
**डब्ल्यु.बी. खान**
**बी.कॉम.(ऑनर्स) एल.एल.बी. (स्पे.)**
**४४, लायर्स चेंबर, सोलापूर-३**
**मो.९३२६०७२५९४**

**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

मौजे खेड, तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर आसपासचे तमाम : लोकांना व समस्त जनतेला या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खेड, तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथील बिनशेती गट क्रमांक व उपविभाग ११६/१पै/प्लॉट नं. १८ गाव खेड (५६२१७८) तालुका उत्तर सोलापूर अकृषिक क्षेत्रापैकी बिनशेती ०.७४.४२ हा प्लॉट नरसिंह शामसुंदर देशपांडे यांचे मालकी वहिवाटीची असून सदर नरसिंह शामसुंदर देशपांडे यांनी येणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट त्यांचे प्रापंचिक अडचणी व लोकांची देणी देण्याकरिता विक्रीस काढले असून त्यांनी सदर मिळकत विक्रीबाबत आमचे अशिल सौ. शकुंतला संजय सुरवसे व सौ. सोनम विशाल सुरवसे यांना बोलणी करुन विक्री करण्याचा करार केलेला आहे व सदर मिळकतीचे खरेदी व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून इसारा दाखल रक्कमही स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सबब सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, गहाणखत, दान, लिज, हिस्सा अगर कोणत्याही स्वरुपाचा हक्क असल्यास त्यांनी त्यांचा तशा स्वरुपाचा हक्क, हरकत खालील नमूद केलेल्या पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवावा. वरील मुदतीत कोणाची हरकत, तक्रार न आल्यास सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली.

ता. १२/१२/२०२४

सही/-
**ॲड. अशोककुमार माणिकराव वाघमारे**
**बी.ए., एलएल.बी.**
**रा. गाळा नं. ६, नाथ प्राईड अपार्टमेंट,**
**सिव्हील हॉस्पिटलच्या मागे, धर्मादाय**
**आयुक्त कार्यालयाच्या खाली, सोलापूर.**
**मोबाईल नंबर ९८२२१८०५४० .**
**९२८४२१६८०१**

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
**नवी पेठ, शाखा**
**पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

**मागणी नोटीस U/S 13(2)**
**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस**

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ.क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार) श्री. आशिष अनिल चिलका (मयत) कायदेशीर वारसदार सौ. रेशमा आशिष चिलका १) सिटी हॉस्पिटल समोर, १६२/२२, चिलका ब्लॉक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, रेल्वे लाईन्स, उत्तर सोलापूर, सोलापूर – ४१३००१ फो. नं. ९३७१२५२७७७ २) फ्लॅट नं. ३०२, तिसरा मजला, दंडोत्री महाराज मठ समोर, रेल्वे लाईन्स, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर ४१३००२, मो. ९२२५८३२३०० | १०/१२/२०२४ / ०९/१२/२०२४ | रु. ४१,६०,०००/- | ९८६२०६००००२४४९ / गृह कर्ज / ९.३५% | रु. ४१,८७,११६.४३ + दि. ०९/१२/२०२४ पासूनचे व्याज + इतर खर्च; एकुण येणे रक्कम रु. ४१,८७,११६.४३ (रुपये एकेचाळीस लाख सत्याऐंशी हजार एकशे सोळा रुपये आणि त्रेचाळीस पैसे) त्यावरील व्याज, दंडात्मक व्याज आणि प्रासंगिक खर्च व किंमत | मालमत्ता - सी.टी.एस.नं. ८३९१/१४सी/४, महापालिका घर नं. १६२/१२ एकुण क्षेत्रफळ ४७४.९१ चौ.मी. यापैकी तिसऱ्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक ३०२ कारपेट एरिया क्षेत्र. ७८.३९ चौ. मी. आणि त्याचे बिल्टअप क्षेत्रफळ ९८.०० चौ.मी. सोबत तळमजला पार्किंग क्षेत्रफळ ८.५ चौ.मी. 'रेसिडेन्सी अपार्टमेंट'' मधील, दंडोत्री महाराज मठ जवळ, रेल्वे लाईन्स, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर - ४१३००२ चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्वेस - ॲप्रोज रोड पश्चिमेस - ओपन टु स्काय उत्तरेस - ओपन टु स्काय दक्षिणेस - फ्लॅट नं. ३०१ |
| २. | सौ. रेशमा आशिष चिलका (सह-अर्जदार) १) सिटी हॉस्पिटल समोर, १६२/२२, चिलका ब्लॉक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, रेल्वे लाईन्स, उत्तर सोलापूर, सोलापूर – ४१३००१ फो. नं. ९३७१२५२७७७ २) फ्लॅट नं. ३०२, तिसरा मजला, दंडोत्री महाराज मठ समोर, रेल्वे लाईन्स, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर पिन नं. ४१३००२, मो. ९२२५८३२३०० | | | | | |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

**दिनांक - १०-१२-२०२४,**
**स्थळ - सोलापूर**
(मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)
सही/–
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडौदा**

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
**नवी पेठ, शाखा**
**पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

**परिशिष्ठ IV (नियम - ८(१)) प्रतिकात्मक ताबा नोटीस**

ज्या अर्थी, खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सेक्शन १३(१२) कलमाखाली व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **सौ. सोनल सौदागर फडतरे, सौदागर फडतरे यांची पत्नी, आणि श्री. सौदागर चंद्रकांत फडतरे, चंद्रकांत नामदेव फडतरे यांचा मुलगा राहणार १६०/१८, जुनी विष्णु मिल चाळ, डोणगांव रोड, उत्तर सोलापूर, सोलापूर महाराष्ट्र, पिन ४१३००१ यांना दिनांक १०/०७/२०२४ रोजी मागणी नोटीस बजावली** होती की त्यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु. २१,११,४२१.०० (अक्षरी - एकवीस लाख अकरा हजार चारशे एकवीस रुपये) + व्याज + इतर खर्च** हे या नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरले असल्याने विशेषकरुन कर्जदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी त्यांना / तिला सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) चा रुल ८ अंतर्गत अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा दि. १२/१२/२०२४ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

(सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.)

विशेष करुन कर्जदार, आणि जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो बँक ऑफ बडोदा यांना येणे रक्कम रु. २२,१८,९९३.१८/–**(अक्षरी - बावीस लाख अठरा हजार नऊशे त्र्याण्णव रुपये आणि अठरा पैसे फक्त) दि. १२/१२/२०२४ पासूनचे इतर खर्च + व्याज** यांच्या अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल फ्लॅट नं. ९, दुसऱ्या मजल्यावर असलेल्या घराचा समावेश आहे, ''अलंकार अपार्टमेंट'' एस. क्रमांक ३६०/ए/२एच/३, सब प्लॉट क्र. २० (७/१२ उतारा एस.क्र. नुसार ३२/१/२/एच/३/प्लॉट क्र.२०/पी) वेल्लूर नगर, आर.टी.ओ. ऑफिस रोड, नेहरु नगर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर – ४१३००४ आणि सौ. सोनल सौदागर फडतरे आणि श्री. सौदागर चंद्रकांत फडतरे यांच्या मालकीचे आहे.

**खालीलप्रमाणे फ्लॅटच्या सीमा :**

चतु:सीमा : उत्तरेस : फ्लॅट नं. १० दक्षिणेस : ओपन स्काय
पुर्वेस : फ्लॅट नं. ८ पश्चिमेस : ओपन स्काय

**खालीलप्रमाणे प्लॉटच्या सीमा :**

चतु:सीमा : उत्तरेस : प्लॉट नं. १९ दक्षिणेस : प्लॉट नं. २१
पुर्वेस : सुंदरम नगर पश्चिमेस : ८० फुट ले-आऊट रोड

दिनांक : १२/१२/२०२४
स्थळ : सोलापूर
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/-
**राजेश कुमार सिन्हा**
अधिकृत अधिकारी - बँक ऑफ बडोदा

## संक्षिप्त वृत्त



### सोलापूरचा समाधान पुणेकर मॅचेस्टर श्रीचा मानकरी

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

इचलकरंजी येथे झालेल्या मॅचेस्टर श्री २०२४ या पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव स्पर्धेत येथील समाधान पुणेकर हा मानकरी ठरला. त्याला १० हजार रुपयाचे रोख बक्षीस, सन्मान चिन्ह व मानाचा पटटा देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत विविध वजनी गटात येथील ६ स्पर्धकांना बक्षीस मिळाली. परिक्षक म्हणून येथील प्रमोद काटे, शकिल बडेघर उपस्थित होते. त्यांचे सोलापूर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, अजित कंडरे, मनोज भागवत, नजीर शेख यांनी अभिनंदन केले आहे.

**सोलापूरचे विजयी खेळाडू :** ५५ किलो-आतील रितेश परप्पा, ६० किलो-जुनैद बागवान, योगेश गवारे, ६५ किलो-संकेत विभूते, ७० किलो-निखिल चव्हाण, समाधान पुणेकर.

### राज्य नेमबाजी स्पर्धेत म्हसवडच्या आसावरी मेळावणेला कांस्य पदक

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**



मेरी माता हायस्कूल अँड ज्युनि कॉलेज म्हसवडच्या आसावरी सतीश मेळावणे हिने छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या राज्य शालेय नेमबाजी स्पर्धेत दहा मीटर ओपन साईट रायफल मध्ये १७ वर्षाखालील मलींच्या गटात ४०० पैकी ३४२ गुण मिळवत स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. या कामगिरीवर तिची २० ते २४ डिसेंबर दरम्यान इमराल्ड हाइट्स इंटरनॅशनल स्कूल इंदोर, मध्यप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेकरिता पात्रता मिळवली. तिला क्रीडाशिक्षक संतोष खासबागे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य फादर सनु, सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, क्रीडा अधिकारी सुमित पाटील, रवी पाटील, फादर रॉबिन, उपप्रचार्य स्मिता आनंद आदींनी अभिनंदन केले.



### न्यू हायस्कूल सलगरवाडी येथे क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

मागास समाज सेवा मंडळ नेहरूनगर संचलित न्यू हायस्कूल सलगरवाडी सोलापूर येथे क्रीडा सप्ताहात सुरुवत झाली. याचे उद्धाटन जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी केले. यावेळी वैजिनाथ हत्तुरे, संतोष खेंडे, नागेश गायकवाड, राम वाकसे, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण आदी उपस्थित होते. प्रास्ताविक क्रीडाशिक्षक प्रकाश पवार यांनी केले. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना क्रीडा सप्ताहनिमित्त शपथ देण्यात आले. त्यानंतर कबड्डीचा प्रदर्शनीय सामना घेण्यात आला. सूत्रसंचालन नंदकुमार व्हनमोरे व आभार राहुल पोटफोडे यांनी केले.



### के. एल.ई. प्रशालेचा तनुज संचेटी राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेत तृतीय

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

के.एल.ई. प्रशालेतील तनुज संचेटी याने सॉफ्ट टेनिस स्पर्धे तृतीय स्थान मिळविले. या कामगिरीवर त्याची मध्य प्रदेशात डिसेंबर २०२४च्या अखेरीस होणाऱ्या १४ वर्षाखालील मुलांच्या राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली. तनुज याचे प्राचार्य सतीश हिरेमठ यांनी अभिनंदन केले.




### संगमेश्वर कॉलेजच्या आकृती सोनकुसरे, ईशान मेरू यांची निवड

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

बारामती येथे झालेल्या १९ वर्षाखालील गटामध्ये शालेय राज्य लॉन टेनिस स्पर्धेत संगमेश्वर महाविद्यालयाती वाणिज्य शाखेची आकृती सोनकुसरे हिने उपविजेतेपद संपादिले. या कामगिरीवर तिची शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली ईशान मेरू यानेही चांगली कामगिरी बजावत सहभाग नोंदवला. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंट यांनी अभिनंदन केले

# भारताचा डी. गुकेश बुद्धिबळ जगज्जेता



◆ **सिंगापूर, १२ डिसेंबर**

भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेशने गुरुवारी सिंगापूरमधील रिसॉर्ट्स वर्ल्ड सेंटोसा येथे आयोजित २०२४ फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या १४ व्या फेरीत विद्यमान विजेत्या चीनच्या डिंग लिरेनचा पराभव करून जगज्जेतापदाचा मान मिळविला.

स्पर्धेतील १४ व्या व शेवटच्या फेरीत क्लासिकल टाइम कंट्रोल डाव अनिर्णीत स्थितीकडे जात असताना डिंग लिरेनने ५५ व्या चालीत एक घोडचूक केली व त्याची घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली व गुकेशने बाजी मारली.

१४ डावानंतर गुकेशने डिंग लिरेनचा ७.५-६.५ अशा गुणांनी पराभव केला.

विश्वनाथन् आनंदनंतर गुकेश आता भारताचा दुसरा विश्वविजेता ठरला आहे. गुकेश हा केवळ १८ वर्षांचा असून तो जगातील सर्वात तरुण विश्वविजेता ठरला आहे. गुकेशने रशियाच्या गॅरी कास्पोरोव्हचा विक्रमही मोडीत काढून सर्वात तरुण विश्वविजेता होण्याचा पराक्रम केला. गुकेशची कामगिरी ही भारतीयांसाठी अभिमानास्पद ठरली आहे.

गुकेश हा सर्वात तरुण विश्वविजेता ठरला आहे. तसेच अशी कामगिरी करणारा तो दुसरा भारतीय खेळाडू ठरला. त्याच्या आधी विश्वनाथन् आनंद २०१२ मध्ये बुद्धिबळ विश्वविजेता झाला होता. गुकेशने याआधी वयाच्या १७ व्या वर्षी फिडे कॅण्डि?डेट ही मानाची बुद्धिबळ स्पर्धाही जिंकली होती.

डी. गुकेश याचे पूर्ण नाव डोमराजू गुकेश असून तो चेन्नईचा रहिवासी आहे. गुकेशचा जन्म ७ मे २००६ रोजी चेन्नई येथे झाला. त्याने वयाच्या ७ व्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. त्याला सुरुवातीला भास्कर नागय्या यांनी प्रशिक्षण दिले. नागय्या हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बुद्धिबळपटू आहेत तसेच ते चेन्नईमध्ये होम चेस ट्यूटर आहेत. त्यांच्यानंतर विश्वनाथन् आनंदने गुकेशला खेळाची माहिती देण्याबरोबरच त्याला प्रशिक्षणही दिले. गुकेशचे वडील डॉक्टर असून आई व्यवसायाने मायक्रोबायोलॉजिस्ट आहे.

#### पंतप्रधान मोदींनी केले गुकेशचे अभिनंदन



डी. गुकेशने विश्वविजेतेपदाचा मान पटकावल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला व गुकेशचे अभिनंदन केले. डी. गुकेशचा हा विजय, ऐतिहासिक आणि अनुकरणीय! डी. गुकेशचे त्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन. त्याच्या अतुलनीय प्रतिभा, कठोर परिश्रम आणि अविचल जिद्द यांचे हे फळ आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

#### अभिमानाचा क्षण : आनंद

तुझे विश्वविजेतेपद हे बुद्धिबळासाठी हा अभिमानाचा क्षण आहे, भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे आणि माझ्यासाठी हा अभिमानाचा वैयक्तिक क्षण आहे. डिंगने अतिशय रोमांचक सामना खेळला आणि तो विजेता असल्याचे दाखवून दिले, असे पाच वेळचा विश्वविजेता भारतीय ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन् आनंद म्हणाला.

#### एका पिढीला मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली : बिंद्रा

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्रानेही डी. गुकेशचे अभिनंदन केले. गुकेश, जागतिक बुद्धिबळ विजेता झाल्याबद्दल अभिनंदन! तुमचे तेज, दृढनिश्चय आणि दबावाखाली कृपा, यामुळे संपूर्ण देशाला तुझा अभिमान वाटला. तुम्ही केवळ विश्वविजेतेपद जिंकले नाही, तर एका पिढीला मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली. तुम्हाला पुढील यशासाठी शुभेच्छा!, असे अभिनव बिंद्राने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)

# त्रिशा-गायत्रीचा दुसऱ्या सामन्यात विजय

**बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्स ● उपांत्य फेरीच्या आशा उंचावल्या**



त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद

◆ **हॅण्गझोऊ, १२ डिसेंबर**

येथे सुरू असलेल्या बीडब्लूएफ वर्ल्ड टूर फायनलमध्ये गुरुवारी दुसऱ्या गट साखळी लढतीत त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या भारतीय महिला दुहेरी जोडीने परली टॅन व थिनाह मुरलीधरन या मलेशियन जोडीवर सरळ गेममध्ये विजय नोंदवला. या विजयाबरोबरच भारतीय जोडीने आपल्या उपांत्य फेरीच्या आशा जिवंत ठेवल्या.

हंगाम संपलेल्या स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या एकमेव भारतीय त्रिशा व गायत्रीने आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा अवघ्या ४६ मिनिटांत २१-१९, २१-१९ असा पराभव केला.

याआधी बुधवारी, भारतीयांना त्यांच्या पहिल्या गट साखळी सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या चीनच्या लिऊ शेंग शू व टॅन निंग या जोडीकडून पराभव पत्करावा लागला होता.

पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या शेंग-टॅनने त्रिशा-गायत्रीवर २०-२२, २२-२०, २१-१४ अशी मात केली.

भारतीय सध्या चीनच्या मागे दुसऱ्या स्थानावर आहेत व त्यांना उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी शुक्रवारी नामी मात्सुयामा आणि चिहारू शिदा या जपानी जोडीविरुद्ध विजय मिळवावा लागेल.

त्रिशा व गायत्रीने आक्रमक सुरुवात केली आणि ६-२ अशी आघाडी मिळवली, मात्र त्यानंतर मलेशियाने चिवट झुंज देत सामन्यात परण्याचा प्रयत्न केला, भारतीयांनी शेवटच्या टप्प्यात आपला संयम राखसा,. परंतु त्यांना हिला गेम गमवावा लागला. घातला.

मलेशियाने निसटती आघाडी घेण्यापूर्वी पहिल्या पाच गुणांपर्यंत दुसरा गेमही चुरशीचा ठरला. पुन्हा १९ गुणांपर्यंत चुरशीची लढत झाली व त्यात बाजी मारत सामन्यात बरोबरी साधली. तिसरा गेमही अटीतटीचा झाला व भारतीय खेळाडूंनी पुन्हा एकदा आपल्ली शक्ती व कौशल्य पणाला लावून दोन गुणांनी गेमसह सामना जिंकला.

(वृत्तसंस्था)

# श्री सिद्धेश्वर स्कूलचे मुले विजेते

**पुणे विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेतील कामगिरी : मुली उपविजेत्या**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलांच्या संघाने पुणे विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

देहरे (अहिल्यानगर) येथे झालेल्या या स्पर्धेत सिद्धेश्वर स्कूलने १७ वर्षाखालील मलांच्या गटात ही कामगिरी केली. या कामगिरीवर हा संघ जळगाव येथे होणाऱ्या शालेय राज्य डॉजबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला. तसेच स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद संपादले. विजेत्या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले व वेदांत पवार यांनी मार्गदर्शन केले. संघाचे श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षक नीता तमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

**विजेता संघ :** अवधूत कांबळे, यज्ञेश्वर पाटील, ऋतुराज जाधव, रितेश पवार, साकल्य चव्हाण, शार्दुल फडतरे, उत्कर्ष कैरमकोंडा, वेदांत रंगापुरे, वीरेश कराळे, शिवकुमार निमगल, मयूर धनशेट्टी, कृष्णा मुळुक.

**उपविजेता संघ :** अमृता शृंगारपुरे, नंदिता नंदुरकर, मिताली पाटील, रितिका पवार, वैष्णवी लोंढे, ऋतिका सलगर, आनंदी मदनशेट्टी, संध्या गुब्याडकर, श्रेया पुकाळे, आर्या तानवडे, काव्यांजली सुतार.



# संभाजीराव शिंदे विद्यामंदिर मध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

जुनी मिल कंपाऊंडमधील संभाजीराव शिंदे विद्यामंदिर क्रीडा सप्ताह सुरू झाला. याचे उद्धाटन संस्था सदस्या डॉ. राधिकाताई चिलका मॅडम, राष्ट्रीय हॉलीबॉल खेळाडू सुदेश सुरेश मालप, आंतरराष्ट्रीय चित्रकार सचिन खरात यांच्या हस्ते करण्यात आले.

सुरुवातीस शिक्षण महर्षी स्व. विष्णुपंत कोठे व विद्येची देवता सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन आणि क्रीडा सप्ताहाचे क्रीड ज्योत प्रज्वलीत करण्यात आली. प्रास्ताविक माध्यमिक विभागाचे प्र. मुख्याध्यापक सचिन ढोपरे, माजी मुख्याध्यापक नागेश कुमार काटकर यांनी केले.

मुख्याध्यापक सचिन ढोपरे यांनी प्रास्ताविक केले. प्राथमिकच्या मुख्याध्यापिका राजश्री नारायणकर यांनी आभार मानले. सूत्रसंचालन मुकुंद ताकमोगे यांनी केले.

# गांधी नाथा रंगजी विद्यालयास तिहेरी मुकुट

**शालेय आट्यापाट्या स्पर्धेतील कामगिरी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १४ वर्षाखालील मुली, १७ वर्षांखालील मुले आणि १९ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. या तिन्ही संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच त्यांच्या १४ वर्षाखालील मुलांनी उपविजेते तर १९ वर्षाखालील मुलांनी तृतीय स्थान मिळविले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत व क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांनी विजेता खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले आहेत व पुणे विभागीय स्पर्धेस हार्दिक शुभेच्छा देण्यात आले आहे. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

**विजेते संघ : १४ वर्षाखालील मुली :** सोनाली ढगे (कर्णधार), समृद्धी दहिहंडे, धनश्री कांबळे, स्नेहा पाथरूट, प्रतिक्षा गजधाने, अक्षरा शिंदे, अक्षता रणसुबे, सान्वी कदम, भाग्यश्री चिनकेरी, सान्वी कदम, प्रगती पवाडे, समृद्धी पुजारी.

**१७ वर्षाखालील मुले :** यशराज घुले (कर्णधार), समर्थ सपाटे, गोविंद मुद्दे, अथर्व सुरवसे, प्रतिक थोरात, श्री क्षीरसागर, गणेश वावरे, सार्थक थोरात, कृष्णा परदेशी, रोहन घुले, पार्थ शिंदे, प्रथमेश अलकुंटे.

**१९ वर्षाखालील मुली :** कादंबरी लोकरे (कर्णधार), साक्षी जिडगे, जयश्री आळंदकर, कावेरी शिंगाडे, समृद्धी मुटकुळे, वैष्णवी गुजले, नंदिनी दहिहंडे, वैष्णवी ढेगळे, क्षिप्रा तडकासे, समृद्धी ढेरे, समृद्धी जाधव, आदिती जवान.

# भारताच्या भामिदीप्ती, यमलापल्ली यांचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**ओॲसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती, सहजा यमलापल्ली या भारतीय खेळाडूंनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत दुसऱ्या फेरीत भारताच्या पाचव्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने थायलंडच्या पुनिन कोवापिटुकटेडचा ६-३, ३-६, ६-१ असा तीन सेटमध्ये पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारताच्या सहजा यमलापल्ली हिने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत क्वालिफायर लालित्या कल्लुरीचा ६-१, ६-० असा सहज पराभव केला.

थायलंडच्या बुन्यावी थामचैवत हिने ग्रीसच्या सातव्या मानांकित व्हॅलेंटिनी ग्रामम तीकोपौलोचा ६-४, ६-२ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. सहाव्या मानांकित रशियाच्या एकतेरिना याशिना हिने भारताच्या हुमेरा बहारमुसचे आव्हान ६-२, ६-१ असे संपुष्टात आणले.

लात्वियाच्या आठव्या मानांकित डायना मार्सिन्केविकाने भारताच्या वैष्णवी आडकरचा ७-५, ३-६, ७-५ असा पराभव करून आगेकूच केली.

#### दुहेरीत आडकर व यमलापल्ली उपांत्य फेरीत

दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या आकांक्षा नित्तूरे व सोहा सादिक यांनी हुमेरा बहरामूस व पूजा इंगळे यांचा ०-६, ६-३, १२-१० असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. भारताच्या वैष्णवी आडकर व सहजा यमलापल्ली या जोडीने दुसऱ्या मानांकित पोलंडच्या झुझाना पावलीकोव्स्का व फ्रांसच्या तियांसोआ सारा राकोटोमांगा राजोनाह यांचा ६-४, ३-६, ११-९असा पराभव केला.

#### दुहेरी: उपांत्यपूर्व फेरी:

थासापोर्न नाकलो(थायलंड)/ बुन्यावी थामचैवत(थायलंड)वि.वि. ईश्वरी म ाथेरे(भारत)/ यशस्विनी पन्वर(भारत) ६-१, ६-४.

व्हिएरा डीपर्म(थायलंड)/मधुरिमा सावंत(भारत)वि.वि.स्प्रिती भसीन(भारत)/श्राव्या शिवानी चिल्कालापूडी(भारत) ३-६, ७-६(५), १०-७.

#### आजचे अन्य निकाल: दुसरी फेरी: एकेरी


झिबेक कुलंबायेवा (कझाकस्तान) ४ वि. वि. एकतेरिना काझिओनोव्हा (रशिया) ६-४, ७-५.

थासापोर्न नाकलो (थायलंड)वि. वि. इवा गरकुशा (रशिया) ६-४, ६-२.

टियांसोआ सारा राकोटोमांगा राजोनाह(फ्रांस)३वि.वि.आकांक्षा नित्तूरे(भारत) ४-६, ७-५, ७-६(७).



सहजा यमलापल्ली-१३



श्रीवल्ली रश्मिका-१३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शरदचंद्र पवार यांच्या वाढदिनी नरसिंग गिरजी चाळीमध्ये वृक्षारोपण

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शरदचंद्र पवार यांच्या ८५ वाढदिवसानिमित्त नरसिंग गिरजी चाळीमध्ये पाच वडाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास ज्येष्ठ नेते भारत जाधव, पक्षाचे अध्यक्ष सुधीर खरटमल, दशरथ सलगर, राजन परदेशी, लक्ष्मण जगताप, गरड उपस्थित होते. विजय भोईटे यांनी आभार मानले.



**सोलापूर : लिंगायत समाजाचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकासाला ताकद मिळावी, यासाठी लिंगायत समाजातील आमदारला फडणवीस सरकारने कॅबिनेट मंत्री करावे, अशी माणगी लिंगायत समाज विकास प्रबोधन समितीचे अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांनी शिष्टमंडळसह केली.**

### २४ डिसेंबरला नृत्यरामायण कार्यक्रम

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

ज्ञानेश्वर प्रतिष्ठान संचलित सुयश गुरुकुलच्या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त अजरामर अशा गीत रामायणावर आधारित बॅले नृत्याविष्कार नृत्यरामायण कार्यक्रमाचे आयोजन २४ डिसेंबर संध्याकाळी ठीक ६ वाजता विजयपूर रोड येथील सुयश गुरुकुल येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ४०० पेक्षा अधिक मुलामुलींचा समावेश आहे. राम जन्मापासून ते रामराज्याभिषेकापर्यंत हे रामायण आपणास सुंदर अशा नृत्याविष्कारातून अनुभवयास मिळणार आहे. याचे दिग्दर्शन भोपाळ येथील प्रख्यात रंग निर्देशिका, बॅले नृत्यकार वैशालीजी गुप्ता यांनी केले आहे.




### एमकेसीएलतर्फे बार्शीच्या प्राइम कॉम्प्युटर्सचा पुरस्काराने गौरव

**बार्शी, दि. १२ डिसेंबर-**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) च्या वतीने उत्कृष्ट पायाभूत सुविधा केंद्र वार्ड बार्शीतील प्राईम कॉम्प्युटर्सला मिळाला आहे. एमकेसीएलची वार्षिक सभेत एमकेसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका वीणा कामत यांचे हस्ते प्राईम कॉम्प्युटर्सचे संतोष कोल्हे व अनुराधा कोल्हे यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. प्राईम कॉम्प्युटर्सचे २५ वे रौप्य महोत्सवी वर्ष नुकतेच पूर्ण झाले असून एमएस-सीआयटी, एमकेसीएलकडून सातत्याने विविध पुरस्कारांनी सन्मानित झाले आहे. प्राईम कॉम्प्युटर्सने विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रशिक्षण, शासनाकडून आलेले वेगवेगळे प्रशिक्षण यासह विविध उपक्रम राबवले आहेत. यावेळी लोकल लीड सेंटरचे रोहित जेऊरकर, विभागीय समन्वयक महेश पत्रीके, महामंडळाचे अमित रानडे, अतुल पतौडी, कुंभार, कौशल आदी उपस्थित होते.

### केंगनाळकर वीटभट्टीजवळील विहिरीत पडून एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

शहरातील स्वागत नगरातील केंगनाळकर वीटभट्टीजवळील विहिरीत पडून एकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सायंकाळी उघडकीस आली. आनंद सुदर्शन गुंडेटी (वय ४६, रा. महानंदा नगर, गवळी प्लॉट नं. ४, सोलापूर) मरण पावलेल्याचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी स्वागत नगरातील केंगनाळकर वीटभट्टीजवळील विहिरीत आनंद गुंडेटी हे बेशुध्दावस्थेत पाण्यावर तरंगताना मिळून आले. त्यामुळे त्यांना एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जी आर पवार यांनी विहिरीतून बाहेर काढून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी आनंद यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. तुषार मेढे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दत्त जयंतीनिमित्त मंद्रुपमध्ये धार्मिक कार्यक्रमाला सुरुवात

**मंद्रुप, दि. १२ डिसेंबर-**

दत्तजयंतीनिमित्त मंद्रुपमध्ये १० डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राजकुमार अतार महाराज यांनी दिली. मंगळवार १० डिसेंबर ते शनिवार १४ डिसेंबरपर्यंत दररोज रात्री जय हनुमान भजनी मंडळ यांचा भजन कार्यक्रम सुरू आहे. शुक्रवार १३ डिसेंबर श्रीक्षेत्र गाणगापूर येथील दत्त मंदिरातून पादुकांचे आगमन होणार आहे. शनिवार १४ डिसेंबर रोजी पहाटे श्रींच्या मूर्तीस महाभिषेक कार्यक्रम, दुपारी १२ वाजता मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व गावातील प्रतिष्ठित मान्यवर यांच्या उपस्थितीत पाळण्याचा कार्यक्रम, दुपारी ४ वाजता दत्त मंदिरापासून ते मुख्य रस्त्यावरून हुतात्मा चौक बसस्थानकापर्यंत पारंपारिक वाद्यांच्या समवेत पालखीसह श्रींची मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी दत्त भक्तांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन राजकुमार अतार यांनी केला आहे.

# सोलापूर शहर पोलिस दलातील डायल ११२ चे डिस्पैचर राज्यात प्रथम

## प्रतिसादाचा वेळ आणला केवळ ३७ सेकंदावर; नोव्हेंबर महिन्यात मागितली १७०७ नागरिकांनी मदत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच सोलापूर शहरातदेखील विधानसभा निवडणुकीची धामधुम असतानाही सोलापूर शहर पोलिसांनी पोलिस यंत्रणेचे योग्य पध्दतीने नियोजन व वापर केल्यामुळे आपत्कालीन प्रतिसाद पथक म्हणजेच डायल ११२ मध्ये कमीत कमी म्हणजे केवळ ३७ सेकंदात मदत मागणाऱ्या नागरीकाला प्रतिसाद देत मदत पाठवून कार्यतत्परता दाखविली. त्यामुळे महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली (डायल ११२) च्या नोव्हेंबर महिन्यात सोलापूर शहर पोलिस दलातील डिस्पैचर (मदत पाठविणारे) हे राज्यात अव्वल ठरले आहे. नोव्हेंबर महिन्यात डायल ११२ वर १७०७ नागरीकांनी मदत मागविली होती.

नोव्हेंबर महिन्यामध्ये राज्यात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची तसेच दिवाळीच्या सणाची धामधुम होती. सणाच्या बंदोबस्तासोबतच विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता, राजकीय सभा, कायदा व सुव्यवस्था, महत्वाचा बंदोबस्त, पंतप्रधान-मुख्यमंत्री-केंद्रीय मंत्री यांचे महत्वाचे बंदोबस्त अशी अनेक कामे पोलिस यंत्रणेकडून करण्यात आली. अशा अनेक पातळीवर काम करीत असताना सोलापूर शहर पोलिसांनी डायल ११२ वर पोलिस मदत मागणाऱ्या नागरीकांनादेखील शहर पोलिसांनी कमीत कमी वेळेत पोलिस मदत पाठवून कार्यतत्परता दाखविली. नोव्हेंबर महिन्यांमध्ये एकूण १७०७ नागरीकांकडून डायर ११२ या हेल्पलाईनवर पोलिस मदत मागितली. त्यांना सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्या डायल ११२ च्या पथकाने कमीत कमी वेळेत सरासरी ३७ सेकंदामध्ये प्रथम प्रतिसाद कर्ता पोलिस मदत पाठविली. यामुळे महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली महाराष्ट्र राज्य ११२ यांच्या नोव्हेंबर २०२४ मध्ये सोलापूर शहर येथील प्रेषक (डिस्पैचर - मदत पाठविणारे) महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आले आहेत. त्यामुळे पोलिस आयुक्त एम राजकुमार व उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांनी डायल ११२ च्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.



### डिस्पैचर (मदत पाठविणारे)

हे एक पोलीस अधिकारी असतात, ज्यांना डिस्पंचर (मद्दत पाठविणारे) देखील म्हणतात. हे पहिल्या प्रतिसाद कर्त्याशी संवाद साधतात. जेव्हा कॉल सीएडी प्रणालीमध्ये प्रविष्ट केला जातो, तेव्हा हे तात्काळ येण्याऱ्या कॉलचे अवलोकन करून उपलब्ध संसाधने पाठवतात. डिस्पैचर (मदत पाठवणारे) हे तक्रारीचे निराकरण होईपर्यंत मदत पुरवणारे व आदेश आणि नियंत्रण कक्ष यांमध्ये समन्वय साधतात.

### आपत्कालीन प्रतिसाद वाहन

डिस्पेंचरद्वारे संगणकावर माहिती पाठविली जाते, त्या संगणकाला मोबाइल डेटा टर्मिनल (एमडीटी) म्हणून ओळखले जाते, जे प्रत्येक आपत्कालीन प्रतिसाद वाहनावर सेलग्र असते. ईआरव्ही टीम लवकरात लवकर घटनास्थळी पोहोचेल. परिस्थिती सामान्य करण्यासाठी ईआरव्ही टीमद्वारे आवश्यक कारवाई केली जाते. घटनेचा अहवाल डिस्पेंचरला परत पाठविला जातो आणि पुढील कार्यवाहीची आवश्यकता असल्यास जवळच्या पोलीस स्टेशनलाही कळविले जाते.

### कॉल प्रक्रिया

जेव्हा आपण ११२ वर कॉल करता, तेव्हा कॉल घेणारा आपल्या कॉल चे मूल्यांकन करून आपल्याला कोणत्या प्रकारचा प्रतिसाद आवश्यक आहे हे निधर्धारित करून आपल्या कॉलची माहिती कॉम्प्यूटर एडेड डिस्पंध (सीएडी).

### ११२ ची उद्दिष्ट्ये

- महाराष्ट्र राज्यामध्ये एकच आपत्कालीन प्रतिसाद क्रमांक.
- २४७ प्रभावी आपत्कालीन प्रतिसाद सेवा.
- वॉइस कॉल, एसओएस, एसएमएस, ईमेल, वेब विनंती आणि प्यानिक बटनांद्वारा लोक मदतीची विनंती करू शकतात.
- कॉलर पीडित्यांचे स्वयंचलित स्थान ओळख.
- जवळच्या आपत्कालीन प्रतिसाद वाहनकडून डायनॅमिक चलनशक्तिविषयक आपत्कालीन प्रतिसाद सेवा,
- पोलिस, अग्निशामक, वैद्यकीय आणि नैसर्गिक आपत्ति व्यवस्थापन संघाकडून सेवा.
- केंद्रीकृत नियंत्रण केंद्रा कडून आपत्कालीन सेवा समन्वय.
- आपत्कालीन परीस्थिति निर्णय घेणे सुधारित करते जे प्रतिसादाची वेळ कमी करते.
- आपत्कालीन प्रतिसाद वाहनांचा थेट मागोवा.

**यांनी घेतले परिश्रम**

पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त अजित बोऱ्हाडे, सहायक पोलिस आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक खुबा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहायक पोलिस निरीक्षक योगिता कुदळे, पोलिस उपनिरीक्षक अरूण फडके, सहायक फौजदार किरणकुमार गायकवाड, पोलिस हवालदार नितीन घाटे, सादिक शेख, लक्ष्मीकांत निरंजन, सुरज तिवारी, युसूफ काझी, मल्लेशी घोडके, गणेश जाधव, महिला पोलिस हवालदार शैलजा बोराडे, वर्षा चव्हाण, पोलिस शिपाई अमर शेळके, सचिन कुलकर्णी, दिनेश वाघमोडे, इंजिनियर सुफीयान सय्यद, सिध्दार्थ माढेकर यांनी यासाठी परिश्रम घेतले.

**अशी चालते डायल ११२ ची यंत्रणा**

**डायल ११२ आदेश आणि नियंत्रण कक्ष**

महाराष्ट्र पोलिस डायल ११२ आदेश आणि नियंत्रण कक्ष, हा महाराष्ट्र राज्यातील रहिवाशांसाठी आपत्तीकाळात पोलिसांच्या हस्तक्षेपाची आवश्यकता असल्यास एकल संपर्क बिंदू आहे. डायल ११२ आदेश आणि नियंत्रण कक्षाची स्थापना अत्याधुनिक तंत्रज्ञानासह आणि सुविधांसह केली आहे. आदेश आणि नियंत्रण कक्षामध्ये सार्वजनिक सुरक्षा आणि सुरक्षिततेसाठी आपत्कालीन सेवा देण्यासाठी वर्षामध्ये ३६५ दिवस व २४ तास कर्मचारी तत्पर असतील.

# प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावावीत

## आ. समाधान आवताडे : पंढरपुरात विकासकामांची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील मंजूर विकास कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून संबंधित खात्यातील प्रलंबित असलेली विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या.शेतकी भवन पंचायत समिती पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांच्या उपस्थित तालुक्यातील विविध विकासकामाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव तसेच तालुक्यातील विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. तालुक्यात सुरू असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना, रस्त्यांची कामे, घरकुल योजना, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुसंवर्धन , तीर्थक्षेत्र योजना, नागरी सुविधा, महावितरण, पाटबंधारे आदी विभागांची सखोल माहिती आमदार आवताडे यांनी घेवून कामे वेळेत पूर्ण करावीत अशा सूचना दिल्या.

तसेच रांझणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून येत असून सदर कामांची तात्काळ पाहणी करून संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचना आमदार अवताडे यांनी दिल्या. परिवहन विभागाने पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ करावा. यावेळी नगरपालिका, महावितरण, कृषी, आरोग्य, शिक्षण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परिवहन, एस.टी.महामंडळ, पाटबंधारे आदी विभागाच्या विभाग प्रमुखांनी मंजूर व सुरु असलेल्या कामांची माहिती दिली.



### बसस्थानक स्वच्छ ठेवा

पंढरपूर येथे दररोज येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या विचारात घेता एसटी महामंडळ विभागाने बसस्थानक कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. महावितरण विभागाने शेतकऱ्यांसाठी मंजूर असलेले रोहित्र तात्काळ बसून कार्यान्वित करावेत. तसेच ग्रामीण भागात मंजूर कामांच्या पूर्ण होण्यात येणाऱ्या अडचणी दूर करून ग्रामस्थ आणि संबंधित अधिकाऱ्यांनी ही कामे वेळेत पूर्ण करावेत व उद्दिष्ट पूर्ण करावे अशा सूचनाही आमदार आवताडे यांनी दिल्या.




# अक्कलकोटला लागले दत्त जयंती उत्सवाचे वेध

## प्रशासनाची जय्यत तयारी; पायी पालखी सोहळे येण्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ डिसेंबर-**

दत्त अवतार श्री स्वामी समर्थाच्या पदस्पर्शाने लिला कार्याने पावन झालेल्या श्री तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीला दत्तजयंती उत्सवाचे वेध लागले आहेत.

मंदिर परिसरात दर्शन बारी मंडप ठिकठिकाणी उन्हाच्या संरक्षणासाठी छत मंडप मंदिरात भव्य मंडपाचा शामीयाना उभारणी करण्यात आली असुन मंदिर व्यवस्थापनाची मोठी लगबग चालू आहे. अन्नछत्र मंडळात लाखो भाविकांच्या महाप्रसाद भोजनासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. अक्कलकोट नगरीत महाराष्ट्रातुन पायी दिंडी सोहळे दाखल होत आहेत. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, गुरु मंदिर, राम गल्ली, स्वामींचे समाधी मठ, बुधवार पेठ, स्टेशन रस्ता, राजेराय मठ, एकमुखी दत्त मंदिर, राम गल्ली, बॅगेहळ्ळी स्वामींचे विश्रांतीधाम विसावा कट्टा, जेऊर रोड जादी ठिकाणी श्री दत्त जयंती उत्सव भजन जन्मोत्सव पाळणा पालखी सोहळा प्रसाद भोजन आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

# १७ डिसेंबर रोजी विमा प्रतिनिधींचे धरणे आंदोलन

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

ऑल इंडिया लाईफ इन्शुरन्स एजंटस फेडरेशन ऑफ इंडिया ने विमेदरांना मिळणाऱ्या बोनसमध्ये वृद्धी होण्यासाठी तसेच विमा प्रतिनिधींना निवृत्तीचे वय नसल्याने तो अविरत मरेपर्यंत विमा सेवा देत असतो आणि आजही अनेक विमा प्रतीनिधी अशा एलआयसीच्या माध्यमातून सेवा देताना दिसतात त्यांची कदर करून एलआयसीने विमा प्रतीनिधीना पेन्शन सुविधा लागू करावी सर्व विमाप्रतीनिधी व त्यांचे कुटुंबीयांसाठी ग्रुप मेडीक्लेम सुविधा आणि ग्रूप इन्शुरन्स पंचवीस लाख करण्यात यावा आणि यासाठी भरावा लागणार विमा हप्ता देण्याची तयारी विमा प्रतिनिधींची असताना सुद्धा आज पर्यंत कोणताही निर्णय एलआयसी व्यवस्थापनाने न घेतल्या बद्दल तसेच १ ऑक्टोबर नंतर एलआयसीकडून काही नव्या विमा योजना ज्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विमा प्रतींनीधीना मिळणाऱ्या प्रथम वर्षीय कमीशन मध्ये कपात आणि कोणत्याही कारणाने विमेदाराने त्याने घेतलेली वीमा पॉलिसी सरेंडर केली तर विमा प्रतीनिधीला मिळालेले सर्व कमीशन वसूल करण्यासाठी नव्याने बनवलेला क्लाबॅक हा काळा कायदा रद्द करण्यासाठी शिवाजी नगर एलआयसी विभागीय कार्यालयासमोर तारीख १७ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते २ पर्यंत विमा प्रतिनिधि संघटनेमार्फत लोकशाही मार्गाने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असून सदर शांततामय आंदोलनात पुणे, नगर, सोलापूर जिल्ह्यातील सर्व शाखेतील विमा प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

# अनैतिक संबंधातून युवकाची आत्महत्या

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी 'त्या' मुलीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ डिसेंबर-**

सिद्धार्थनगर येथे राहणाऱ्या समाधान सुनिल शिंदे (वय २७) या युवकाने मानसिक तणावातून दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली होती. या प्रकारानंतर समाधान यांचे आईने दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी पोलिसांत त्या मुलीविरुद्ध मुलाला मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.




फिर्यादीत म्हटले समाधान व त्या मुलीचे गेली ५-६ वर्षांपासून अनैतिक संबंध होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून समाधान याचे लग्नाची चर्चा सुरु झाल्याने ती मुलगी समाधान यास धमाकावत होती. तु माझेसोबत कायमचे संबंध ठेव नाहीतर तुझ्यावर बलात्कार व विनयभंगाचा गुन्हा दाखल करीन, अशी धमकी देत ब्लॅकमेल करीत होती. त्याचबरोबर वारंवार पैशाची मागणी करीत मानसिक छळ करीत होती.

या दरम्यान समाधान याचा तुळजापूर येथे साखरपुडा कार्यक्रम झालेनंतर त्या मुलीचा त्रास अधिक वाढला. समाधान याचे आत्महत्येचे दिवशी समाधान व ती मुलगी बार्शी शहरातील सिटी पॅलेस लॉजवर गेले होते. तेथे दोघांनी रुम घेऊन दोन तासांनी ती मुलगी एकटीच बाहेर पडुन तेथील मॅनेजरला समाधान याची काळजी घ्यावी, असे सांगून निघून गेली. त्यानंतर समाधान हा थोड्या वेळाने लॉज बाहेर निघून गेला व सायंकाळी घरी जाऊन समाधान याने आत्महत्या केली. समाधान याचे आईने त्या मुलीने वारंवार मानसिक व आर्थिक त्रास दिल्याने आत्महत्येस प्रवृत्त केल्याने समाधान याने आत्महत्या केली असा त्याचा आरोप केला आहे. शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अपार 'पार' करण्यासाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ

## १५ डिसेंबरपर्यंतचा प्रशासनाला कालावधी

### जि. प. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

केंद्र शासनाने यु-डायस प्रणाली मधून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री अर्थात (अपार) आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम हाती घेतला आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे पावणे आठ लाख विद्यार्थी असून, आत्तापर्यंत साडेपाच लाख विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र अजूनही दोन लाखाहून अधिक विद्यार्थी अपारपासून परावृत्त आहेत. त्यांना अपार मध्ये सामावून घेण्यासाठी शासनाने दुसऱ्यांदा मुदतवाढ दिलेली आहे. दि.१५ डिसेंबरपर्यंतचा कालावधी प्रशासनास देण्यात आला आहे.

दरम्यान,सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने अपार आयडी बनवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात विशेष अपार मोहीम राबवण्यात आली होती. मेगा अपार डे या मोहीमे अंतर्गत सोमवार (दि. ११) डिसेंबर रोजी जिल्ह्यात अपार आयडीचे कामकाज ३.१७ टक्क्यांनी वाढले आहे. एकूण ७ लाख ७६ हजार ६१९ विद्यार्थ्यांपैकी ५ लाख २९ हजार ४७३ विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला यश आले आहे. उर्वरित २ लाख ४७ हजार ३४३ विद्यार्थ्यांचे आयडी बनवण्यात येत आहेत. यासाठी दुसऱ्यांदा मुदतवाढ मिळाली दि.१५ डिसेंबर पर्यंतचा कालावधी यासाठी मिळालेला आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने वन नेशन वन स्टुडन्ट धरतीवर शालेय विद्यार्थ्यांसाठी अपार ऑटोमेटेड परमनंट अकॅडमी रजिस्ट्री आयडी काढण्याचा निर्णय घेत अपार आयडी कामकाज सुरू केले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंबाबजावणीसाठी सोलापूर जिल्ह्यात ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे.

अद्याप पर्यंत जिल्ह्यातील ६८.१६ टक्के विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तर उर्वरित ३२ टक्के विद्यार्थ्यांना आपार आयडी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळात मेगा अपार डे साजरा करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मेहता प्रशालेच्या क्रीडा सप्ताहाला सुरुवात

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

मेहता प्रशालेच्या क्रीडा सप्ताह सुरुवात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन डॉ. शिवानंद तोरवी खो-खोचे राष्ट्रीय खेळाडू, शारीरिक शिक्षक संचालक संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी मुलांनी मोबाईल पेक्षा मैदानावर मनसोक्त खेळावे, खेळामुळे मन प्रसन्न होते, त्याचा अभ्यासासाठी फायदा होतो. असे बहुमोल असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. उद्घाटनाप्रसंगी विद्यार्थ्यांनी खेळावर आधारित नृत्य तसेच कुमारी संहिता गद्रे या विद्यार्थिनीने योगाचे सादरीकरण केले. कुमारी संस्कृती इरापल्ली या विद्यार्थिनीने ऑलम्पिक ची माहिती सांगितली. क्रीडा सप्ताहामध्ये क्रिकेट, कबड्डी, डॉजबॉल, खो-खो, लंगडी, डंबेल्स रेस, थाळी फेक, गोळा फेक, लांब उडी,१०० मीटर धावणे इत्यादी खेळ प्रकारांचा सम ावेश आहे. उद्घाटन प्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, सेवाजेष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, क्रीडा विभाग प्रमुख अमित कोर्टीकर बाळकृष्ण पाटील, प्रतिमा स्वामी उपस्थित होते. या कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन चिरंजीव पृथ्वीराज पारदे, क्रीडा प्रतिज्ञा चिरंजीव देवा सिंगन, तर आभार प्रदर्शन कुमारी श्रीदेवी समदुरले यांनी केले.



### तब्बल २८ वर्षानंतर भेटले सिध्देश्वर स्कूलचे विद्यार्थी अन् शिक्षक

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

श्री सिध्देश्वर इंग्लिश मिडयम स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा हॉटेल सूर्या इंटरनॅशनल येथे संपन्न झाला. सिध्देश्वर मिडयम स्कूलच्या १९९६ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी तब्बल २८ वर्षांनी आपल्या आठवणी मित्र-मैत्रिणी व शिक्षकांसमवेत जाग्या केल्या. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या माजी मुख्याध्यापिका अंजली तिवारी व शिक्षकवृंद यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवरांचा शाल श्रीफळ, भेट वस्तू व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. आशा थळंगे व श्वेता थळंगे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या आजी व माजी मुख्याध्यापक व शिक्षक यांना आमंत्रित करण्यात आले होत. यावेळी अंजली तिवारी, नंदगिरी, दामले, अंटद, सिंघल, झुंजूरवाड, रेणुका अरोरा, शेख, बिराजदार, अवस्थी, अलमेलकर, सोमशेखर भोगडे, म दतनीस बनसोडे उपस्थित होते. या स्नेह संमेलनासाठी सोलापूर शहर, सोलापूर जिल्हा, पुणे , मुंबई, कोल्हापूर, महाराष्ट्र बाहेरील बेंगलोर स्थाईक असलेले विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विद्याधर पुरंदरे, संतोष नंदीमठ, विश्वनाथ बुक्का, कृष्णा कुलकर्णी, वृषाली कटाप, गंगा कुलकर्णी, रेणुका पाटील, केदार पाटील, स्मिता करडे, नितीन श्रीगांधी यांनी परिश्रम घेतले. भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.




### एनसीसीच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. व्यंकटेश मेतन यांचे व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

डॉ. मेतन फाऊंडेशन व ग्रामीण विकास विद्यालय चपळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नऊ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कॅम्पमधील एन.सी.सी. कॅडेट व विद्यालयातील एकूण ८०० विद्यार्थ्यासाठी व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. व्यंकटेश मेतन हे स्वतः शालेय जीवनात ९ महाराष्ट्र बटालियनचे उत्तम एन.सी.सी. कॅडेट व एन.सी.सी.कॅम्पचे सर्वोत्तम कॅडेट हा बहुमान पटकाविला होता. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी या व्याख्यानात व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व, उद्देश व फायदे यावर काही महत्त्वाचे टिप्स दिले. व्यक्तिम त्त्वाचा सर्वांगीण विकास हा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व अध्यात्मक कौशल्याने करता येतो. हे करीत असताना आपण विविध गुण जोपासले पाहिजेत, त्यामध्ये आत्मविश्वास, सकारात्मकता, नित्य नियमाने व्यायाम, मानसिक संतुलन, शिक्षण, स्वयंशिस्त, भावनिक नियंत्रण, नेतृत्व व लवचिकता यांचा समावेश करावा. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी एकता आणि शिस्त हे एनसीसीचे ब्रीदवाक्य आहे असे सांगितले. कॅम्प कम ांडंट कर्नल रणधीर सतीश आणि श्री नीलकंठेश्वर पाटील यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास त्याचे महत्त्व सांगितले. समीर मणियार यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कॅम्प कमांडंट कर्नल रणधीर सतीश, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल शरभ बाबर, पर्यवेक्षक विश्वनाथ बानेगाव ,नीलकंठेश्वर पाटील, समीर मनियार, सिद्धाराम सक्करगी उपस्थित होते.

# ‘प्लॉय ९१’ चे ‘उडान’ नवीन वर्षातच

**आणखी दोन एनओसी बाकी**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

प्रवासी विमान वाहतूक सेवेसाठी लागणाऱ्या महत्वाच्या आणखी दोन एनओसी बाकी असल्याने येत्या २३ डिसेंबरला चालू होणारी प्लाय ९१ ची विमानसेवा जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सुरू होणार असल्याची माहिती विमानतळ सल्लागार समितीचे माजी सदस्य तथा सोलापूर विमानसेवा विकास मंचचे सदस्य केतनभाई शहा यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. १२) दिली.

सोलापूरच्या उच्चशिक्षित असंख्य युवकांना पुणे-मुंबईकडे नोकरीसाठी जावे लागते म्हणून सोलापूर शहरात मोठ्या उद्योगांची गरज होती. तर हे उद्योजक सोलापूरला येण्यासाठी विमानसेवेची गरज आहे. यासाठी सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून लढा






देवून विमानसेवा सुरू करण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले. या आमच्या प्रयत्नाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही चांगला प्रतिसाद दिला होता. या विमानसेवेला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही मोलाचे सहकार्य केले. इतकेच नाहीतर खा. मोहोळ यांनी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान, सोलापूरकरांना २३ डिसेंबरपासून विमानसेवा कार्यान्वित करण्याचा शब्दही दिला होता. त्या अनुषंगाने आवश्यक ती तयारीही झाली होती. प्लॉय ९१ या कंपनीने तब्बल ७२ सिटांच्या विमानसेवेसाठी आवश्यक ते कर्मचारीही नेमले होते. मात्र प्रवासी वाहतूक सेवेसाठी एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया व डिजीसीएकडून अजून २ एनओसी मिळणे बाकी असल्याने डिसेंबरची विमान उडानसेवा जानेवारी २५ मध्ये होणार असल्याचे शहा यांनी नमूद केले.

### काय आहेत ‘त्या’ दोन त्रुटी

प्रवासी विमानसेवेसाठी अनेक बारीक त्रुटी पाहिल्या जातात. विमानतळ सुसज्ज असून चालत नाही तर या नव्याने येणाऱ्या विमानाचे वजन किंगफिशर कंपनीच्या विमानापेक्षा पावणेचार टन जास्त आहे. म्हणजेच किंगफिशर मॉडेल: एटीआर ५०० होते तर हे प्लॉय ९१ चे विमान मॉडेल: एटीआर ६०० आहे. याची एनओसी आणि दुसरी त्रुटी म्हणजे हिंदुस्थान पेट्रोल कंपनीची आहे. यामुळे या दोन त्रुटींची पूर्तता होताच ही होटगी रोडवरील विमान सेवा सर्वांसाठी कार्यान्वित होणार असल्याचेही शहा यांनी स्पष्ट केले.

### गड्डा यात्रेला येण्यासाठी प्रवासी हाऊसफुल्ल; मात्र तिकीट बुकिंगच लांबली

१० नोव्हेंबरपासून सुरु होणारी विमानाची तिकीट बुकींग लांबली असून, ती येत्या ३-४ दिवसांत सुरु होणार आहे. जानेवारीत सोलापूरच्या गड्डा यात्रेसाठी अनेक प्रवासी अक्षरशः १० नोव्हेंबरच्या तिकीट बुकींगची वाट पाहत होते. मात्र परगावी असलेल्या आमच्या सोलापूरच्या प्रवाशी बांधवांचाही सध्या हिरमोड झाला आहे. इतकेच नाहीतर विमानसेवा लवकरच सुरू होणार असल्याने सोलापूरच्याही अनेकांना विमानात बसण्याची उत्कंठा आहे. यामुळे या सर्वांचे स्वप्न आता आगामी नवीन वर्षातच (जानेवारी २०२५) साकार होणार असल्याचे चिन्ह आहे.

**- केतनभाई शहा, सोलापूर**

# सोलापुरात एम्स् रुग्णालय उभे करण्याची मागणी

**खा. शिंदेंचे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

सोलापूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स्) उभारण्यासाठी त्यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांना पत्र देऊन मागणी केली आहे.



प्रणिती शिंदे या खासदार झाल्यापासून सोलापूरच्या विविध विकास प्रकल्पांवर सातत्याने लक्ष केंद्रित करत आहेत. ज्यात विमानतळ विकास, रेल्वे सुविधांचा विस्तार, युवकांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांचा विज, पाणी, हमीभाव या सारख्या प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दिल्ली दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे. त्याचप्रमाणे आता त्यांनी सोलापूरसाठी एम्सची मागणी केली आहे. सोलापूरची भौगोलिक स्थिती आणि लोकसंख्या पाहता सोलापूर जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळणे गरजेचे आहे. यासाठी सोलापूरमध्ये एम्स सारख्या अद्ययावत रुग्णालयाची आवश्यकता आहे. सोलापूर हा पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या एक महत्त्वाचा जिल्हा मानला जातो. सोलापूर शहरात लोकसंख्येची घनता अधिक आहे. शिवाय ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विविध आजारांवर उपचार करण्यासाठी नागरिकांना शहरात धाव घ्यावी लागते. या पार्श्वभूम ीवर सोलापूरमध्ये एम्सची स्थापना होणे एक गरजेची बाब असून त्याचा लाखो रुग्णांना फायदा होणार असल्याचे शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

आरोग्य सेवांच्या उभारणीसाठी एम्ससारख्या अत्याधुनिक रुग्णालयाची आवश्यकता असल्यामुळे शिंदे यांनी संसदेत सोलापूरसाठी ही मागणी उपस्थित केली आहे. सोलापूरच्या आरोग्य व्यवस्थेची सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध होण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.तसेच महाराष्ट्र सरकारने सोलापूरमध्ये एम्स उभे राहण्यासाठी मदत करण्यास तयार आहे. त्यामुळे सोलापूर हे एम्स प्रकल्पासाठी योग्य ठिकाण ठरेल, असेही शिंदे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.



# कंची परिवारातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

कै. मनीषा विश्वास (कंची) नक्कावार तसेच कै गंगाधर नारायण कंची यांच्या पुण्यस्मरणानिमित्त डॉ. किरण कीर्तने, डॉ. कविता चंडक यांच्या मार्गदर्शनाखाली घोंगडे वस्ती येथे नेत्र, आरोग्य व रक्त तपासणी शिबीर घेण्यात आले.

उद्‌घाटन सपोनि शैलेश खेडकर, जीवन निरगुडे, रा. स्व.संघा चे जिल्हा संघचालक सुनील इंगळे यांच्या हस्ते तसेच रत्नाकर नक्कावार, चंद्रकांत कंची, विश्वास नक्कावार, व्यंकटेश कंची, कांचन घंट्याळ, गीता कंची, अशोक संकलेचा उपस्थित होते. सूत्रसंचालन चन्नेश इंडी यांनी केले. याचा १८० नागरिकांनी याचा लाभ घेतला. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया तसेच लुपिन डायग्नोस्टिक, सृष्टी ई-सेवा केंद्र (व्यंकटेश कंची) यांचे सहकार्य लाभले. यासाठी सत्यभामा कांबळे, आम्रपाली बनसोडे, आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, म नीषा वांगीकर, स्वयम कंची, हर्षा गायकवाड, चंद्रकांत जक्कन, राजकुम ार कनकी यांनी प्रयत्न केले.

# अनेक अनुष्ठान, पारायणानंतर स्थापन झाले नृसिंह सरस्वतीचे मंदिर

**जिल्ह्यातील एकमेव मंदिर वैरागमध्ये**

**९० वर्षीही केसरकराकांची अखंड सेवा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

दत्तप्रभूंचे तिसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे मंदिर वैराग (ता. बार्शी) येथे आहे. कालिदासकाका केसकर यांनी वयाच्या आठव्या वर्षांपासून दत्त प्रभूची उपासना सुरु केली. आज ते ९० वर्षांचे असले तरी तीच भक्ती-सेवा अखंड आहे. रानातील वस्तीजवळ औदुंबर वृक्ष होता. त्या जवळ गायत्री व हनुमान मंदिर स्थापन केले. त्यांची उपासना सुरु होती. अचानक, तो वृक्ष वठला. या बाबतची विचारपूस करण्यासाठी ते गुरुनाथबाबा दंडवते महाराज यांच्याकडे आले. त्यांनी उपासनेची आज्ञा केली. दंडवते महाराजही पूर्वी त्या ठिकाणी आले होते. मामासाहेब देशपांडे या गुरुंच्या आर्शीवादाने त्यांनी औदुंबर



व पुणे येथे त्यांनी गायत्री पुनश्चरण केले. देवाच्या कृपेने, १० ते १२ वर्षानंतर शेतातील वठलेला औदुंबर पुन्हा बहरला. त्यानंतर केसकर यांनी त्या ठिकाणी पाच प्रदीर्घ अनुष्ठान केले. श्री. दंडवते महाराज व देशपांडेमामा यांच्या आर्शीवादाने नृसिंह सरस्वती महाराज मंदिराची उभारणी झाली. गावकरी, भाविकांच्या पुढाकारातून २००९ मध्ये मंदिर उभारणी पूर्ण झाली.

### मंदिरात अखंड सेवा

मंदिरात अखंडपणे सेवा सुरु आहे. खास जयपूर (राजस्थान) येथून मूर्ती तयार करून घेतली. अतीशय रेखीव, सुबक मूर्ती आहे. अवधूत जयंती, नृसिंहसरस्वती जयंती, गुरुपौर्णिमा असे वर्षभरात विविध उत्सव सोहळे होतात. प्रत्येक गुरुवार, पौर्णिमा, सण उत्सवात भाविकांची गर्दी असते. माधुकरी सेवा आहे. दत्त जयंती निमित्ताने शनिवारी सायंकाळी दत्त जन्मोत्सव पाळणा आहे. गुरुचरित्र पारायण, भजन, किर्तन सेवा सुरु आहे. रविवारी महाप्रसाद सोहळा आहे.

**- कालीदासकाका केसकर, मंदिराचे ज्येष्ठ सेवेकरी**




### थॅलेसिमिया आजारावर जनजागृती हवी : पाटील-विश्वरुपे

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

थॅलेसिमिया आजार जन्मापासून आढळतो. लहान वयात या विकाराची लक्षणे आढळतात. हा रक्तातील अनुवंशिक विकार आहे. त्यामुळे तरुण-तरुणींनी विवाहपूर्वी थॅलेसेमिया संबंधित चाचणी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक व पिंपरी चिंचवड सेवा भारतीचे अध्यक्ष सम ीर पाटील-विश्वरुपे यांनी केले.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीमध्ये रक्तदानाविषयी संबंधी आयोजित वार्तालापात ते बोलत होते. यावेळी रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरुपे, संचालक मिलिंद फडके, निमंत्रित संचालक प्रकाश कुलकर्णी, नितीन कवठेकर, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगावकर, जनसंपर्क अधिकारी सुनील हरहरे, दिलीप बनसोडे, रवी कोटा, संगीता कोरे, श्रीकांत तुळजापूरकर आदी उपस्थित होते. समीर पाटील-विश्वरूपे यांनी रक्तदान केले.




सोलापूर : शहरात सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर दिवसरात्र नंदीध्वजधारक सराव करत आहेत. सिद्धरामेश्वर मंदिर परिसरात रात्री उशिरा टिपलेले हे छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

हाऊसफुल्ल २रा आठवडा
भागवत उमामंदिर
10.45 AM | 2.30 PM | 6.15 PM | 10.00 PM


Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780
प्रेशकांसाठी खास सेल्फी पॉइंटची सोय

फुल गर्दीचा २रा आठवडा
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आयकॉन स्टारच ॲक्शन धमाका
हिंदी.११. ०२।।।, वा
तेलगु.०६।,०९।।।, वा


स्वस्त तिकिट दर १५० व २००रु
खास प्रेशकांसाठी सेल्फी पाईट ची सोय

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## व्याजमुक्त बँकिंग : स्वरूप आणि फायदे या विषयावर उद्या व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

सोलापूर येथील सुपर अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड सोलापूर व एशियन बिलासुदी फायनाशियल सोसायटी सोलापूर यांच्या प्रधान कार्यालयाचे नवीन इमारतीचा उद्‌घाटन समारंभ रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता तेलंगी पाच्छा येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून मुंबई येथील बैतून नसरचे मो. सलीम काझी व माजी प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल हे दोघे व्याज मुक्त बँकिंग : स्वरुप आणि फायदे या विषयावर व्याख्यान देणार आहे. अध्यक्षस्थान सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशनचे संचालक दिनकर देशमुख हे भूषविणार आहे.



या कार्यक्रमास अ. जब्बार सगरे (लातूर), अ. रशीद शेख (बैतुल नसर, मुंबई), फारूख सय्यद (मुंबई), मुस्तफा कांचवाला (मुंबई), मुफ्ती अमजदअली काझी, मौलाना ताहेर बेग मोहम्मदी, मौलाना म. इब्राहिम कासमी, मौलाना हारिस इशाअती, डॉ. अख्लाकअहमद वडवान, विलास कोरे, अ. जब्बार इंगळगी, मलंग शेख, फैज इनामदार हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. तरी नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून बिलासुदी सोसायटीबाबत माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन आसिफ इक्बाल यांनी केले आहे.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### रस्त्यावर दुचाकी लावल्याच्या कारणातून पती-पत्नीस मारहाण

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

रस्त्यावर दुचाकी लावल्याचा जाब विचारत पती-पत्नीस घरात घुसून मारहाण करण्यात आली. हा प्रकार शेळगी भागातील शिवगंगा नगरात दहा डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता घडला. याबाबत नितीन शिवानंद रुईकर (वय ३८, रा. शिवगंगा नगर, शेळगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंद कांबळे, विशाल कांबळे व मिथिला कांबळे (सर्व रा. शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर) यांच्याविरुद्ध जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी नितीन हे त्यांची दुचाकी घरासमोरील रस्त्यावर लाऊन घरामध्ये झोपले होते. त्यावरून आरोपी आनंद कांबळे, विशाल कांबळे व मिथिला कांबळे यांनी नितीन यांना बाहेर बोलावून रस्त्यावर दुचाकी का लावली याचा जाब विचारला. यानंतर पुन्हा नितीनने दुचाकी घरासमोरील रस्त्याच्या कडेला उभी केली असता यातील आरोपींनी फिर्यादीस लाकडाने मारहाण केली. तसेच त्यांच्या पत्नीच्या हाताला आरोपी मिथिला यांनी जावा घेऊन जखमी केले. हा प्रकार ११ डिसेंबरच्या दुपारी तीन वाजता घडला. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक येडे करीत आहेत.




### मराठी नाट्य परिषदेची रविवारी सर्वसाधारण सभा

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता नाट्य परिषदेचे स्व.पद्माकर देव सभागृह, मोदीखाना,सोलापूर येथे परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत परिषदेचा मागील वर्षाचा आढावा, अहवाल, लेखापरीक्षण अहवाल तसेच परिषदेच्या माध्यमातून राबवले जाणारे उपक्रम तसेच भविष्यकाळात होणाऱ्या उपक्रमांविषयी सविस्तर चर्चा करण्यात येणार असून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत. तरी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेच्या सर्व पदाधिकारी कार्यकारी सदस्य निमंत्रित सदस्य सल्लागार मंडळ सदस्य व आजीव सभासदांनी सदर बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे यांनी केले आहे.

### स्पीडब्रेकरवर गाडी आदळल्याने खाली पडून महिला जखमी

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

सोलापूर शहर पोलिस मुख्यालयासमोरील स्पीडब्रेकरवर दुचाकी गाडी आदळल्याने पडून महिला जखमी झाली. सुरेखा कल्याणसिध्द भडंगे (वय ५२, रा. स्वातंत्र्य सैनिक नगर, कर्णिक नगर, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. १२ डिसेंबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास सुरेखा भडंगे या दुचाकीवरून अशोक चौक ते करुणा हॉटेल असे दुचाकीवर पाठीमागे बसून येत होत्या. त्यावेळी सोलापूर शहर पोलिस मुख्यालयाच्या समोरील बाजूस आलेल्या स्पीडब्रेकरवर गाडी आदळल्याने सुरेखा भडंगे या दुचाकीवरून पडल्याने त्यांच्या डोक्यास जबर मार लागला. त्यामुळे त्यांना जखमी अवस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात पती कल्याणसिध्द यांनी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ट्रकच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

ट्रकच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जण जखमी झाले. सिध्दराम सदाशिव साखरे (वय ५८, रा. पाकणी, ता. उत्तर सोलापूर) आणि बसवराज हाजी काळे (वय ५०, रा. पाकणी) अशी जखमींची नावे आहेत. १२ डिसेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास साखरे व काळे हे दोघे सोलापूर मार्केट यार्ड ते पाकणी असे दुचाकीवरून डबलसीट जात होते. त्यावेळी बोरामणी नाका येथे पाठीमागून येणाऱ्या ट्रकने दुचाकीस जोरदार धडक दिली. या अपघातात साखरे व काळे हे दोघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी किरण साखरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# घर बांधा अन्यथा फौजदारी

## डीआरडी योजनेंतर्गत मार्च एंडपर्यंत घरकुल न बांधल्यास होणार कारवाई

### प्रकल्प संचालक डॉ. ठोंबरे यांचा इशारा

### जिल्हा ग्रा. वि. यंत्रणेला 3 हजार ८33 जणांनी लावला चुना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

जिल्हाभरातील दारिद्रय रेषेखालील नागरिकांनाही आपल्या हक्काचे घर बांधता यावे यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेतून आजतगायत जिल्ह्यातील ४२ हजार कुटुंबांना घरे मंजूर केली आणि पंचायत समित्या, ग्रामपंचायतींच्या माध्यमातून २२ हजार लाभार्थींना पहिला हप्ता १५ हजाराप्रमाणे ऑनलाईनद्वारे थेट त्यांच्या खात्यात जमा केला आहे. मात्र हे पैसे उचलून एकही वीट न रचता या शासकीय यंत्रणेला यातील ३ हजार ८३३ जणांनी सध्यातरी चुना लावला आहे. यामुळे संतापलेले प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली अशा नागरिकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा गंभीर इशारा दिला आहे.



ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्र शासनाचा ग्राम विकास विभाग कार्यरत आहे. राज्यातील गावे स्वयंपुर्ण व्हावीत, तिथे सर्व मुलभुत सुविधा उपलब्ध असाव्यात व तेथील जनतेला सर्व सुविधा गावातच उपलब्ध व्हाव्यात या हेतुने स्वच्छ, सुंदर व हरित ग्राम तयार करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाद्वारे दारिद्रय निमुलनाचे उपक्रम चालविणे, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत निवारा व निवारा विषयक सुविधा पुरविणे, प्रशिक्षणातून विकास कार्यक्रमांतर्गत लोक प्रतिनिधींचे सक्षमीकरणाद्वारे पंचायती राज व्यवस्था बळकट करणे हे या विभागाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. मात्र लाभार्थी नागरिकांकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

सोलापूर विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी व नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना, उपक्रम राबविण्यात येतात. जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपचांयत आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ही विकासकामे राबविली जातात. मजबूत पंचायतराज प्रणाली मार्फत रचनात्मक, सर्वसमावेशक व स्थायी ग्रामीण विकास साधणे हे या विभागाचे ध्येय आहे. या अनुषंगाने आमच्या यंत्रणेमार्फत जिल्ह्यातील २२ हजार लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजनेतून घर बांधण्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार अर्थसाहाय्य दिले जाते. यातील १८ हजार १६७ जणांनी घरे बांधली असून, काहींची घर बांधणी सुरू आहे. दरम्यान, उर्वरित ३ हजार ८३३ जणांनीही येत्या मार्च अखेर घरकुले बांधण्याची गरज आहे.

#### पैसे उचलून घरकुल न बांधलेल्यांची तालुकानिहाय आकडेवारी

चालू आर्थिक वर्षात १५ हजार रूपये उचलून उत्तर सोलापूर तालुक्यात ४२ जणांनी घरकुल बांधले नाही. बार्शी २१७, माढा २७१, अक्कलकोट २८८, दक्षिण सोलापूर २८९, पंढरपूर २९४, मोहोळ ३०२, करमाळा ३८०, माळशिरस ४१०, सांगोला ६३६ आणि मंगळवेढा ७०४ अशा जिल्ह्यातील एकूण ३ हजार ८३३ जणांनी घरकुले बांधली नाहीत. वर्षभरापासून पाठपुरावा करूनही हे लाभार्थी मनावर घेत नसल्याचे नाईलाजाने आम्हाला फौजदारी गुन्हे दाखल करावे लागणार आहेत.

**- डॉ. सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर**

# पणन संचालक विकास रसाळ आज सोलापुरात

### बाजार समितीच्या कामकाजाचा घेणार आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

राज्याचे पणन संचालक विकास रसाळ हे आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय कार्यालयास भेट देवून बाजार समितीच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेणार आहेत. सध्या सहकार विभागातील अनेक संस्थाच्या पंचावार्षिक निवडणूका स्थगित करण्यात आलेल्या आहेत. त्याच धर्तीवर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक सध्या स्थगित आहे.




दरम्यान, राज्यात आता मंत्रीमंडळ विस्ताराची गडबड सुरु आहे. तर दुसरीकडे नागपूर हिवाळी अधिवेशनाचीही धावपळ सुरु झालेली आहे. या पार्श्वभूमीवर पणन संचालक विकास रसाळ हे दौऱ्यावर येणार आहेत. तसेच जिल्ह्यात विविध सहकारी संस्थाची माहितीही घेणार आहेत. त्यामुळे बाजार समिती प्रशासन आता त्यांच्या स्वागताच्या तयारीला लागले आहे.

> राज्याचे पणन संचालक विकास रसाळ सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. त्या अनुषंगाने सर्व विभागवार बैठकांचे नियोजन करण्यात आले आहे. सर्व विभागांचा तपशीलवारपणे आढावा घेणार आहेत.
>
> **- दत्तात्रय सूर्यवंशी,**
> **सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर**

# सोलापुरात आढळला दुर्मिळ प्रजातीचा शेंडीवाला कोतवाल पक्षी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

डब्ल्यूसीएच्या सदस्यांना सोलापुरात दुर्मिळ प्रजातीचा शेंडीवाला कोतवाल पक्षी आढळून आला आहे.



मंगळवार दि. १० डिसेंबर रोजी सकाळी वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशनचे सदस्य संतोष धाकपाडे आणि सुरेश क्षिरसागर हे पक्षी निरीक्षणाला हिरज परिसरात गेले होते. केगाव येथे पंडित दीनदयाल महाविद्यालयच्या पाठीमागून त्यांनी पक्षी निरक्षणास सुरुवात केली. यावेळी कारुण्य कोकिळा, कंठी होला, बुलबुल, वटवट्या, दयाळ, शिंजीर, भारद्वाज वेडा राघू या पक्षांचे दर्शन मिळाले. काही अंतर पुढे गेला असता त्यांना एका झाडावरती त्यांना एक दुर्मिळ प्रजातीचा पक्षी दिसून आला बुलबुल पक्षी पेक्षा थोडा मोठा आणि कोकिळेपेक्षा थोडा लहान असा एक पक्षी त्यांना दिसला. त्या पक्षाची हालचाल थोडी वेगळीच होती त्यामुळे संतोष धाकपाडे आणि सुरेश क्षिरसागर हे दोघे त्या पक्ष्याकडे पाहत राहिले. तो पक्षी शेंडीवाला कोतवाल आहे समजले. या अगोदर हा पक्षी म्हणजेच शेंडीवाला कोतवाल २०२१ रोजी स्मृती उद्यानात दिसला होता. त्यावेळी सोलापूरचे पक्षी अभ्यासक शिवानंद हिरेमठ, रत्नाकर हिरेमठ, अभिषेक कुलकर्णी, महादेव डोंगरे आणि सुरज धाकपाडे यांनी तो पाहिलेला होता.

#### सोलापुरात आढळल्या कोतवाल पक्षाच्या चार उपप्रजाती

सोलापुरात आतापर्यंत कोतवालच्या चार उपप्रजाती आढळून आले आहे. त्यामध्ये काळा कोतवाल, पांढऱ्या छातीचा कोतवाल, राखाडी कोतवाल आणि शेंडीवाला कोतवाल याचे अधिवास दाट जंगलात आहे. याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मध्यम आकाराचा त्याच्या डोक्यावर केसासारखी दिसणारी लांब पिसे असतात. ही पिसे सहजपणे दिसून येत नाहीत. चोच लांब, जाड आणि थोडीशी बाक असते. शेपटीच्या टोकाची पिसे वरच्या बाजूला अधिक वळलेली, रंगाने काळा असून शरीरावर प्रकाश पडल्यानंतर चमकदार उठून दिसतो.



### आनंद विजयाचा

**सोलापूर : कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ओएसिस सोलापूर ओपन महिलांच्या जागतिक मानांकन टेनिस स्पर्धेत गुरुवारी सकाळी दुहेरीमध्ये स्रिती भसीन(भारत) व श्राव्याशिवानी चिल्कालापुडी या जोडीवर चुरशीच्या सामन्यात ३-६, ७-६,१०-७ असा विजय मिळवल्यानंतर मधुरमा सावंत(भारत) व वीरा दिपइरम (थायलंड) ही जोडी आनंद व्यक्त करताना. पाठीमागे त्यांचे मार्गदर्शकही आनंद व्यक्त करीत आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# चौथ्या मजल्यावरून पडल्याने कामगाराचा मृत्यू

### सावन हॉटेलच्या बाजूस सुरू असलेल्या अपार्टमेंटच्या बांधकामावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर -**

नवीन इमारतीचे चौथ्या मजल्यावर काम चालू होते. काम करीत असताना तोल जावून खाली पडल्याने बांधकाम मजुराचा गंभीर जखमी होवून मयत झाला आहे. ही घटना जुळे सोलापूर येथील सावन हॉटेलच्या बाजूला असलेल्या नवीन इमारतीमध्ये दुपारी घडली आहे.

दत्तात्रय किसन गोडसे (वय ३१, रा. संजय गांधीनगर झोपडपट्टी नं २, विजापूर रोड) असे मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. दत्तात्रय हा सेंट्रींग मिस्त्री म्हणून काम करीत होता. तो हा दि.१२ डिसेंबर रोजी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास जुळे सोलापुरातील सावन हॉटेलच्या शेजारी सुरु असलेल्या एका इमारतीचे बांधकामावर काम करीत होता. बांधकाम इमारतीच्या चौथ्या मजल्यावर सुरु होते. काम करीत असताना त्याचा तोल गेल्याने चौथ्या मजल्यावरून खाली पडला. त्यास डोक्यास गंभीर जखमी होवून बेशुध्द झाला. त्यास बेशुध्द अवस्थेत उपचारास साडेतीनच्या सुमारास भाऊ राजेंद्र गोडसे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. तो उपचारापूर्वीच मयत झाल्याची माहिती सिव्हिलचे डॉ. तुषार मेठे यांनी दिली असून याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे. मृताच्या मागे पत्नी,दोन मुले, आई वडील व भाऊ असा परिवार आहे.

# खुल्या जागांचा विनियोग, उपयोग करण्यात महापालिकेला अपयश

### भूमी व मालमत्ता विभागाने केली आत्तापर्यंत 11 कोटींची वसुली

### उत्पन्न वाढीकडे प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १२ डिसेंबर-**

चालू आर्थिक वर्ष सन- २०२४-२५ मध्ये महापालिका प्रशासनाने भूमी व मालमत्ता विभागाला ८ कोटी १२ लाख ८३ हजार ९८२ रुपयांचे उद्दिष्ट दिले आहेत. अशा एकूण ३० कोटी ९८ लाख ६१ हजार ३७४ रुपयांपैकी आजतागायत १० कोटी ७६ लाख २२ हजार २७६ रुपयांची वसुली झाली आहे. महापालिकेच्या इतिहासात यंदाच्या वर्षी प्रथमच आत्तापर्यंत ११ कोटी रुपयांची चांगली वसुली झाली आहे. दरम्यान, खुल्या जागांचा चांगला विनियोग, उपयोग करण्यात महापालिकेला अपयश आले असल्याचे दिसून येते.

महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाला चालू आर्थिक वर्षात ८ कोटी १२ लाख रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहेत. यापूर्वीच्या वर्षात देखील याच प्रकारे वसुलीचे उद्दिष्ट देण्यात येत होते. गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेच्या गाळे भाडेवाडीचा विषय पुढे आला आणि गाळेधारकांनी महापालिकेकडे भाडेच भरणे बंद केले होते. काही गाळेधारकांवर गाळे ताब्यात घेण्याची किंवा सील करण्याची कारवाई देखील झाली. मात्र महापालिकेच्या इतिहासात यंदाच्या वर्षी प्रथमच आत्तापर्यंत ११ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. तर लोकअदालत आणि पुढील मार्चपर्यंत आणखी १० कोटी रुपयांची ही मोठी वसुलीच होणार आहे. यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे. महापालिकेच्या मालमत्ता विभागाकडे मार्चअखेर २२ कोटी ८५ लाख ७७ हजार ३९२ रुपयांची थकबाकी आहे शिवाय चालू आर्थिक वर्ष सन- २०२४-२५ यामध्ये प्रशासनाने भूमी व मालमत्ता विभागाला ८ कोटी १२ लाख ८३ हजार ९८२ रुपयांचे उद्दिष्ट दिले आहेत. अशा एकूण ३० कोटी ९८ लाख ६१ हजार ३७४ रुपयांपैकी आजतागायत १० कोटी ७६ लाख २२ हजार २७६ रुपयांची वसुली झाली आहे. काही लोकप्रतिनिधींसह पुढारी अन् कार्यकर्त्यांनीच घेतलेल्या शहरातील मोक्याच्या जागा आणि समाज मंदिरे-अभ्यासिका केंद्रांपैकी बहुतांश जणांनी गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेचे नाममात्र स्वरूपातील त्रोटक भाडे देखील भरले नसून ही रक्कम कोट्यावधी रुपयाच्या घरात असल्याची माहिती पुढे आली आहे. महापालिकेच्या शहरातील विविध भागात मोक्याच्या ठिकाणी मोठमोठ्या खुल्या जागा आहेत. या खुल्या जागांचा चांगल्या प्रकारे विनियोग आणि उपयोग करून घेण्यात महापालिका प्रशासनाला अपयश आले आहे. तर अनेक ठिकाणच्या मोक्याच्या जागा या नाममात्र भाडे स्वरूपात वर्षानुवर्षासाठी करार करून राजकीय लागेबांधे असलेल्यांना देण्यात आल्या आहेत. शहरातील महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या गाळे हस्तांतरणाच्या निमित्ताने गेल्या दोन महिन्यांपासून मिनी आणि मेजर गाळेधारकांनी महापालिकेकडे आपले अनेक वर्षांपासूनचे प्रलंबित भाडे जमा केले. यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत दंड आणि शास्तीमध्ये सूट मिळत असल्याने अनेकांनी गाळे आणि जागांचे भाडे भरले असले तरी अद्यापही मोठ्या प्रमाणात भाडे प्रलंबित राहिले आहेत. यामुळेच आता पुन्हा १४ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोकअदालतीत नोटिसांच्या माध्यमातून प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.



सोलापूर शहरातील महापालिकेच्या गळ्यामध्ये विविध प्रकारे अनेक बदल झाले. पूर्वी ज्यांच्या नावे गाळे अलॉटमेंट करण्यात आले होते. ते मूळ गाळेधारक हे गाळे दुसऱ्यांना दिले आणि गेल्या अनेक वर्षापासून अशा पद्धतीने जे महापालिकेचे भाडे भरत आहेत पण त्यांच्या नावाने त्या गाड्यांवर नोंद नाही अशांकडून महापालिका प्रशासनाने पुराव्यानिशी अर्ज मागविले होते. मिनी आणि मेजर अशा ६१२ मूळ गाळेधारकाच्या लेखी सहमतीसह अर्ज दाखल केले आहेत.

तपासणीअंती आता महापालिका मिनी गाळेधारकांकडून २० हजार आणि मेजर गाळेधारकांकडून ५० हजार रुपये फी आकारून त्यांच्या नावे गाळे हस्तांतर करण्यात येणार आहेत. याची प्रक्रिया पुढील आठवड्यापासून सुरू होणार आहे. अनेक ठिकाणच्या मोक्याच्या जागा या नाममात्र भाडे स्वरूपात वर्षानुवर्षासाठी करार करून राजकीय लागेबांधे असलेल्यांना देण्यात आल्या आहेत. यामुळे कोट्यावधी रुपये किमतीच्या मोक्याच्या जागांवर किरकोळ स्वरूपात भाडे मिळत आहेत. तर जागा धारण केलेल्या अनेकांनी त्याचे त्रोटक भाडे देखील जमा करत नसल्याचे पुढे आले आहे.

#### महापालिकेच्या १२५० गाळ्यांसह एकूण २९१२ मालमत्ता

| |
|---|
| मेजर गाळे - ५९७, मिनी गाळे - ६५३, |
| बी.ओ.टी. - १६६, लँड फी - ३८०, |
| समाज मंदिर - ५५, अभ्यासिका केंद्र - 30, |
| टि.पी. 3/२3- ४६०, २५६ गाळे - २५६, |
| अधिकृत खोके- 3१५ महापालिकेच्या |
| अशा एकूण एकूण - २,९१२ मालमत्ता आहेत. |

#### शहरातील समाज मंदिरे-अभ्यासिकांचे कोट्यांवधीचे भाडे थकीत

शहरातील महापालिकेच्या असलेल्या गाळ्यांपैकी अद्यापही ४०० मिनी तर ३०० हून अधिक मेजर गाळेधारकांनी महापालिकेकडे भाडे जमा केले नाही. राजकीय पुढारी आणि संघटना संस्था यांच्याकडे देण्यात आलेली समाज मंदिरे, अभ्यासिका केंद्र, मोक्याच्या जागा ताब्यात घेतलेल्या अन अधिकृत खोकेधारकांनी आपले थकीत भाडे भरलेले नाही. यानुसार ही थकबाकी आता १९ कोटी ६३ लाख ३९ हजार ९८ रुपये इतकी आहे. याच्या वसुलीसाठी आता विविध प्रकारे महापालिका प्रशासन आणि भूमी व मालमत्ता विभाग प्रयत्न करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७३

**आतां पार्था नि:शंकु होईं । या संग्रामा चित्त देईं ।**
**एथ हें वांचूनि कांही । बोलों नये ।।**

आत्मज्ञान होणे, धर्माचरणाचे पालन होणे किती महत्वाचे आहे हे भगवंत सांगत आहेत. ज्ञानी, अनुभवी तसेच श्रेष्ठ माणसांनी धर्माचरणाचे पालन करुन ईतरांसमोर आदर्श निर्माण करुन ठेवायचा असतो. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी कर्मापासून पलायन करता कामा नये. त्यांनी पलायन केले तर शेकडो लोक त्यांच्या मागे धावतील, त्यांचा मार्ग चुकतील, म्हणून आत्मज्ञानाने किंवा सत्यस्वरुपाप्रमाणे जे वागतात त्यांनी आपल्याप्रमाणे प्रकृतीचा अभिमान ईतरांनीही धरु नये ही वृत्ती आपल्या आचरणातून निर्माण करावी. सुर्यप्रकाशात जसे प्राणीमात्रांकडून चांगले व्यवहार होतात, तसेच ज्ञानी माणसाकडे पाहून चांगले व्यवहार लोक करतात. ज्ञानी लोक कर्म करुनही कर्मबंधनात गुंतत नाहीत, जसे सूर्य लोकांना प्रकाश देतो मात्र दिलेल्या प्रकाशात लोकाकडून होणा-या कर्मात तो लिप्त होत नाही. तसे ईतरांनीही कर्मबंधनात अडकू नये म्हणून ज्ञानी लोकांनी त्यांच्या वर्तनातून आदर्श निर्माण करावा. हे कर्म, कार्य मी केले, हे माझ्यामुळेच झाले, याचा कर्ता मीच आहे. असे ज्ञानी लोक म्हणत नाहीत. अर्थात,



मी पणाच्या दुर्गंधी मध्ये ते अडकत नाहीत. म्हणून अर्जुना तू पण देहासक्त होऊ नकोस. तुझ्याकडे असतील तर त्या सर्व स्वार्थी इच्छा ज्ञानी माणसाप्रमाणे टाकून दे. धनुष्यबाण हातात घे, रथावर आरुढ हो आणि समाधानाने वीर वृत्तीचा तू स्वीकार कर. पृथ्वीवरील दुष्टांचा भार, अन्यायाचा भार तू युध्द करुन कमी कर. या न्यायाच्या युध्दातून तुला कीर्ती मिळेल, ती कीर्ती तू वाढव आणि स्वधर्माची मान कळसापर्यन्त तू चढव. असे सांगतांना भगवंत, आतां पार्था नि:शंकु होईं । या संग्रामा चित्त देईं । एथ हें वांचूनि कांही । बोलों नये ।।, असे म्हणाले. भगवंत पुढे म्हणाले, आतां तू शंकारहित हो आणि या युध्दाकडे लक्ष दे. युध्दाशिवाय या युध्दभुमीवर तू दुसरे काही बोलूच नकोस असेही भगवंत म्हणाले. माऊलींनी या ओवीत आतां, हा शब्द वापरला आहे. आतां म्हणजे केंव्हा हा प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो. ईथे आतां म्हणजे भगवंतानी अर्जुनाला आत्मज्ञान, निष्काम कर्म, ज्ञानयोग, कर्मयोग सर्व समजावून सांगित्यानंतर असा अर्थ अभिप्रेत आहे. अर्जुन सहजासहजी युध्दाला तयार होत नाही, हे पाहून भगवंतांनी त्याला उत्कृष्ट प्रकारचे मार्गदर्शन केले. मार्गदर्शन अर्जुनाच्या पचनी पडले आहे, असे भगवंतांना वाटले. म्हणून ते अर्जुनाला आता, ऊठ आणि धनुष्यबाण घेऊन युध्द कर असे म्हणाले. अर्जुना तू बुध्दिवादी आहेस, तुला जास्त सांगण्याची गरज नाही. स्वधर्मानुसार युध्द करण्यास आला आहेस तू हे युध्द तुझे कर्तव्य समजून, निष्काम भावनेने हे युध्द कर, असे भगवंत म्हणाले. कोणतेही काम, कर्तव्य करीत असतांना, त्याच्या फळाची अपेक्षा न करता कर्तव्य म्हणून करण्यात जो आनंद आहे, तो आनंद कर्माच्या फळाची अपेक्षा धरुन करण्यात नाही. माऊलींनी संस्कृत भाषेतील अनमोल ज्ञानाचा हा ठेवा, अतिशय कष्टातून आपणां सर्वांसाठी मराठी भाषेत अत्युत्कृष्टपणे आणला आहे. या कार्यामागे कोणतीही अपेक्षा न ठेवता निष्काम भावनेतून स्वधर्माचरण समजून हे कार्य केले आहे. माऊलींच्या या आदर्श मार्गावर आपणही चालण्याचा प्रयत्न करु या. आपण या मार्गावर पूर्णत: चालू लागलो तर आपणास आनंद वेगळयाने शोधावा लागणार नाही असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १३ डिसेंबर २०२४ | रेणुका यात्रा यड्राव, ता. शिरोळ |
| विक्रम संवत् २०८०-८१ | |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी - (१९.४०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - भरणी (०७.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शिव (११.५३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (०९.०३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**वृषभ** : व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढेल.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या.

# डिजिटल सेवेसाठी अ‍ॅग्रीस्टॅक योजना होणार सुरु

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; कृषीक्षेत्र झाले अपडेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य कृषी क्षेत्रात अव्वल स्थानावर झेपावत आहे. राज्य शासनाच्या विविध योजना अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना सर्व सोयी सुविधा तत्काळ उपलब्ध व्हाव्या यासाठी सरकार कृतिशील झालेले दिसत आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणाम कारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची अ‍ॅग्रीस्टॅक ही योजना राज्यात राबविण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने या योजनेची माहिती समाजातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित अ‍ॅग्रिस्टॅक योजनेच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, केंद्रशासन ही योजना राबवत असून राज्य शासनाने ही कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना अधिक जलद सुविधा देण्यासाठी अ‍ॅग्रिस्टॅक ही योजना राज्यात राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांची माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व तो सातत्याने अद्यावत करणे या बाबी अंतर्भूत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांनी या अ‍ॅग्रीस्टॅक योजनेची प्रथम स्वतः सविस्तर माहिती घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत या योजनेची प्रचार प्रसिद्धी करावी. जेणे करून प्रत्यक्ष योजना सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून आवश्यक असलेली माहिती जलद गतीने प्रशासनाला उपलब्ध होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केले. तसेच या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून त्याकरता त्यांचे सर्व इत्यंभूत माहिती घेण्यात येणार आहे, असे ही त्यांनी सांगितले. प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी अ‍ॅग्रीस्टॅग या योजनेविषयी माहिती दिली. त्यानंतर बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ऍग्रीस्टॅक योजना बीड जिल्ह्यात कशा पद्धतीने राबविण्यात आली. तसेच ही योजना काय आहे व प्रत्यक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये कशा पद्धतीने कामकाज करावयाचे आहे याविषयीची अत्यंत सविस्तर माहिती ऑनलाईनद्वारे दिली. या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.




### कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर

केंद्र शासनाची ही अ‍ॅग्रिस्टॅक योजना एक पथदर्शक प्रकल्प म्हणून बीड जिल्ह्यात यापूर्वीच राबविण्यास सुरुवात झालेली आहे. ही योजना केंद्र शासनाची महत्त्वपूर्ण योजना असून राज्य शासनाने ही योजना राज्यात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात बाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत कार्यक्षमपणे पार पाडून कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी व्हावा, यासाठी आवश्यक असलेली माहिती अत्यंत बिनचूकपणे शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अ‍ॅप मध्ये भरावी, असे निर्देश ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. ही योजना संपूर्ण राज्यात १६ डिसेंबर पासून मिशन मोडवर सुरू होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## वसंतराव नाईक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक किरण गिऱ्हे यांनी केले आहे. सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून १ लाख थेट कर्ज योजनेमध्ये संपूर्ण कर्ज महामंडळाकडून दिले जाणार आहे. लाभार्थीने रु.२०८५/- चा नियमित ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला सात रस्ता सोलापुर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२९९२०८० येथे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक किरण गिऱ्हे यांनी केले आहे.




## मोफत सर्व रोग औषधोपचार शिबिरात २५० नागरिकांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

भावनाऋषी आरोग्य केंद्र व शिवबा संस्थेच्या वतीने मोफत सर्वरोग व औषधोपचार शिबीर अशोक चौक येथील हनुमान मंदीर येथे सुरुवात करण्यात आली. श्री धन्वंतरी प्रतिमेची पूजन व दीपप्रज्वलन या भागातील जेष्ठ नागरिक श्रीहरी गुडूर व श्रीनिवास बिल्ला यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिवबा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निरंजन बोध्दूल, डॉ. बालराज म्हेत्रे, बालरोग तज्ञ डॉ. मंजूषा चाफळकर, डॉ. दिपाली हुली, डॉ. मुनाली खंदारे, डॉ. वड्डेपल्ली आदींची प्रमुख उपस्थिती होती. या शिबीरामध्ये २५० नागरिकांना मोफत तपासणी करून गोळ्या औषधे देण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी लखन बोध्दूल, सुमित्रा काळे, अर्पिता सातपुते, शितल रेणूके, वर्षा दरगुडे, वर्षा म्हेत्रे, रेश्मा मुजावर, विजय लिगडे, अफ्रिन शेख, रेहान शेख, जुनैद मुजावर, इंदिरा सामल, अनिता बुरकुले, नलिनी अमर, लक्ष्मी जाधव, आयेशा रंगरेज, अनिता कंदी आदींनी परिश्रम घेतले.

## १६ डिसेंबरला डाक अदालत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

टपाल खात्याच्या सेवेसंबंधीच्या तक्रारीचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी टपाल खाते नियमितपणे डाक अदालतीचे आयोजन करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूरचे पोस्ट कार्यालय प्रवर अधिक्षक यांच्या समोर डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरची ११७ वी डाक अदालत दि.१६ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न होणार आहे.

पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ह्या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पोस्टाच्या कार्यपध्दतीविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषत: टपाल स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, डाक वस्तू, पार्सल, बचत बँक तसेच मनिऑर्डरबाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत. दरम्यान सदर तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा, संबंधितानी डाक सेवेबाबतची आपली तक्रार सोलापुर विभागीय पोस्ट कार्यालय प्रवर अधिक्षक के. नरेंदर बाबु यांच्या नावाने दोन प्रतीसह आज दि. १२ डिसेंबरपर्यंत पाठवावीत. त्यानंतर आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. असेही डाकघर विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## पुण्यातील बालरंगभूमी संमेलनात सोलापूरच्या ३०० बाल कलाकारांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

बालरंगभूमी परिषदेच्या वतीने दिनांक २०, २१ आणि २२ डिसेंबर या कालावधीत पुण्यातील अण्णा भाऊ साठे नाट्यगृह येथे पहिले बालरंगभूमी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. प्रसिद्ध नाट्य-चित्रपट अभिनेते मोहन जोशी यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांनी दिली.

संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, अजित भुरे, सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष विजय गोखले, सविता मालपेकर, सुबोध भावे यांच्यासह नाट्य व बालनाट्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या संमेलनासाठी सोलापूर जिल्ह्यातून पंढरपूर ४५, सोलापूर शहर ४५, मंगळवेढा १३० असे २३० विदयार्थी समूह नृत्याचे सादरीकरण करणार आहेत. संमेलनाच्या समारोप २२ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता होणार असून याच कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मी प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी परिषद पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. मोहन आगाशे, सचिन पिळगावकर, मोहन जोशी, गंगाराम गव्हाणकर, प्रियदर्शनी इंदुलकर, गणेश मतकरी, ऋजुता देशमुख यांच्या उपस्थितीत डॉ.सलील कुलकर्णी, संदीप खरे, पद्मश्री परशुराम गंगावणे, उदय देशपांडे, मेघना एरंडे, शैलेश दातार यांचा सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती यलगुलवार यांनी दिली.

## महापालिकेच्या वतीने देशभक्त डॉ. कृ. भि अंत्रोळीकर यांना अभिवादन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने देशभक्त डॉ. कृ. भि अंत्रोळीकर जयंतीनिमित्त अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर (दत्त चौक) येथील देशभक्त डॉ. कृ. भि अंत्रोळीकर यांच्या पुतळ्यास विभागीय अधिकारी हिदायत मुजावर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मोहन अंत्रोळीकर, दत्ता मस्के, चेतन प्रचंडे, यल्लाप्पा पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.




## शेख, जाधव, कोळी, माने, घोळवे, पाटील प्रथम

### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

नीलम नगर येथील नेताजी शिक्षण संकुलात आयोजित ५२ व्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शेख, जाधव, कोळी, माने, घोळवे, पाटील आदींनी प्रथम क्रमांक पटकाविला.

प्राथमिक गटातून जुनैद शेख, आर्यन जाधव( हर्षवर्धन हायस्कूल तळे हिप्परगा), यासीन इनामदार (प्रणितीताई शिंदे विद्यालय), श्वेताली बंडगर (जि.प. शाळा तेलगाव सिना) अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविले. माध्यमिक गटातून समीक्षा कोळी, नम्रता माने (हर्षवर्धन हायस्कूल तळे हिप्परगा), कृष्णा मनोहर, रामू गुडूर (धर्मणा सादुल प्रशाला), सायरीज पठाण, तनिष्का कोकाटे (सिंहगड पब्लिक स्कूल) आदींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविले. शिक्षक प्राथमिक गटातून सुजाता घोळवे (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिटणे) प्रथम तर शिक्षक माध्यमिक गटातून शीतलकुमार पाटील (राजराजेश्वरी माध्यमिक प्रशाला) प्रथम क्रमांक पटकाविले. प्रा. बसवराज साखरे, प्रा. धनंजय जिडगीकर, प्रा. आय.बी. शेख आदी परिक्षकांनी १३२ परिक्षण केले. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे राष्ट्रपती पुरस्कार विजेते सिद्धेश्वर म्हेत्रे, संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, विज्ञान विषय साधन व्यक्ती चंद्रकांत वाघमारे, शेळगीचे केंद्रप्रमुख विकास पाटील, रेवणसिद्ध रोडगीकर, विजयकुमार हुंल्ले, सुभाष धुमशेट्टी, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, वैशाली कुंभार, विज्ञान शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संजय जवंजाळ आदी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.


# पीक कर्जाची मर्यादा वाढली; शेतकऱ्यांमध्ये समाधान

### कर्ज वेळेत मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

रिझर्व बँकेने पीक कर्जाच्या मर्यादेत वाढ केली आहे. आता शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख पीक कर्ज मिळू शकणार असल्याने त्यांच्यातून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील काही बँकांकडून कर्जासाठी शेतकऱ्यांना योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याने आगामी वर्षांपासून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कर्ज न देणाऱ्या बँकांना कडक सुचना द्याव्यात, अशी अपेक्षा जाणकार शेतकऱ्यांची आहे.

कृषीसाठी बिगर तारण कर्ज देण्याकरता यापूर्वी एक लाख साठ हजार रुपयांपर्यंतची मर्यादा होती. रिझर्व बँक ऑफ इंडियाने ही मर्यादा आता दोन लाख रुपयापर्यंत वाढविली आहे. या वाढीव मर्यादेची अंमलबजावणी नव्या वर्षात म्हणजे २०२५ पासून सुरु होणार आहे. या निर्णयामुळे देशातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाचे मुख्य सरव्यवस्थापक आर. गिरीधरन् यांनी यासंदर्भातील पत्र ६ डिसेंबर रोजी जारी केले आहे. देशातील शेड्युल्ड, कमर्शियल बँका व सर्व प्रादेशिक व ग्रामीण बँका, स्मॉल फायनान्स बँक, राज्य सहकारी बँक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन, व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना या संदर्भातील पत्र रिझर्व बँकेने पाठविले आहे. शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यामध्ये झालेली दरवाढ, शेतीसाठी आवश्यक असलेल्या निविष्ठांमध्ये झालेली दरवाढ, वाढलेले मजुरीचे दर या सर्व बाबींचा विचार करून रिझर्व बँकेने बिगर तारण शेती कर्जाची मर्यादा वाढविली आहे. पीक कर्जाची मर्यादा वाढविल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब, केळी, द्राक्ष आणि ऊस बागायतदार शेतकऱ्यांसह इतर बागायती व जिरायती शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. मात्र काही बँका हे पिक कर्ज देण्यासाठी टाळाटाळ करतात. यासाठी शेतकरी फेऱ्या मारून वैतागून जातात. हे पीककर्ज शेतकऱ्यांना वेळेवर मिळावे यासाठी जिल्हाधिकारी बैठकाही घेतात मात्र काही बँकांचे अधिकारी ऐकत नाहीत. यामुळे आगामी वर्षांपासून जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या पीककर्जासाठी कडक पवित्रा घ्यावा, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.





## बुर्ला महाविद्यालयात डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या हस्ते. डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी कस्तुरबाई शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, महाविद्यालयातील प्रा.डॉ. शिवानंद भांजे, प्रा. टी. व्ही. शिंदे, प्रा.डॉ. अ‍ॅनी जॉन, प्रा.सुरेखा बत्तुल, प्रा. टी.एन. शिंदे, प्रा.डॉ. शंकर राजे, प्रा. पंचप्पा वाघमारे, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. डॉ. दरेप्पा बताले, प्रा.विकास शिंगे, प्रा. नानासाहेब गव्हाणे, प्रा. महादेवराव गायकवाड, प्रा. मुलगे, प्रा. कर्रे, प्रा. शेरीकर उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### श्री शिवाजी महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**बार्शी, दि. १२ डिसेंबर-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली. गोविंद गुरु जनजातीय विद्यापीठ, बन्सवांडा (राजस्थान) येथे १६ ते १९ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो- खो स्पर्धेसाठी गैरी राऊत, समीना मुलाणी, स्नेहल उबाळे, सुषमा बनसोडे तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे दिनांक १४ ते १८ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी यश भाट हिची निवड झाली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, प्रा.संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. खो-खो संघाचे सराव शिबीर डॉ. सुभाष मारकड व व्हॉलीबॉल संघाचे सराव शिबीर प्रा.खंडू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे सुरु आहे. या निवडीबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, प्रबंधक प्रमोद जाधव, संतोष कवडे यांनी अभिनंदन केले.



### बार्शीच्या सुलाखे कॉलेजच्या क्रांती मोरेची जलतरण स्पर्धेत कामगिरी

**बार्शी दि. १२ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत जलतरण स्पर्धेत बार्शीच्या बीपी सुलाखे कामर्स कॉलेजच्या क्रांती ब्रह्मदेव मोरे हिने उल्लेखनीय कामगिरी केली. सोनी महाविद्यालय सोलापूर यांनी ही स्पर्धा वीर सावरकर जलतरण तलावामध्ये आयोजित केली होती. यातल क्रांती ब्रह्मदेव मोरे व रुपेश केमदारने भाग घेतली होता. क्रांतीने १०० मीटर फ्री स्टाईल द्वितीय, २०० मीटर द्वितीय, ४०० मीटर प्रथम, ८०० मीटर प्रथम, २०० मीटर ब्रेस्टट्रोक द्वितीय क्रमांक, १०० मीटर बॅक स्ट्रोक तृतीय क्रमांक, १०० मीटर व २०० मीटर बटरफ्लाय प्रथम क्रमांक, २०० मीटर व ४०० मीटर आयएममध्ये प्रथम क्रमांक मिळवला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. एस. बी.करंडे यांनी अभिनंदन केले.



### महाकुंभमेळ्यासाठी वेताळ चौक मंडळातर्फे थैली, थाळी भेट

**अक्कलकोट, दि.१२ डिसेंबर-**

अक्कलकोट शहरातील वेताळ चौक मित्र मंडळ व तम्मा मामा शेळके मित्र परिवाराकडून १४४ वर्षांनी साजरा होणाऱ्या महाकुंभमेळ्यासाठी एक डझन थैली व एक डझन थाळी अक्कलकोट पर्यावरण गतिविधी व निसर्गसेवा फाउंडेशनला भेट दिली आहे. प्रयागराजमध्ये होणाऱ्या महाकुंभमेळला शंभर देशातून ४० कोटींहून अधिक संत, महात्मे, भाविक भक्त येण्याची शक्यता आहे. येथील कचरामुक्त करण्यासाठी पर्यावरण गतिविधि व निसर्गसेवा फाउंडेशन वतीने एक थैली एक थाळी असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद अक्कलकोट शहर व तालुक्यात सर्वस्तरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यावेळी ग्रामविकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोड, निसर्ग फाउंडेशन अक्कलकोट तालुका पर्यावरण पर्यावरण प्रमुख महेश वागदरे, संयोजक सुनील बिराजदार, सहसंयोजक विद्याधर गुरव, देवरमनी, लोकपुरे उपस्थित होते.



### डॉ. नितीन ढेपे यांचा सत्कार

**अणदूर, दि. १२ डिसेंबर-**

अणदूरचे सुपुत्र वंचित बहुजन आघाडीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. नितीन ढेपे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा वंचितचे धाराशिव जिल्हा सहसचिव आर. एस. गायकवाड यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तुळजापूर तालुका प्रसिद्धी प्रमुख राहुल कांबळे उपस्थित होते. डॉ. ढेपे म्हणाले की, या पदाच्या माध्यमातून वंचित आघाडी हा पक्ष ग्रामीण भागात वाढवणार असून बहुजन, गरीब जनतेची सेवा करणार असल्याचे सांगितले,या प्रसंगी धाराशिव जिल्हा बहुजन वंचित आघाडीच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा

## आ. समाधान आवताडे यांचे अधिकाऱ्यांना आवाहन; मंगळवेढ्यात आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ डिसेंबर-**

दुसऱ्यांदा आमदारपदी विराजमान झाल्यानंतर आ. समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यातील प्रशासनाची पहिली आढावा बैठक घेत अधिकाऱ्यांनी गतिमान प्रशासन चालवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे, शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ द्या. या कामात हलगर्जीपणा दिसून आला तर मी कुणाचीही गय करणार नाही. जे ठेकेदार टेंडर घेऊन काम न करता बसले आहेत त्यांना तात्काळ काळ्या यादीत टाका अशी तंबी प्रशासनास देत यापुढे दर महिन्याला प्रत्येक विभागाची स्वतंत्र बैठक घेऊन आढावा घेतला जाईल, कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

मंगळवेढा येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये प्रशासनातील सर्व खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती यावेळी आमदार आवताडे बोलत होते. या बैठकीला माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, प्रांताधिकारी बी. आर. माळी, तहसीलदार मदन जाधव, गटविकास अधिकारी योगेश कदम, जिल्हा दूध संघाचे संचालक औदुंबर वाडदेकर, माजी सभापती तानाजी काकडे, माजी उपसभापती सुरेश ढोणे, रामेश्वर मासाळ, माऊली कोंडुभैरी, प्रकाश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.



### रिक्त पदे भरण्याची मागणी

पशुसंवर्धन विभागांतर्गत जनावरांची जनगणना होत असून प्रत्येकाच्या घरी जाऊन अचूकपणे जनगणना करण्याच्या सूचना देण्यात आल्या, शिक्षण व आरोग्य विभागाकडून अनेक पदे रिक्त असून ती पदे तात्काळ भरण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी मागणी आ. अवताडे यांच्याकडे केली.

### जलजीवनला भेटी देणार

काही ठिकाणी जलजीवनच्या कामांमध्ये निकृष्ट कामे झाल्याच्या तक्रारी आहेत, अशा कामांना मी स्वतः भेटी देणार असल्याचेही आमदार अवताडे यांनी सांगितले.

या आढावा बैठकीमध्ये आमदार समाधान आवताडे यांनी प्रत्येक विभागाच्या खाते प्रमुखांकडून त्या त्या विभागातील कामाचा आढावा घेतला योजनेच्या अंमलबजावणी मध्ये आपल्याला काही अडचणी येतात का?, इतर काही साधनसामुग्रीची कमतरता आहे का? काम करण्यास तुमच्या काही अडचणी आहेत का? याची सविस्तर माहिती घेण्यात आली. यावेळी पंचायत समिती बांधकाम खात्याकडे निविदास्तर कामे किती? पूर्ण किती? अपूर्ण किती? सुरू न झालेली किती याची माहिती घेऊन ज्या ठेकेदाराने टेंडर घेऊन सहा महिने काम सुरू केले नाही, त्या ठेकेदारांना आजच्या आज नोटिसा काढून ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याचा सूचना देण्यात आल्या. कृषी विभागाला विम्यामध्ये बोगसगिरी होत असून बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने येणाऱ्या काळात टंचाई जाणवण्याची शक्यता असून त्यांचा आराखडे तात्काळ तयार करून पिण्याच्या पाण्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.

नगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा घेत असताना अनेकांनी नगरपालिकेच्या कारभाराविषयी तक्रारी केल्या. गटारी तुंबल्या आहेत, साथीचे रोग वाढत आहेत, एका कुटुंबात अनेक घरकुले दिली आहेत, मुख्याधिकारी लक्ष घालत नाहीत, अशी तक्रार एका नागरिकाने केली असता आमदार अवताडे यांनी तुम्हाला मंगळवेढ्याचे काम झेपत नसेल तर जागा मोकळी करा, जबाबदार अधिकारी काम करण्यासाठी येईल असे म्हणत आठ दिवसात कामकाजात सुधारणा करा अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल अशी तंबी मुख्याधिकाऱ्यांना दिली. भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे बिल हे कोटीच्या घरात गेले असून शिखर समितीला ही योजना चालवणे शक्य नसून शिखर समिती रद्द करून ही योजना शासनाकडे हस्तांतर करा अशी मागणी यावेळी करण्यात आली याचबरोबर महावितरण विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून मी मंजूर करून आणलेले ट्रान्सफार्मर हे ठेकेदार आम्ही मंजूर करून आणतो असे सांगून शेतकऱ्यांकडून पैसे लुबाडत आहेत यावर संबंधित महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे अन्यथा मला माझ्या पद्धतीने तुमच्यावर लक्ष द्यावे लागेल असा इसारा महावितरण विभागाला देत जर कोणत्या शेतकऱ्याकडून पैशाची मागणी केली तर गाठ माझ्याशी आहे असा सज्जड दम महावितरण अधिकाऱ्यांना दिला याचबरोबर म्हैसाळ योजना भूमी अभिलेख सहाय्यक निबंधक आगार व्यवस्थापन क्रीडा अधिकारी राज्य उत्पादन शुल्क अन्न औषध प्रशासन भूजल सर्वेक्षण वनविभाग महसूल विभाग आदी विभागांचा आढावा घेत कामात गतिमानता आणा मी अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा प्रत्येक विभागाची स्वतंत्र आढावा बैठक लावून दर महिन्याला कामात किती सुधारणा झाली हे पाहणार आहे व कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार नाही असा इशारा आ आवताडे यांनी बैठकी प्रसंगी दिला.

### रुग्णवाहिकेला डॉक्टर नाही

मंगळवेढा तालुक्यामध्ये १०८ नंबरवर अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी २ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. यातील भोसे येथील रुग्णवाहिका सुरू असून मंगळवेढा येथील रुग्णवाहिकेला डॉक्टर नसल्याने अपघात असताना मदत करण्यासाठीही गाडी जात नाही, त्या ठिकाणी तात्काळ डॉक्टरची भरती करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

### २५२ जणींना लेक लाडकीचा लाभ

एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाने लेक लाडकी अंतर्गत २५२ लाभार्थ्यांना लाभ, तर लाडकी बहीण अंतर्गत ५४,२५७ लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे सांगितले.

## संविधानाची विटंबना; आरोपींवर कारवाई करा

### रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ डिसेंबर-**

परभणीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान हा निषेधार्ह असून संविधानाचा अवमान प्रकरणातील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पक्षा (आठवले) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.



आंबेडकरी जनता बाबासाहेबांच्या संविधानाचा अपमान खपवून घेणार नाही. संविधानाचा अवमान करणाऱ्या आणी या प्रकरणा मागील सूत्रधार कोणीही असू दे त्या आरोपीवर कठोरातील कठोर कारवाई करावी अशी मागणीही रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे. परभणीतील संविधान अवमान घटनेप्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करुन या मागचा सूत्रधार शोधण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले भाग पाडावे, संविधानाचा अवमान करणे हा अत्यंत गंभीर आणि राष्ट्रद्रोही गुन्हा आहे. या प्रकरणी तातडीने लक्ष द्यावे.या प्रकरणातील आरोपीला अटक झाली आहे. आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्र आहेत. निषेध आंदोलनातून त्या भावना व्यक्त झालेल्या आहेत.

## पिलीव येथे कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ डिसेंबर-**

> परभणी येथे संविधान प्रतिकात्मक पुस्तकेची विटंबना झाल्याचा निषेध

परभणी येथे संविधान प्रतिकात्मक पुस्तकेची विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर विटंबना करण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ आज माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे बहुजन समाजाच्या वतीने बंदचे आयोजन करण्यात आले होते. या बंदला पिलीव येथील सर्व व्यापाऱ्यांनी दुपारी बारा वाजेपर्यंत सर्व व्यवहार बंद ठेवत आपला पाठिंबा दिला. यावेळी बहुजन समाजाने पिलीव पेठेतून शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही शांतता रॅली पिलीव येथील वेशीपासून सुरुवात झाली तर पिलीव पोलीस स्टेशनला निवेदन देत ही रॅली संपली.यावेळी बहुजन समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यामध्ये दोषी असणाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करण्याची मागणी सदरच्या निवेदनात करण्यात आली.हे निवेदन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप गोसावी यांनी स्वीकारले. यावेळी हवालदार धनाजी झगडे, अमित जाधव, काझी ,आडत उपस्थित होते.सदरचा बंद हा अतिशय शांततेच्या मार्गाने संपन्न झाला कोणताही अनुचित प्रकार यावेळी घडला नाही. पोलीस प्रशासनाने यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



## परभणी घटनेचा श्रीपूरमध्ये निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १२ डिसेंबर-**

परभणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना घडली, त्या घटनेचा निषेध म्हणून श्रीपूरमध्ये आज शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवला.

आरपीआय आठवले गट, वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने स्थानिक पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या नराधमाला फाशी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे संदिप घाडगे, आरपीआयचे सचिन ताकतोडे, जगदीश इंगळे, पत्रकार बी. टी. शिवशरण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्थानिक पोलीस प्रशासनाच्या वतीने बाळासाहेब पानसरे, हवालदार गायकवाड यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी राजरत्न नाईकनवरे, विकी लंगडे, राजू सुरवसे, राज आठवले, सुखदेव साठे, सागर सावंत, गौतम आठवले, दशरथ हिवराळे, सागर आठवले, समाधान लांडगे, नाना उबाळे, गुडू भालशंकर, अतिश आठवले, ज्ञानेश्वर काटे, नितीन मोटे, रणजित बाबर, प्रथमेश लोंढे, अमोल बनसोडे उपस्थित होते.

## पंढरीत ग्राहक प्रबोधन पंधरवड्याचे आयोजन

### राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ डिसेंबर-**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, सोलापूर जिल्ह्यातर्फे २४ डिसेंबर या राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक प्रबोधन, जागरण पंधरवड्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने ५१ व्या वर्षात पदार्पण केले आहे त्यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणात हा प्रबोधन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. देशभरामध्ये २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून शासकीय,अशासकीय पातळीवर साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने दिनांक १५ डिसेंबर पासून ३१ डिसेंबर पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विविध कार्यक्रम,उपक्रम,स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तहसील कार्यालये, पुरवठा विभाग, पंचायत समिती, शिक्षण, आरोग्य, महिला व बाल कल्याण,सार्वजनिक बांधकाम, महावितरण, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, वजन मापे (वैधमापन), अन्न व औषध प्रशासन (भेसळ प्रतिबंधक), नगरपालिका,महानगरपालिका, टपाल कार्यालये, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था, पोलिस विभाग,कोषागार कार्यालय, आर.टी.ओ कार्यालये, तसेच व्यापारी कमेटी, कृषी उत्पन्न बाजार समिती, अशा विविध शासकीय, अशासकीय कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी सुधारित ग्राहक संरक्षण कायदा २०१९ बाबत व ग्राहक चळवळीची माहिती दिली जाणार आहे.

यासाठी प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा संघटक दीपक इरकल, सचिव सुहास निकते, कोषाध्यक्ष सचिन साखरे, जिल्हा सहसंघटक डॉ. मैत्रेयी केसकर, जिल्हा उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, जिल्हा महिला विभाग प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, संतोष उपाध्ये, पांडुरंग अल्लापूरकर तसेच संबंधित खात्याचे अधिकारी व प्रत्येक तालुका अध्यक्ष, संघटक, सचिव हे उपस्थित राहून प्रबोधन, मार्गदर्शन करणार आहेत.

## माढ्यात स्ट्रीट लाईटचा पडला उजेड

### नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे, मुख्याधिकारी नेहा कंठे यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १२ डिसेंबर-**

प्रभाग क्रमांक १५ मधील फरतडे वस्ती, चवरे वस्ती ते माढा-शेटफळ रोड येथे स्ट्रीट लाईट बसवण्यात येत असून याचे उद्घाटन नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे, मुख्याधिकारी नेहा कंठे, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे यांनी केले.



माढेश्वरी मंदिर, इंदिरानगर, श्रीरामनगर, मनोज जबडे ते चवरे वस्ती येथे स्ट्रीट लाईट बसवण्यासाठी नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांच्या प्रयत्नातून ६६ लाखांचा निधी मंजूर आहे. चवरे वस्ती, फरतडे वस्ती व माढा-शेटफळ रोड स्ट्रीट लाईट बसवण्यात येआहे. याप्रसंगी सभापती अरुण कदम, विकास साठे, नितीन साठे, नगरसेविका वंदना लंकेश्वर, रेश्मा लंकेश्वर, निर्मला थोरात, शबाना बागवान, मोहिनी नेटके, सुनीता राऊत, माजी नगराध्यक्षा अनिता सातपुते, नगरसेवक अजिनाथ माळी, मारुती पवार, शिवाजी जगदाळे, चंद्रकांत कांबळे, शहाजी चवरे, रमेश थोरात, सुधीर लंकेश्वर, अमोल नेटके, मुन्ना बागवान, नगरपंचायतीचे पी. एस. भोरे , प्रदिप शिंदे, हंगे, प्रभागातील प्रवीण पवार, नागेश थोरात, सागर फडतरे, विजय सातपुते, बाबासाहेब फडतरे, समाधान फडतरे, गणेश फडतरे, शिवाजी फडतरे, सुरेश फडतरे, शशिधर थोरात, मधुकर खरात, धनू गाडे, शंभु कदम, अनिल पालकर, सुनिल पालकर, संतोष फडतरे, ओम फडतरे, कांबळे, सुहास चवरे आदी उपस्थित होते.

# करमाळा तालुक्यातील विकासात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे भर

### ॲड. कमलाकर वीर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १२ डिसेंबर-**

संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात जवळपास २० कोटी रुपयांचा विकास निधी करमाळ्यात आला असून गेली २५ वर्षापासून प्रलंबित असलेला करमाळा एमआयडीसी चा प्रश्न मार्गी लागला आहे आता लवकरच नव तरुणांसाठी उद्योगासाठी एमआयडीसी प्लॉट उपलब्ध होतील, असा विश्वास ॲड. कमलाकर वीर यांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष निधीतून आधुनिक व्यायाम शाळेसाठी ४४ लाख रुपये मंजूर केला असून या इमारतीचे भूमिपूजन ॲड. वीर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे तालुकाप्रमुख अनिल पाटील तालुका उपप्रमुख डॉक्टर गौतम रोडे बाळासाहेब वाघ,शहर प्रमुख संजय शीलवंत, माजी तालुकाप्रमुख राहुल कानगुडे,युवा सेना उपजिल्हा प्रमुख चंद्रकांत राखुंडे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख नागेश शेंडगे, महिला आघाडी शहर प्रमुख कीर्ती स्वामी भाजप शहरप्रमुख जगदीश अग्रवाल ठेकेदार विश्वासराव काळे,सचिन गांधी, दिग्विजय देशमुख, भरत शेठ कांबळे प्रवीण गायकवाड, विकास डाळे, निलेश चव्हाण, बाबा तोरणे, जेऊर शाखाप्रमुख संजय जगताप उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. कमलाकर वीर म्हणाले की मंगेश चिवटे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. यांच्या माध्यमातून वैद्यकीय निधी मधून करमाळा तालुक्यातील अनेक रुग्णाला मदत झाली आहे.जेऊर बस स्थानक करमाळा बस स्थानक या दोन्ही बस स्थानकाला निधी मंजूर झाला आहे. विद्यार्थिनींसाठी धर्मवीर आनंद दिघे अभ्यासिका मंजूर झाली असून यातून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे या इमारतीसाठी ४५ लाख रुपये मंजूर झाले आहेत.



### एमआयडीसीसाठी पाणीपुरवठा योजना

मांगी रोडवरील शासकीय एमआयडीसीमध्ये उद्योजकांना तात्पुरता पाणीपुरवठा करण्यासाठी साडेचार कोटी रुपयांची योजना मंजूर झाली असून येत्या आठवड्यात याचे भूमिपूजन होणार असून पाच पाच गुंठे चे ९० प्लॉट उद्योजकांना वाटपाची प्रक्रिया सुरू करणार असल्याची माहिती यावेळी जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वळसंगच्या श्री बसवेश्वर मंदिरात दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १२ डिसेंबर-**
वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री बसवेश्वर मंदिरात कार्तिक मास समाप्तीनिमित्त संपूर्ण मंदिरात दीप लावण्यात आले. श्री चन्नबसवेश्वर देवस्थान ट्रस्ट, बसवेश्वर महिला मंडळ व इतरभक्त मंडळांच्या सहकार्याने दीपोत्सव कार्यक्रम पार पडला. व्हारती सिद्धयप्पा या देवाची पालखी व रेवती नक्षत्राबरोबरच वळसंग येथील श्री बसवेश्वर मंदिरात दीपोत्सव कार्यक्रम दरवर्षी संपन्न होतो.





## संक्षिप्त वृत्त...



### वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेत क्रीडा सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

**वळसंग, दि. १२ डिसेंबर-**
वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत क्रीडा सप्ताहास प्राचार्य वीरेश थळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व्हॉलिबॉल या सांघिक खेळाच्या उद्घाटनाने प्रारंभ झाला. मैदानाचे पूजन नूतन ग्रामपंचायत सदस्य विनोद सुरपुरे यांच्या हस्ते, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, माजी विद्यार्थी सागर वडगाव यांच्या उपस्थितीत करण्यात आले. तद्नंतर खेळाडूंची ओळख करून घेऊन प्रत्यक्षपणे व्हॉलिबॉल सामन्यास सुरूवात झाली. या क्रिडा सप्ताहात खो-खो, कब्बडी, क्रिकेट या सांघिक खेळांसह वैयक्तिक व मनोरंजन खेळांचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती क्रीडा शिक्षक संतोष कस्तुरे यांनी दिली. यासाठी क्रीडा शिक्षक बाळकृष्ण गुंड, संजयकुमार धनशेट्टी, सिद्धाराम भैरामडगी, नीलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, प्रा. संतोष शिंदे, प्रा. शरणय्या मसुती, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, अजय माणकोजी, शिवराज अष्टगी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, रुपाली कलशेट्टी, शकुंतला राठोड, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदींचे सहकार्य लाभणार आहे. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.




### 'सह्याद्री'च्या राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनींचा सत्कार

**सांगोला, दि. १२ डिसेंबर-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगडतर्फे राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धा-२०२४ चे आयोजन शरद इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, यड्राव इचलकरंजी येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत सांगोला तालुक्यातील मेथवडे येथील सह्याद्री फार्मसी कॉलेजच्या विभागीय अविष्कार स्पर्धेतील सिल्वर मेडल विजेती वैष्णवी चव्हाण व प्रेरणा पंचवाघ यांनी सहभाग घेऊन प्रकल्प सादरीकरण पोस्टरच्या माध्यमातून केले. त्याबद्दल त्यांचा सत्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केला. यावेळी पालक परमेश्वर चव्हाण यांनी या यशाबद्दल कौतुक करून अखंड परिश्रम, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, प्रखर बुद्धिमत्ता या जोरावर माझ्या मुलीने हे यश संपादन केले असून तंज्ञ व अनुभवी प्राध्यापक यांचे मार्गदर्शन व संशोधनासाठी महाविद्यालयाने पुरवलेली सेवा व सुविधा यांचे या यशात योगदान आहे असे मनोगत व्यक्त केले.

### केमसह आजूबाजूच्या गावात जिओ नेटवर्कची समस्या; ग्राहक हैराण

**करमाळा, दि. १२ डिसेंबर-**
करमाळा तालुक्यातील केम सह आजूबाजूच्या गावात जिओ नेटवर्कचा प्रॉब्लेम येत असून जिओचा वापर करणारे ग्राहक नेटवर्कच्या समस्येमुळे वैतागले आहेत.केम येथील जिओ सेंटर च्या ऑफिस मध्ये तक्रार नोंदविण्यासाठी तक्रारपुस्तिका देखील नसल्याने जिओ ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण पाहायला मिळत असून लवकरात लवकर जिओचे नेटवर्क सुरळीत करण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे.



### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील निकषात बदल नाहीत : मिरकले

**पिलीव, दि १२ डिसेंबर-**
महाराष्ट्रात अतिशय महत्वकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना याबाबत सध्या व्हिडिओ, रिल्स किंवा बातम्याद्वारे निकषांमध्ये बदल केला असल्याचे प्रसिद्ध होत आहे. पण या अफवा आहेत शासनाने यामधील कोणतेही निकष बदलेले नाहीत याबाबत अद्यापर्यंत कोणताही शासन निर्णय आला नसल्याचे सोलापूर जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले आहे. सध्या समाजात अशा प्रकारची चुकीची बातमी समाजात पसरवली जात आहे. शासनाकडून याबाबत अद्यापर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. यामुळे समाजात व लाभार्थी यांच्यामध्ये गैरसमज निर्माण केला जात आहे. यामुळे याबाबत अशा अफवांवर अजिबात विश्वास ठेवू नये असे आवाहनही त्यांनी लाभार्थी व नागरिकांना केले आहे.

## कृषी विद्यापीठांची निर्मिती शेतकरी हितासाठीच

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा यांचे सरपडोह येथे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१२ डिसेंबर-**
शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये उन्नती व्हावी यासाठीच महाराष्ट्रामध्ये कृषी विद्यापीठांची निर्मिती शासनाने केलेली असून विद्यापीठाच्या चार भिंतीमध्ये बंदिस्त असलेल्या ज्ञानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनानुसार करमाळा तालुक्यातील फार्मर कप स्पर्धेत सहभागी असणाऱ्या शेतकरी गटांनी केल्यामुळे करमाळा तालुक्यात यावर्षी निश्चितच तुरीचे उच्चांकी उत्पादन होईल त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात उन्नती येईल असा विश्वास मला वाटतो असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिश्रा यांनी केले.

सरपडोह (ता. करमाळा) येथे कृषी संशोधन केंद्र बदनापूर, आत्मा करमाळा व जिद्द शेतकरी गट, जिजाऊच्या लेकी शेतकरी गटाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पाणी फाउंडेशनचे सीईओ सत्यजित भटकळ, कृषी अधिकारी डी. एल. मोहिते, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, कृषी संशोधन केंद्र बदनापूरचे डॉ. दीपक पाटील, डॉ. किरण जाधव, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ज्ञानदेव मुटकुळे, डॉ. विष्णू गित्ते, डॉ. प्रशांत सोनटक्के, डॉ. नंदकुमार कुटे, डॉ. अनिल दुर्गुडे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिश्रा म्हणाले की पाणी फाउंडेशन केवळ सामाजिक बांधिलकीतून वॉटर कप, फार्मर कप या माध्यमातून काम करत आहेत. खरं तर विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे कामच पाणी फाउंडेशन पुढे घेऊन जात आहे. अतिशय आत्मीयतेने आणि तळमळीने हे काम केले जात असल्यामुळे पाणी फाउंडेशनची चळवळ ही लोकचळवळ झाली आहे त्यामुळेच एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी , महिला शेतकरी या कार्यक्रमाला उपस्थित आहेत त्याबद्दल मी समाधानी असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली.

प्रारंभी फिसरे व सरपडोह येथील तूर पिकांच्या प्लॉटची पाहणी कुलगुरू व शास्त्रज्ञांनी केली. प्रास्ताविक पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी केले. पाणी फाउंडेशनचे सीईओ सत्यजित भटकळ, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, कृषी अधिकारी डी. एल. मोहिते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी महेंद्र देशमुख, जयश्री कुलकर्णी, गणेश देवकर, हनुमंत रोकडे, अरूण चौगुले, हिराजी राऊत, डॉ. विकास वीर या शेतकऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन तालुका समन्वयक आशिष लाड यांनी केले तर आभार कृषी विभाग आत्माचे अजय कुमार बागल यांनी मानले. याप्रसंगी तालुक्यातील ३५ शेतकरी गटांचे ४०० सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.





#### फळ पिकांची शेती शाळा सुरू होणार : डॉ. भटकळ

करमाळा तालुक्यामध्ये फळ पिकाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावरती आहे. आंबा, पेरू या पिकांच्या शेती शाळा सुरू असून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार इतर फळ पिकांच्या शेती शाळा लवकरच सुरू होणार असून महाराष्ट्रातील शेतकरी गट आणि शेतकरी कंपन्या यांना आवश्यक ते ज्ञान देण्यासाठी पाणी फाउंडेशन ची टीम सदैव कार्यरत असेल अशी माहिती डॉ. भटकळ यांनी दिली.

#### एकत्रित तूर विक्रीसाठी प्रयत्नशील

तालुक्यातील शेतकरी गटांनी शास्त्रज्ञांनी सांगितलेल्या सर्व एसओपीचे पालन करून अतिशय उत्तम दर्जाची तुर उत्पादित केली असून ही तुर सर्व शेतकरी गट एकत्रितरीत्या विक्रीसाठी प्रयत्न करतील अशी माहिती तालुका समन्वयक आशिष लाड यांनी दिली.

## माढ्यातील आरोग्य शिबिराचा हजारो नागरिकांनी घेतला लाभ

### आ. अभिजीत पाटील मित्र परिवार, माढा शहर-तालुका राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ डिसेंबर-**
राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांच्या ८५ वा वाढदिवस माढा शहर व तालुक्यात विविध सामाजिक कार्यक्रमाने तसेच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. देशाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त माढा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन आमदार अभिजीत पाटील मित्र परिवार तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, माढा तालुका व शहर यांच्यावतीने करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

या शिबिरामध्ये १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर सर्व रोग निदान शिबिरात २५५ नागरिकांनी तसेच या संपूर्ण आरोग्य शिबिरामध्ये हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. या शिबिरामध्ये मोतीबिंदू ऑपरेशनसाठी ५४ नागरिकांचे ऑपरेशन मोफत केले जाणार असून यामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांना मोफत चष्मे वाटप, मोफत औषधे वाटप व तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ विलास बप्पा देशमुख, जिल्हा परिषद सदस्य भारतआबा शिंदे, ज्येष्ठ नेते दिलीपबापू देशमुख, धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, राजाभाऊ चवरे, आनंदअप्पा कानडे, शहाजीआण्णा साठे, नितीनबापू कापसे, युवा नेते सुरज देशमुख, अविनाश देशमुख, टेंभुर्णीचे सरपंच प्रमोद कुठे, महिला राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्षा सुवर्णाशिवपुरे, ड.रत्नप्रभा जगदाळे, डिव्हीपी बँकेचे चेअरमन भाऊसाहेब महाडिक, ऋषिकेश बोबडे, विठ्ठलवाडीचे सरपंच हनुमंत जाधव, वेताळवाडीचे उपसरपंच दयानंद जाधव, दत्ता पाटेकर, अच्युत उमाटे, ऋषीकाका तांबिले, आबासाहेब साठे, जितूभाऊ जमदाडे तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विलास मेमाणे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश खंडेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर लवटे, डॉ.अंजली शेळके, नेत्र तपासणीचे डॉ.अमोल बांगर, चव्हाण मॅडम, तसेच रक्त तपासणीसाठी अक्षय ब्लड बँकचे सहकारी उपस्थित होते.



#### दिल्लीत पवारांची घेतली भेट

माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी शरद पवार यांची दिल्ली येथे भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## सांगोल्यात कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र, क्षयरोग शोध मोहीम : डॉ. खांडेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ डिसेंबर-**
कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हा कार्यक्रम पंचायत समिती, सांगोला यांच्या वतीने दि.१६ ते २० डिसेंबर या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे. तसेच क्षयरोग शोध मोहीम १०० दिवस कार्यक्रम होणार आहे अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश खांडेकर यांनी दिली.

कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) यासाठी आश्रम शाळा, विद्यार्थी वस्तीगृह येथील विद्यार्थ्यांची कुष्ठरोग बाबत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच वीट भट्टी कामगार, खडी क्रेशर कामगार, बांधकाम मजुर, ऊसतोड कामगार, कारागृहातील कैदी, जोखमीच्या भागातील लोक यांची कुष्ठरोगाबाबत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. कुष्ठरोग तंत्रज्ञ रमेश अंधारे, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका यांचेकडून तपासणी करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमावर गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, डॉ.अविनाश खांडेकर, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत सुपरव्हिजन करणार आहेत. क्षयरोग शोध मोहीम १०० दिवस या कार्यक्रमासाठी सर्व संशयित रुग्णांचे डिजिटल एक्स-रे मोफत करण्यात येणार आहेत.

यासाठी ग्रामीण रुग्णालय, नजीकच्या शासकीय रुग्णालय किंवा गृहभेटीसाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यास माहिती देऊन संदर्भ चिठ्ठी घेऊन एक्स-रे काढून घेण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश खांडेकर यांनी केले आहे.

## 'मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास'ला उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ डिसेंबर-**
डॉ. प्रविण सुरेखा मच्छिंद्र मस्तुद लिखित मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारीतेचा इतिहास या ग्रंथास ज्ञानांकुर ग्रंथालयाच्या ३१ व्या वर्षी दिला जाणारा प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार सातारा जिल्ह्यात देण्यात आला. हा पुरस्कार डॉ. मस्तुद यांचे भाऊजी पाटबंधारे खात्याचे इंजिनियर लक्ष्मण नेताजी कवठे यांनी स्वीकारला.





मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारीतेचा इतिहास या ग्रंथास ज्ञानांकुर दि बुद्रुक (ता. पाटण, जि. सातारा) येथील ग्रंथालयाच्यावतीने दिला जाणारा कै. गोपाळ बंडू थोरात स्मृती उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्रथम क्रमांकाने दिला गेला. द्वितीय क्रमांक झापड कथासंग्रहास, अवघा रंग एक झाला या ललित लेखसंग्रहास तृतीय पुरस्कार देण्यात आला. यावेळी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या खजिनदार वर्षाताई ठोंबरे, प्राचार्य डॉ. मनोज गाडेकर, प्रा. तानाजी ठोंबरे, सुरेखा मस्तुद यांनी शुभेच्छा दिल्या.

## करमाळ्याच्या आश्लेषा बागडेची सीनियर नॅशनल स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१२ डिसेंबर-**
करमाळा येथील विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थीने दिनांक ६ डिसेंबर ते ८ डिसेंबर दरम्यान कर्नाटक येथील बेंगलोर येथे झालेल्या सीनियर नॅशनल चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा मधील महाविद्यालयातील बी. ए . भाग -२ मध्ये शिकत असलेली दंगल गर्ल आश्लेषा बागडेने ५७ किलो वजनगटामध्ये रौप्यपदक प्राप्त केले.



आपल्या नावाला साजेशी कामगिरी करत नॅशनल चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेमध्ये पहिल्या राऊंडमध्ये केरळच्या अमृतावर मोळी डावावर दहा झिरोच्या फरकाने विजयी सलामी दिली. दुसऱ्या राउंडमध्ये बिहारची अनुपमारीवरसुद्धा दहा झिरोने मात करून कॉटर फायनलमध्ये प्रवेश केला. कॉटर फायनलमध्ये सामना झाला तो दिल्लीच्या नेहा कुमारीबरोबर. नेहा कुमारीवर दहा झिरोच्या फरकाने मात करून सेमी फायनलमध्ये प्रवेश केला. सेमी फायनलमध्ये तिची लढत मध्य प्रदेशची कुमारी हंसाबेन सोबत झाली. या लढतीमध्ये चितपटीने विजय मिळवून फायनलमध्ये प्रवेश केला. फायनलमध्ये प्रवेश झाला, तो हरियाणाची इंटरनॅशनल कुस्तीपटू तपस्वीबरोबर.अखेरच्या अटीतटीच्या सामन्यांमध्ये आश्लेषाला अवघ्या दोन गुणांनी पराभव पत्करावा लागला. परतु तिने सिल्वर मेडल पटकवून महाराष्ट्राचे नाव उज्वल केले. तिला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले. या घवघवीत यशाबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रम सिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.

## तब्बल २५ वर्षांनी शालेय आठवणींना उजाळा

### बोरगाव दे. मध्ये भरला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ डिसेंबर-**
तालुक्यातील बोरगाव ( दे ) येथील विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकाच बाकावर बसलेले आणि भविष्याची वाटचाल करताना आपल्या आयुष्यामध्ये वेगवेगळ्या वाटेने गेलेले शालेय जीवनातील मित्र- मैत्रिणी माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल पंचवीस वर्षांनी एकत्र आले.

शालेय मैत्रीप्रति असलेली आदरयुक्त प्रेम जिव्हाळा आणि माणुसकी अद्यापही चेहऱ्यावर कायम ठेवत उत्साह, आनंद आणि कौतुकाची भावना मनात ठेवत रविवार दि ८ रोजी पुणे येथील हॉटेल सात्विक व्हॅली रिसॉर्ट मध्ये मैत्रीचा रौप्य महोत्सव रंगला. पंचवीस वर्षांनी एकमेकांना भेटणाऱ्या मैत्रिणींच्या चेहऱ्यावर उत्सुकता, आनंद, मस्ती अशा संमिश्र भावना होत्या. शाळेतील मस्ती,एकत्रितपणे केलेल्या अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक,शाळेतील क्रीडा स्पर्धा,शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयावर माजी विद्यार्थिनी गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला.या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांनी आपला परिचय दिल्यावर त्या वेळच्या काही गमतीदार आणि काही चांगल्या आठवणींना उजाळा दिला. अनेक विद्यार्थी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले होते. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असताना जीवनात यश मिळवले असले तरी त्यामागे शाळेचे संस्कार आहेत अशी भावना अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या स्नेहमेळाव्यात एस. पी. म्युझिक पुणेतर्फे अब्दुल मकानदार यांचा नवीन आणि जुन्या गीतांचा संगीत गायन कार्यक्रम सादर झाला. या मेळाव्यात ३५ विद्यार्थी सहभागी होत एकत्रित स्नेहभोजन व विविध गुणदर्शन कला सादर केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.



CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## खिदमते खल्क सामाजिक संस्थेने कॅन्सरग्रस्तास दिला मदतीचा हात



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१२ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ व परिसरातील अनेक गावातील युवकांनी एकत्र येत खिदमते खल्क या सामाजिक संस्थेची स्थापना करून समाजातील निराधार, गोरगरीब, विविध आजारांनी त्रस्त तसेच विवाह खर्च करू न शकणाऱ्या पालकांना या संस्थेच्या माध्यमातून हातभार लावण्याचा छोटयाशा प्रयत्न या संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने सराटी (ता. तुळजापूर) येथील कॅन्सरग्रस्त राजू शेख या २७ वर्षीय युवकास संस्थेच्या माध्यमातून रोख रक्कम व फोन पे करून मदतीचा हात दिला आहे. त्याच्या उपचारासाठी सोलापूर कॅन्सर हॉस्पिटल येथे जाऊन संस्थेच्या पदाधिकारी यांनी मदत केल्यावर कुटुंबातील सदस्य गहिवरून आल्याचे या पदाधिकारी यांनी सांगितले.

यावेळी नसीर पटेल, इमाम सय्यद, अलीम शेख, महेबूब फकीर, हसन शेख यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या अभिनव उपक्रम ाबद्दल व सामाजिक संकल्पना राबवल्याबद्दल अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# अतिवृष्टीच्या नुकसनीपोटी जिल्ह्याला २२१ कोटी मंजूर

### ३३ मंडळातील १ लाख ८० हजार शेतकऱ्यांना दिलासा...

### वगळलेल्या मंडळासाठी पाठपुरावा करणार : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ म हसूल मंडळात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली होती. ज्याठिकाणी अतिवृष्टीची नोंद नाही तेथेही नदी-नाले आणि ओढ्यांना आलेल्या पुरामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी जिल्ह्यातील १ लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांना राज्यसरकारने २२१ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. निवडणूक कालावधीत आचारसंहिता असताना निवडणूक आयोगाच्या अनुमतीने शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्यात यावी यासाठी ना. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या माध्यमातून केलेल्या पाठपुराव्याला आता यश आले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

सततचा पाऊस आणि अतिवृष्टीसाठी राज्य आणि केंद्राच्या आपत्ती निवारण निधीचे निकष ठरलेले आहेत. मात्र अतिवृष्टी आणि सततचा पाऊस नसतानाही, ज्या ठिकाणी पूरपरिस्थितीमुळे म ोठे नुकसान झाले आहे, तिथे तलाठ्यांमार्फत नुकसानीचे पंचनामे करून तसा स्वयंस्पष्ट अहवाल घेण्याच्या सूचना तहसीलदार तथा कृषी अधिकार्यांना आपण दिल्या होत्या. पाडोळी शिवारात साधारणपणे दोन हजार ५०० हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी नदीकाठी पुराम ुळे ३५० हेक्टरहून अधिक क्षेत्राचे मोठे नुकसान झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. अतिवृष्टीमुळे जिथे नुकसान झाले त्या नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना ज्या पद्धतीने मदत केली जाते अगदी त्याप्रमाणेच पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनाही राज्य आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीची मदत मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या एक लाख ६३ हजार ९७ हेक्टर क्षेत्रावरील १ लाख ८० हजार ७८६ शेतकरी बांधवांच्या नुकसनीपोटी २२१ कोटी ८१ लाख ३० हजार रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात आचारसंहिता असतानाही निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करायला हवी यासाठी आपण मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिवांकडे त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता त्याला आता यश आले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

#### वगळलेल्या महसूल मंडळासाठी पाठपुरावा करणार

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे नुकसान झाले असल्याचे अहवालात स्पष्टपणे



नमूद असल्याची बाब आपण स्वतः प्रधान सचिव मदत व पुनर्वसन यांना १८ ऑक्टोबर रोजी पत्र लिहून निदर्शनास आणून दिली होती. जिल्ह्यातील अन्य महसूल मंडळातील वस्तुस्थितीही त्याचवेळी त्यांच्या ध्यानात आणून दिली. धाराशिव, भूम, परंडा आणि तुळजापूर तालुक्यातील २४ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद नाही. मात्र झालेले नुकसान मोठे आहे. अनेक ठिकाणी सदोष पर्जन्यमापकांमुळे अतिवृष्टी असतानाही ती नोंदविली गेलेली नाही. त्यामुळे २०२२ साली ओढवलेल्या आपत्तीवेळी नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल ज्याप्रमाणे शासनाकडे सादर करण्यात आला होता, अगदी तीच प्रक्रिया अनुसरून नुकसानीची व्याप्ती लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार उर्वरित २४ महसूल मंडळात दोन वर्षापूर्वी ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ नुकसानीच्या निकषानुसार केलेल्या पाहणीचा अहवाल ग्राह्य धरावा व त्यांनाही तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी पत्राद्वारे केली होती.

## नळदुर्ग बसस्थानकातील सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम बंद; प्रवाशांची गैरसोय



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील बसस्थानकात सुरु असलेले सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम गेल्या कांही दिवसांपासुन बंदच आहे. त्यामुळे हे काम कधी पुर्ण होणार याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. हे काम का बंद आहे याची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करुन हे काम लवकर पुर्ण करुन घेणे गरजेचे आहे.

नळदुर्ग बसस्थानकातील कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ नवरात्रापुर्वी करण्यात आला होता. त्यामुळे हे काम आतापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित होते मात्र आज या कामाची प्रगती शुन्य आहे. काम बंद असल्यामुळे प्रवाशांना धुळीचा त्रास होत आहे. तसेच हे काम कधी पुर्ण होणार असा प्रश्न सध्या प्रवशांमधुन उपस्थित केला जात आहे. नवरात्रापुर्वी या कामाचा शुभारंभ झालेला असतांना आज हे काम दहा टक्के देखील झालेले नाही. संबंधित ठेकेदार हे काम करण्यासाठी का टाळाटाळ करीत आहे हे समजत नाही. सध्या बसस्थानकाच्या अर्ध्या भागात बसचे येणे जाणे सुरु आहे. त्यामुळे प्रवाशांना याचा कमालीचा त्रास होत आहे. नळदुर्ग बसस्थानकात वारंवार मागणी केल्यानंतर सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम मंजुर झाले आहे. हे काम महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. मात्र हे काम ज्या ठेकेदाराने घेतले आहे तो ठेकेदार हे काम अतिशय संथगतीने करीत आहे. वास्तविक पाहता हे काम ज्यावेळेस सुरु झाले तेंव्हापासुन आतापर्यंत हे काम पुर्ण झाले असते मात्र अजुन हे काम बेडपर्यंतच झाले आहे. हे काम सध्या बसस्थानकच्या अर्ध्या भागातच करण्यात येत आहे. हे बसस्थानक राष्ट्रीय महामार्गवार असल्याने या बसस्थानकात नेहमीच प्रवाशी व बसगाड्यांची मोठी गर्दी असते. त्यातुन सध्या बसस्थानकच्या अर्ध्या भागातच बस थांबत असल्याने प्रवाशांची मोठी तारांबळ होत आहे. दि.१२ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत नळदुर्ग (मैलारपुर) येथे श्री खंडोबा देवाची मोठी यात्रा भरते. यावेळी या यात्रेत महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यातील जवळपास ५ ते ६ लाख भाविक येतात. यावेळी नळदुर्ग बसस्थानकातुन यात्रेच्या ठिकाणी जाण्यासाठी मोठया प्रमाणात बसगाड्या सोडल्या जातात. त्यामुळे यात्रेकरुंच्या सुरक्षेसाठी अशावेळी पुर्ण बसस्थानक सुरु असणे गरजेचे आहे कारण बसस्थानकात यावेळी यात्रेकरूंची संख्या मोठी असते. त्यामुळे यात्रा सुरळीत पार पडण्यासाठी यात्रेपुर्वी बसस्थाकातील कॉंक्रिटीकरणाचे काम पुर्ण होणे गरजेचे आहे.

सध्या संथगतीने सुरु असलेल्या कामाची गती वाढवुन खंडोबा यात्रेपुर्वी हे काम पुर्ण पुर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदाराला द्यावे अशी मागणी होत आहे.

## संविधान शिल्पाची विटंबना परभणी येथील घटनेचे परंडा येथे पडसाद



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ डिसेंबर -**

परभणी येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासम ोरील संविधान शिल्पाची निर्लज्ज, जातिवादी नराधमाने नासधुस करून विटंबना केली आहे. त्याच्या निषेधार्थ परंडा येथे दि.१२ डिसेंबर गुरुवार रोजी तीव्र पडसाद उमटले असून आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनानी रस्त्यावर उतरून निदर्शने करीत आरोपीवर कडक कारवाई करण्याच्या म ागणीचे निवेदन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यात जातीय सलोखा बिघडवण्याचे काम जातीयवादी प्रवृत्तीने केलेले आहे.

या घटनेमुळे समस्त आंबेडकरी सम ाज व संविधान प्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

असे कृते करणाऱ्या नराधमावर कठोर गुन्हा दाखल करून सदरील खटला जलद गती न्यायालयात चालवुन आरोपीस खडक शासन करण्यात यावे, नसता आंबेडकरी समाजाच्या व संविधान प्रेमींच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशाराच सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, समता परिषद जिल्हाध्यक्ष बिभिषन खुणे, झोपडपट्टी सुरक्षा दल जिल्हाध्यक्ष राजेभाऊ शिंदे, चर्मकार म हासंघ जिल्हा उपाध्यक्ष कानिफनाथ सरपने, दिव्यांग संघटना जिल्हा उपाध्यक्ष घनश्याम शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक अध्यक्ष खय्युम तुटके, चर्मकार महासंघ शहराध्यक्ष उमेश सोनवणे यांनी याप्रसंगी प्रशासनास दिला आहे.

## शहराला सुरत-चेन्नई महामार्गास जोडणाऱ्या स्पर मार्गास लवकरच मंजूर : खा. ओम राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

धाराशिव जिल्हयातून जाणारा केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी प्रकल्पापैकी एक असलेला सुरत-चेन्नई ग्रीन कॉरीडॉर हा महत्वाचा महामार्ग आहे. सदर महामार्ग सुरत-चेन्नई असा असून हा महामार्ग धाराशिव जिल्हयातून जात असून धाराशिव शहरापासून साधारणत: ३५ किमी अंतरावर वैराग (ता. बार्शी जि. सोलापूर) येथे या महामार्गास केनक्टीवीटी देणेबाबत अनेक दिवसापासून खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी पाठपुरावा व पत्र व्यवहारव्दारे नितीन गडकरी यांच्याकडे स्पर रोड कनेक्टीवीटीची मागणी केली होती.



धाराशिव लोकसभा मतदार संघातील वैराग ही मोठी बाजारपेठ असून या स्पर कनेक्टीवीटीमुळे धाराशिव शहर या महामार्गाशी जोडले जाणार आहे. आज लोकसभेच्या प्रश्न उत्तराच्या तासामध्ये प्रश्न क्रमांक २४५ नुसार जिल्हयातील विविध महामार्गाच्या अनुषंगाने खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी रस्ते व वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांना प्रश्न विचारुन धाराशिव जिल्हयातून जाणारा सुरत -चेन्नई महामार्गास स्पर रोड कनेक्टीवीटी मंजुर करु असे म्हटले आहे.

लोकसभेमध्ये खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देताना लोकसभेमध्ये माहिती दिली.

## कळंबमध्ये सकल हिंदू समाजाची रॅली

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१२ डिसेंबर -**

बांगलादेशात झालेल्या सत्तांतरानंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला आहे. यामध्ये हिंदू समाजाला लक्ष केले जात असून हिंदूधर्मीय नागरिकावर अमानुष अत्याचार केले जात आहे. हे अत्याचार तात्काळ थांबवावे यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष घालावे त्यांच्या स्तरावरून घेतलेल्या बांगलादेशी नागरिकाच्या बाबतीत प्रत्येक निर्णयात हिंदू समाज आपल्या सोबत आहे असे निवेदन कळंब तालुका सकल हिंदू समाजाच्या वतीने कळंब उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.

निवेदनावर, प्रकाश भडंगे, मकरंद पाटील, अनिल यादव, सतपाल बनसोडे, विश्वभर पाटील, शितल चोंदे, दिलीप लोढा, विष्णू बारगुले, चत्रभुज भांडे, संदीप कोकाटे, शंभु कोकीळ, परशुराम देशमाने, शिवराज पाटील धनेगावकर, अजित गुरव, किरण फल्ले, अशोक क्षीरसागर, नाना शिंगणापूरे, सचिन क्षिरसागर यांच्या सह्या आहेत.

## शिराढोण येथे कडेकोट बंद : सरपंच हत्याचा व संविधान विटंबनेचा तीव्र निषेध



**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१२ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे सोमवारी कडेकोट बंद पाळण्यात आला.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे सरपंच देशमुख यांचे अपहरण करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर आणि परभणी येथे झालेल्या संविधान विटंबनेच्या निषेधार्थ शिराढोण ग्रामस्थांनी गावबंद आंदोलन केले.

गावातील व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपली दुकाने बंद ठेवत या आंदोलनाला पाठिंबा दिला.

नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध करत शिराढोण पोलीस ठाण्यात निवेदन सादर केले. या निवेदनात दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच

या आंदोलनात शिराढोण गावातील युवक, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

### संक्षिप्त वृत्त...



#### लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त परंड्यात अभिवादन

**शिराढोण, दि.१२ डिसेंबर -**

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी संपर्क कार्यालय, परंडा येथे मुंडे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, प्र. कार्यकारिणी सदस्य ॲड. झहीर चौधरी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. भालचंद्र औसरे, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस ॲड. तानाजी वाघमारे, अविनाश विधाते, धनाजी गायकवाड, परसराम कोळी, शिवाजी पाटील, साहेबराव पाडुळे, ॲड. जाम दारे, अजित काकडे, जयंत सायकर, किरण कवटे, धनंजय काळे, मनोहर पवार, सुरज काळे, गौरव पाटील, आकाश मदने, जयंत भातलवंडे, शहराध्यक्षा महिला मोर्चा ज्योती भातलवंडे, शुभदा शेलार तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



#### जयप्रकाश विद्यालयात हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन साजरा

**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्य विद्यालय, रुईभर यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा बाबू गेनू यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यकमाचे अध्यक्ष माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे यांच्या हस्ते हुतात्मा बाबू गेनू यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफल अर्पण करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे मार्गदर्शन करताना म्हणाले की आपल्या देशासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली ते महान आहेतच. मात्र आजच्या युवा पिढी पुढे असणारी आव्हाने आहेत. ती पूर्ण करण्यासाठी युवा पिढीने खचून न जाता नव्या उम्मेदीने स्वीकारून समाजातील चांगल्या कार्यात सहभागी व्हावे. हुतात्मा बाबू गेनू यांच्यातील देशभक्ती पाहून आजच्या युवा पिढीने स्पर्धेच्या युगातील आव्हाने स्वीकारून आव्हाने पूर्ण करण्याची ताकद स्वतःमध्ये निर्माण करावी, अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य शिवकन्या साळुंके, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित घोळवे यांनी तर आभार प्रा. सुधीर नाईकवाडी यांनी मानले.



#### सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचारी यांचा गेट-टु गेदर कार्यक्रम

**जळकोट, दि.१२ डिसेंबर -**

धाराशिव येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी महासंघ या संघटनेचा गेट-टुगेदर कार्यक्रम जिल्ह्याचे अध्यक्ष प्रदीप मोकाशे यांच्या अध्यक्षतेखाली व विभागीय संपर्कप्रमुख मनोहर वाघम ोडे, कवठे, राज्य संघटक शिवाजी सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी सूत्रसंचलन जिल्हा कार्याध्यक्ष अशोकराव साखरे यांनी केले. या चर्चासत्राम ध्ये नागनाथ जळकोटे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्रामप्पा तडकले, यशवंत मोकाशी, राजेंद्र तांबे, शिवपुत्र कबाडे, वाय. के. चव्हाण, भास्कर बेशकराव, सगरे तसेच महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अधिकारी महासंघ संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अशोक जाधव व इतर सेवानिवृत्तांनी आपले जीवनातील मनोगत व्यक्त केले. शेवटी सर्वांचे आभार सिद्रामप्पा तडकले यांनी मानले.

## तेरणा अभियांत्रिकीचे प्रा.डॉ. प्रशांत जैन 'एनपीटीईएल'च्या परीक्षेत 'टॉपर'

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी म हाविद्यालयात कोरोणाच्या ताळेबंदीपासून मागील पाच वर्षापासून प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन सर्टिफिकेशन मिळवण्याची परंपरा कायम ठेवत आयआयटी रुरकी द्वारे घेण्यात आलेल्या एनपीटीईएलच्या 'मेकॅनिकल व्हायब्रेशन' या यंत्र अभियांत्रिकीच्या सर्वांत कठीण मानल्या जाणाऱ्या विषयाच्या परीक्षेत तेरणा अभियांत्रिकी म हाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रशांत जैन यांनी 'टॉपर' हा बहुमान मिळवून 'सुवर्णपदका' सह प्रमाणपत्रही




प्राप्त केले आहे. त्यांनी या परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवले आहेत.

विशेष म्हणजे, डॉ. प्रशांत जैन यांनी मागील सेमिस्टरमध्ये एनपीटीईएलच्या मशिनरी फॉल्ट डायग्नोसिस आणि सिग्नल प्रोसेसिंग या विषयाच्या कोर्समध्ये 'टॉपर' आणि 'रौप्य पदक' प्रमाणपत्र मिळविले होते. अशाप्रकारे एनपीटीईएलच्या सलग दोन परीक्षेत 'टॉपर' येण्याचा बहुमान डॉ. प्रशांत जैन यांना मिळाला आहे.

डॉ. जैन यांच्या या यशाबद्दल तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विश्वस्त बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बोलताना डॉ. जैन म्हणाले की एनपीटीईएल हा सात आयआयटी यांच्यातील एक सहयोगी प्रकल्प आहे जे विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी विषयांमध्ये ऑनलाइन अभ्यासक्रम प्रदान करतात. तरी सर्व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा आणि किमान एनपीटीएलचा एक तरी कोर्स करावा, असे आव्हानही त्यांनी याप्रसंगी केले.

एनपीटीएलच्या सलग दोन कोर्सेसमध्ये 'टॉपर' बनून डॉ. जैन यांनी सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्या पुढे एक आदर्श निर्माण केला आहे व आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षामध्ये शंभरहून अधिक एनपीटीएल सर्टिफिकेशन पूर्ण केले आहेत. त्यामुळे नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड होण्यासाठी निश्चितच फायदा होईल असे मत कॉलेजचे प्राचार्य डॉ.व्ही.व्ही. माने यांनी व्यक्त केले.

डॉ. प्रशांत जैन यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. पद्मसिंह पाटील, आ. राणाजगजितसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, विश्वस्त मेघ पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे, प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. माने, डॉ.डी.डी. दाते आणि डॉ.एस.एन. होळंबे यांनी अभिनंदन केले.

### दलित वस्ती सुधार योजनेचा निधी ७३ पैकी ४४ ग्रामपंचायतीला वाटप...

## २९ ग्रामपंचायती निधीतून का? नाही : सरपंच प्रज्ञा काळे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ डिसेंबर -**

परंडा तालुक्यात ७३ ग्रामपंचायती असून शासनाने यातील फक्त ४४ ग्रामपंचायतीला दलित वस्ती सुधार योजनेचा निधी मंजूर करून वाटप केला आहे. तर उर्वरित २९ ग्रामपंचायतीला निधी वाटप का करण्यात आला नाही. तो त्वरित वाटप करण्यात यावा अन्यथा दि.२० डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा पिंपरी गावच्या सरपंच प्रज्ञा बप्पाजी काळे यांनी पंचायत समिती स्तरावरून जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २०२४-२०२५ साठी सुधारित आराखड्यानुसार ढगपिंपरी गावात दलित वस्ती सुधार योजनेचा निधी देण्यात आलेला नाही. परंडा तालुक्यात एकूण ७३ ग्रामपंचायती असून त्यापैकी फक्त ४४ ग्राम पंचायतीलाच निधी देण्यात आलेला आहे. ज्या ग्रामपंचायतीवर मोठ्या राजकीय पुढाऱ्यांची वर्चस्व आहे त्याच ग्रामपंचायतला राजकीय हस्तक्षेपातून निधी दिला आहे.

मात्र ज्या ग्रामपंचायतीवर सरपंच हे विशिष्ट पक्षाचे आहेत त्यांना निधीपासून अलिप्त ठेवले आहे. समाज कल्याण मार्फत मिळणारा निधी तालुक्यातील पंचायत समिती संख्यानुसार समान प्रमाणात निधी वाटप होणे गरजेचे असताना उर्वरित २९ ग्रामपंचायतींना का डावले आहे.

येत्या सात दिवसात निधी दिला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा सरपंच सौ काळे यांनी दिला आहे.

## अतिवृष्टीच्या अनुदानापोटी २२१ कोटी ८१ लाख रुपये निधी वितरणास मान्यता....

# शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला : अनिल जगताप



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांना २०२४ मधील अतिवृष्टीच्या अनुदानापोटी २२१ कोटी ८१ लाख रुपये निधी वितरणास मान्यता दिल्याने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची माहिती.

गेल्या वर्षी धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी, पूर परिस्थिती झाल्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती शासकीय नियमाला अनुसरून जिल्हा प्रशासनाने ८ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाला जिल्ह्यातील नुकसानीचा प्रस्ताव पाठवला होता.

त्यानुसार धाराशिव जिल्ह्यातील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांना त्यांच्या एकूण बाधित एक लाख ६३ हजार ९७ हेक्टर क्षेत्रासाठी २२१ कोटी ८१ लाख रुपयांची मागणी केली होती.

राज्य शासनाने दहा डिसेंबर रोजी त्याला मान्यता दिली आहे त्यामुळे अतिवृष्टी अनुदान मिळण्याचा धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अतिवृष्टीचा अनुदान मागणी प्रस्ताव थोडासा उशिराने गेल्याने रखडला होता. त्यातच विधानसभेची आचारसंहिता लागल्याने त्याला बराच उशीर होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते.

सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी या संदर्भात मुख्य सचिवांना पत्र देऊन तातडीने दिली वितरित करावी अशी मागणी केली होती त्यानुसार हा निधी आता मंजूर झाला आहे. उमरगा-लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना पुढील आठवड्यात मिळेल अतिवृष्टी अनुदान. जिल्हा प्रशासनाने ८ ऑक्टोबर रोजी पहिला प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला होता त्यात धाराशिव, कळंब, वाशी, परंडा या चारच तालुक्याचा समावेश होता.

सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे आग्रह धरून वस्तुस्थिती विशद केल्यानंतर तालुका कृषी व महसूल विभागाकडून तातडीने प्रस्ताव मागवण्यात आला होता. त्यानुसार लोहारा-उमरगा तालुक्यातील ७९ हजार ८८० शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये निधी मागणीचा प्रस्ताव १५ ऑक्टोबर रोजी शासनाकडे पाठवलेला आहे.

मुख्य सचिव आणि त्याला मान्यता देऊन राज्य मंत्रिमंडळाच्या परवानगीसाठी ठेवला आहे. त्यावर निर्णय होऊन पुढील आठवड्यात निधी वितरित होईल, अशी माहिती आणि जगताप यांनी दिली.

केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीबीटीद्वारे थेट मंत्रालयातून शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग होणार आहेत.

जिरायत क्षेत्रासाठी तेरा हजार ६०० रुपये प्रति हेक्टर प्रमाणे तीन हेक्टरच्या मर्यादित पैसे मिळणार आहेत.

### मंजूर झालेले तालुका निहाय मिळणारी अनुदान, मदत...

धाराशिव तालुक्यातील ६५ हजार ६३३ शेतकऱ्यांना ९८ कोटी ४७ लाख रुपये मिळणार आहेत. तर कळंब तालुक्यातील ६५३३१ शेतकऱ्यांना ७३ कोटी ४५ लाख रुपये मिळणार आहेत. तर परंडा तालुक्यातील १४,३९५ शेतकऱ्यांना ९ कोटी ४४ लाख रुपये मिळणार आहे. तसेच वाशी तालुक्यातील ३५ हजार ५७ शेतकऱ्यांना त्यांच्या पीक नुकसानी पोटी ४० कोटी तीन लाख रुपये मिळणार आहेत व लोहारा तालुक्यातील ३७० शेतकऱ्यांना चाळीस लाख ५२ हजार आठशे रुपये मिळणार आहेत.

### लोहारा-उमरग्यातील शेतकऱ्यांनी काळजी करू नये...



दहा डिसेंबर २४ रोजी महसूल वन विभागाने शासन निर्णय काढून धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदानासाठी २२१ कोटी ८१ लाख रुपये मंजूर केले आहेत. लोहारा-उमरगा तालुक्याचा प्रस्ताव उशिराने १५ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाकडे गेल्याने त्यावरही पुढील आठवड्यात निर्णय होऊन दोन तालुक्यातील शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये शेतकऱ्यांना पैसे मिळतील कोणीही काळजी करू नये त्यासाठी आपण ताकतीने प्रयत्न करीत आहोत.

**- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते.

# कसबे तडवळे येथील जि.प. शाळांना शिक्षण संचालकांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१२ डिसेंबर -**

येथील जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा व आदर्श कन्या प्राथमिक शाळा यांना डॉ. महेश पालकर शिक्षण संचालक योजना शिक्षण संचनालय पुणे, डॉ. गणपत मोरे शिक्षण उपसंचालक लातूर विभाग यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, उपशिक्षणाधिकारी योजना गजानन वाघमारे यांच्या समवेत भेट दिली. सर्वप्रथम शिष्यवृत्तीच्या जादा तासाला भेट देऊन शिष्यवृत्ती व नवोदय निकालाचा आढावा घेतला.

मागील वर्षातील शिष्यवृत्तीला बसलेले विद्यार्थी तसेच दोन्ही शाळेतून धारक झालेले विद्यार्थी यांची माहिती घेतली. त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर स्मारकास भेट दिली. कसबे तडवळे शाळातील वर्षभर चालणाऱ्या स्पर्धा परीक्षा वर्गाची माहिती घेतली.

तसेच विविध स्पर्धा परीक्षा, आठवी शिष्यवृत्ती एन.एम.एम.एस. याचाही आढावा घेतला. मागील वर्षातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त होते का या संदर्भात चर्चा करण्यात आली.प्रथमतः मान्यवरांना घर घर संविधान अंतर्गत संविधान प्रत भेट देण्यात आली. कसबे तडवळे येथील ३६५ दिवस चालणाऱ्या शाळा, बालवाचनालय, विद्यार्थी बचत बँक, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा,लोकवर्गणीतून शाळा समृद्धी, वैशिष्ट्यपूर्ण संविधान दिन साजरा करणे या उपक्रमांची माहिती जेष्ठ शिक्षक श्री जगन्नाथ धायगुडे यांनी सांगितली. उपस्थित दोन्ही शाळा, जयहिंद विद्यालय, मातृभूमी आश्रम शाळा, जि.प. प्राथमीक शाळा गोपाळवाडी इत्यादी शाळांचा उल्हास प अंतर्गत नवसाक्षर आढावा घेऊन ऑनलाईन नोंदणी केल्याबाबत माहिती घेतली. नवसाक्षर वर्ग याबाबत आढावा घेतला. मुख्याध्यापक केशव पवार, कन्या शाळा मुख्याध्यापक रहिमान सय्यद, प्राचार्य आर.डी. गाढवे यांनी तडवळे शाळेतील विविध उपक्रमांची माहिती पुस्तिका दाखवली.

नवोदय शिष्यवृत्ती यशाची परंपरा राखणाऱ्या शाळा म्हणून यावेळी डॉ. महेश पालकर, डॉ. गणपत मोरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, शिक्षण निरीक्षक धनंजय सराफ यांच्या हस्ते विस्तार अधिकारी किशोरी जोशी, केंद्रप्रमुख जगदीश जाकते, श्याम खुणे, मुख्याध्यापक केशव पवार, मुख्याध्यापक रहिमान सय्यद, जगन्नाथ धायगुडे बाळासाहेब जमाले, शहाजीपुरी मोहम्मद नदाफ, शामसुंदर गोरे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

## बससेवा सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

धाराशिवहून बार्शीकडे ये-जा करण्यासाठी सुरू असणारी बस अंबेजवळगे सह भानसगाव कारीमार्गे सोडण्यात यावी, अशी मागणी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष राजसिंहराजे निंबाळकर व नानासाहेब पाटील यांच्यामार्फत विभाग नियंत्रक धाराशिव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

बार्शी-धाराशिव ही बस सेवा अंबेजवळगे, कुंजेवाडी, मनोज जरांगे पाटील चौक, भानसगाव, कारी मार्ग बार्शीला जावी याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी श्रीराम सीताराम दुधे, आप्पासाहेब बाळासाहेब तवले, विशाल लक्ष्मण मचाले गावकरी उपस्थित होते.

# खंडोबा यात्रेनिमित्त दहिफळात रंगला सोंगे अन् कुस्त्यांच्या फड



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ डिसेंबर -**

तालुक्यातील दहिफळ येथील ग्रामदैवत श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान यात्रा मोठ्या उत्साहात साजरा झाली. यंदा यात्रेनिमित्त भव्य सोंगे, कुस्त्यांचे आयोजन केले होते. यात्रेच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी कार्यक्रम पार पडले. दि.९ डिसेंबर रोजी जि.प. प्राथमिक शाळेच्या मैदानात जग्गी कुस्त्यांचा सामना रंगला होता.

येडशी, धाराशिव, सापनाई, तेर, लोहारा, बार्शी, दहिफळ येथील मल्लांनी सहभाग घेतला. जवळपास चार तास कुस्त्यांचा फड रंगला होता. अतितटीची लढत झाली. चार तास कुस्त्यांचा फड रंगला. यात लहान वयोगटातील तसेच मोठ्या गटातील मल्लांनी सहभाग घेऊन मैदान गाजवले. शेवटची निकाली कुस्ती साडे सात हजार रुपयाची होती. लोहारा तालुक्यातील महेश गायकवाड तर दहिफळ येथील स्वराज मते यांच्यात सामना झाला.अवघ्या तीन मिनिटांत महेश गायकवाड याला अस्मान दाखवले. स्वराज मते हतालाई संघात घडलेला पैलवान असून त्याने खंडोबा यात्रेत मैदानात उतरून निकाली कुस्ती जिंकली.

दहिफळ येथील हा पैलवान असून पहिल्यांदाच दहिफळच्या मल्लाने निकाली कुस्ती जिंकून गावाची शान वाढवली. वाजत गाजत स्वराज मते याची गावातून मिरवणूक काढण्यात आली. खंडोबा मंदिरात मानाचा फेटा बांधून मानधन सरपंच चरणेश्वर पाटील, चेअरमन मधुकर भुसारी यांच्या हस्ते देण्यात आले.

यात्रा कमिटी अध्यक्ष चरणेश्वर पाटील, समाधान मते, बालाजी मते, प्रदिप भातलवंडे, सुधीर मते, शिवशंकर भातलवंडे, रामेश्वर भातलवंडे, अभिनंदन मते सर्व पदाधिकारी कमीटीने योग्य नियोजन केल्यामुळे यात्रा शांततेत पार पडली.

## मानवाधिकार दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा भेट



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ डिसेंबर -**

दहा डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिन या दिनानिमित्त श्रमिक मानवाधिकार संघटनेचया वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची प्रतिमा भेट देण्यात आली.

१० डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त उपविभागीय अधिकारी कार्यालय कळंब येथे लोकहित सामाजिक विकास संस्था व श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी संजय पाटील व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी चकोर, कळंब ते तहसीलदार ढोकले, पोलीस उपाधीक्षक संजय पवार, पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक उंडगे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा बालाजी अडसूळ यांच्या हस्ते देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी श्रमिक मानवाधिकार संघाच्या अध्यक्षा माया शिंदे व सचिव बजरंग ताटे उपस्थित होते.

यावेळी कळंब व वाशी तालुक्यातील दलितावर होणारे अन्याय दलितांच्या स्मशानभूमीची प्रस्ताव गरोदर महिलांचे प्रश्न ऊसतोड कामगारांचे प्रश्न इत्यादी प्रश्नावर उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांच्याशी संघटनेचे अध्यक्ष बजरंग ताटे यांनी चर्चा करून निवेदन ही देण्यात आले.

## निघालो घेऊन दत्ताची पालखी, आम्ही भाग्यवान आनंद उधाण...

# तानसम्राट कडकडे यांच्या भजनसंध्या कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ डिसेंबर -**

'निघालो घेऊन दत्ताची पालखी
आम्ही भाग्यवान आनंद उधाण
झुलते हळूच दत्ताची पालखी'...

यासह एकापेक्षा एक सरस भक्तीगीत, गवळण व भैरवी सादर प्रसिद्ध गायक, तानसम्राट अजित कडकडे यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

धाराशिव येथील शांतिनिकेतन -सद्गुरू कॉलनी येथे श्रीमंतराव रणदिवे प्रतिष्ठानच वतीने त्रैलोक्याचे स्वामी भगवान, परम श्रद्धेय श्री गुरुदेव दत्तात्रेय महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित गुरूचरित्र पारायण, भजन, कीर्तन सप्ताह सोहळ्यात बुधवारी (दि.११) तानसम्राट श्री कडकडे यांचा भजनसंध्या कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

यावेळी तानसम्राट कडकडे यांनी जय दत्त दत्त अखंड गाती भक्त.., नाथा घरी नाचे माझा सखा पाडुरंगा.., गुरूविण नाही कोणी रे, दत्त नाम हाची ध्यासरे.. या भक्तीगितांसह गवळण व भैरवी गाऊन गायक भक्तांना जवळपास साडेतास खिळवून ठेवले. टाळ्यांचा कडकडाट करून प्रेक्षकांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त दाद दिली. कडकडे यांना प्रकाशचंद्र वगळ, हार्मोनियम, रुपक वझे, तबला, दिनकर भगत पखवाज, उल्हास दळवी तालवाद्य, सहगायक किशोर देसाई, भजनसम्राट शिवकुमार मोहेकर यांनी साथसंगत दिली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, प्रभाकर चोराखळीकर, नरसिंह जोशी, अनंत व्यास, डी.व्ही. कुलकर्णी, एम.सी. कुलकर्णी, संतोष देवळकर, गायकवाड, चंद्रसेन पिसाळ, सिद्धेश्वर जोशी, धनंजय देशपांडे, संतोष बडवे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरखेडा येथे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१२ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे दि.१० डिसेंबर रोजी ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजन केले होते. गावातील गणेश विद्यालय तेरखेडा शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन सोहळा संपन्न झाले. तालुक्यातील अनेक शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. या सोहळ्याचे उद्घाटन धाराशिव जिल्हा शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे तसेच सोहळ्याचे अध्यक्ष तेरखेडा गट शिक्षण अधिकारी सोमनाथ घोलप यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच दिलीप घोलप, विस्तार अधिकारी कोल्हे, गणेश शाळेचे माजी सचिव बाप्पा पाटील, गणेश शाळेचे मुख्याध्यापक बोंदर, सर्व केंद्र प्रमुख, तालुक्यातील सर्व शाळेचे मुख्याध्यापक, ग्रामस्थ उपस्थित होते. प्रथम ग्रंथाचे पूजन करून संपूर्ण गावात ग्रंथदिंडी काढण्यात आली होती यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षक सहभागी झाले होते. नंतर शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये माध्यमिक गटातून २० व प्राथमिक गटातून ४१ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक विभागातून गणेश शाळेची विद्यार्थांनी आर्या घुले हिने प्रथम क्रमांक पटकावला, द्वितीय क्रमांक कन्या प्रशाला वाशीचा विद्यार्थी ओंकार उंदरे याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर तृतीय क्रमांक छत्रपती शिवाजी विद्यालयचे विद्यार्थी अजितकुमार तिकरे आणि कमळेश्वर विद्यालय पिंपळगाव शाळेचा विद्यार्थी आदित्य गव्हाने यांनी पटकावला. तसेच प्राथमिक विभागामधून प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थांनी जानवी रकटे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक अंकुरम विद्यामंदिर वाशीचा रणवीर कवडे याने पटकावला आहे. तर तृतीय क्रमांक गणेश विद्यालय तेरखेडा शाळेची विद्यार्थिनी अपूर्वा भालेकर उत्तेजनार्थ भराटे प्रसाद यांनी मिळवला आहे. माध्यमिक गटातून शिक्षकांच्या प्रयोगातून प्रथम क्रमांक कोकाटे आर.बी गणेश विद्यालय तेरखेडा यांनी मिळवला, द्वितीय क्रमांक संजय कावळे महात्मा बसवेश्वर विद्यालय दसमेगाव यांनी मिळवला. तर प्राथमिक शिक्षकांच्या प्रयोगातून प्रथम क्रमांक गोरे. पी.बी यांनी मिळवला आहे. द्वितीय क्रमांक सय्यदा फातिमा जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा वाशी यांनी पटकावला आहे. तर तृतीय क्रमांक शिंदे.एस.एफ. गणेश विद्यालय तेरखेडा यांनी मिळवला आहे. यावेळी सर्व यशस्वी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गट शिक्षण कार्यालय वाशी, गणेश विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचलन शिक्षक संतोष अवधूत यांनी केले.

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट नेमणे आहेत**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-२ (कमिशनवर)
तेर, ढोकी, अंबेजवळगे, कसबे तडवळे, पाडोळी (आ.), कनगरा, बेंबळी, पाटोदा, केशेगाव, वडगांव (सि.), पळसप, जागजी, पोहनेर, जुनोनी, कोंड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर शहर, तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, अपसिंगा, काक्रांबा, आरळी (बु.), किलज, चिकुंद्रा, जवळगा, वाणेगाव, वडगाव (देव), सलगरा, वागदरी, गुळहळ्ळी, निलेगाव, सिंदगाव, कुन्सावळी, सलगरा (दि.), होर्टी.

**लोहारा तालुका :** लोहारा शहर-तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, नागराळ, एकोंडी, सास्तुर, तावशीगड, सालेगाव, हराळी, जेवळी, आष्टा, भोसगा, अचलेर, फणेपुर.

**उमरगा तालुका :** शहर प्रतिनिधी, पेठसांगवी, नारंगवाडी, नाईचाकुर, समुद्राळ, बेटजगळगा, कलदेव (लिं), कोराळ, बलसुर, येणेगुर, दाळींब, सुंदरवाडी, आलुर, बेळंब, वरनाळवाडी, कदेर, औराद, खसगी, बेडगा, डिग्गी, मळगी, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, गुगळगाव, माडज, त्रिकोळी, एकूरगा, जेकेकुर, बेटजवळगा.

**कळंब तालुका :** शहर प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, मोहा, मस्सा, सापनाई, चोराखळी, माळकरंजा, निपाणी, पाडोळी (ना.), रायगव्हाण, रांजणी, शिरपूर (अ), शिराढोण, नागुलगाव, करंजकल्ला, लोहटा (पू), डिकसळ, इटकूर, बाहुला, खोदला, कन्हेरवाडी, तांदूळवाडी.

**वाशी तालुका :** तालुका प्रतिनिधी, पार्डी, कन्हेरी, सरमकुंडी, इझोरा, घाटनांदूर, चांदवड, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, फकाबादवाडी, जवळका, पारा, सेलू, पिंपळगाव (लिं), दसमेगाव, सोनारवाडी, मांडवा, सारोळा (मां), गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, ढगप्रिंप्री, आसू, कात्राबाद, सरणवाडी, हिंगणगाव (ब्रु), दहिटणा, खासापूरी, जवळा, जकेप्रिंप्री, सोनारी, रोसा, डोंजा, इनगोंदा, शेळगांव, चिंचपूर (बु), अनाळा, रोहकल, पांढरेवाडी, बावची, घारगाव.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, हाडोंग्री, वाकवड, सोनगिरी, सुकटा, देवळाली, माणकेश्वर, वांगी (ब्रु) अंतरगाव, चिंचपूर, वालवड, अंभी, अंतरवली, लांजेश्वर, निपाणी, ज्योतीबाची वाडी, ईराचीवाडी, पाथरूड, पाटसांगवी, अंतरगाव, चुंबळी, पखरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.१५ डिसेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा.

: कार्यालय पत्ता :
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा कार्यालय,
ॲड. मसलेकर यांचे निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
मो.नं. ९३७३४३८३५२ / ८४२१४८९७२०

## ▶▶क्राईम वृत्त...



### स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीदिनी उदगीर भाजपाच्या वतीने अभिवादन

**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत केंद्रीय मंत्री भारतीय जनता पक्षाचे नेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त आज उदगीर येथील शहर भाजपाच्या कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, माजी उपाध्यक्ष सुधीर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, रामचंद्र मुक्कावार, ॲड. दत्ताजी पाटील, आनंद बुंदे, रामेश्वर पवार, गणेश गायकवाड, रामेश्वर चांडेश्वरे, रमेश धावडे, संजय पाटील, मारोती कोटलवार, सुजित जीवने, व्यंकट काकरे, पिंटू श्रीनेवार, शिवगंगा बिरादार, शिवकर्णा अंधारे, यशवंत बारस्कर, सुनील गुडमेवार, अनिल मुदाळे, श्रीकांत पांढरे, संजय पाटील, संतोष बडगे, रवींद्र बेद्रे, विजय मामुलवार, प्रसाद पांढरे यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### अज्ञात व्यक्तीकडून टु व्हीलर गाडीची तोडफोड

**शिरूर अनंतपाळ, दि.१२ डिसेंबर -**

तालुक्यातील थेरगाव येथील ज्ञानोबा हंगरगे यांच्या स्वताच्या मालकीची त्यांच्या घरासमोर लावलेली होंडा



स्प्लेंडर कंपनीची (MH-२४/Q ५५१६) या क्रमांकाच्या मटारसायकलची अज्ञात व्यक्तीने नुकसान केले आहे. ज्ञानोबा हंगरगे गाढ झोपेत असताना मध्यरात्री एक ते दोनच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने दोन नवे टायर फाडून वायरी कापून गाडीचे अतोनात नुकसान केले आहे. अशा प्रकारा बरोबरच भुरट्या चोरांच्या प्रमाणात वाढ झाली असून याकडे ग्रामपंचायत कार्यालयाकडून मुख्य रस्त्यावरी सिसिटीव्ही चालू करून गल्लोगल्ली सिसिटीव्ही बसवून अशा घडत घटनेला आळा बसेल असे सहकार्य करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



### कै. राजेंद्र रेड्डी यांच्यावरील 'आधारवड' पुस्तकाचे प्रकाशन

**अहमदपूर, दि.१२ डिसेंबर -**

शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांचे वडील माजी सैनिक कै. राजेंद्र निवृत्तीराव रेड्डी यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्ताने हभप. कैलास महाराज लिंगधाळकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कै. राजेंद्र निवृत्तीराव रेड्डी यांच्या जिवनावर प्रकाश झोत टाकत त्यांच्यावर आधारित त्यांच्या पत्नी आशा राजेंद्र रेड्डी यांनी लिहिलेल्या 'आधारवड' या पुस्तकाचे प्रकाशन अहमदपूर उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थिती माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शैलेश उडगे, नरेंद्र रेड्डी, विजय रेड्डी, वीरेंद्र रेड्डी, भारत रेड्डी, जेष्ठ नेते सांबतात्या महाजन, कृषी सभापती मंचकराव पाटील, वेंकट करले, डॉ. गणेश कदम, उपजिल्हा प्रमुख बाळासाहेब डोंगरे, उदगीरचे तालुका प्रमुख चंद्रकांत टेंगेटोल यांची उपस्थिती होती. यावेळी अभय साळुंके, विधानसभा संघटक संतोष रोडगे, सुभाष गुंडीले, तालुका प्रमुख दत्ता हेंगणे, पद्माकर पेंढारकर, अनिकेत फुलारी, गणेश माने, लहू बारवाड, अंगद अरदवाड यांच्यासह आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

### पशुसंवर्धन प्रशिक्षणासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**औसा, दि.१२ डिसेंबर -**

ग्रामपंचायत कार्यालय उंबडगा, पशुसंवर्धन विभाग लातूर, कुक्कुट पालन प्रशिक्षण केंद्र मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवशीय पशुसंवर्धन शिबीराचे आयोजन



करण्यात आले आहे. पशुपालन व्यवसाय करु इच्छिणाऱ्या औसा तालुक्यातील शेतकरी, पशुपालक शेतकरी व महिला बचत गटातील महिलांनी नोंदणी करुन सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डा. योगेश सिंह बायस यांनी केले आहे. तालुक्यातील उंबडगा खुर्द येथे होणाऱ्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थीनीं प्रशिक्षण अर्जासोबत आधार कार्ड, शैक्षणिक दाखला, जातीचे प्रमाणपत्र, दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्र असेल तर व प्रशिक्षणाची शुल्क नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना येथे अर्जासह जमा करावी. तरी सर्व इच्छुक शिक्षणार्थीने या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. श्रीधर शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर आणि डॉ. योगेश सिंह, बायस पशुधन विकास अधिकारी तथा प्रशिक्षण समन्वयक कुक्कुट प्रशिक्षण केंद्र मुरुड यांनी केले आहे.

### लातूर जिल्ह्यात क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**लातूर, दि.१२ डिसेंबर -**

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्सहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षी दि.१२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यंदाही लातूर जिल्हा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## महायुतीतील राष्ट्रवादी, भाजपा औशात आमनेसामने...

# एकाचे 'भोंको' तर दुसऱ्याचे 'बिस्कुट' फेको आंदोलन; राज्यभर चर्चा



**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.१२ डिसेंबर -**

गेल्या अडीच वर्षापासून राज्यातील सत्तेत असलेल्या महायुतीतील राष्ट्रवादी काग्रेस व भारतीय जनता पार्टीचे औसा शहरातील नेतेमंडळी कधी खांद्याला खांदा लावून एकत्रित काम करतील आणि कधी एकमेकांविरुध्द दंड थोपटतील हे आता विज्ञानालाही सांगता येणे अशक्य दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीची शाई वाळण्याच्या आत अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी शहरातील समस्या पुढे करीत 'भोंको' आंदोलनाचा इशारा सोशल मिडियावरुन भाजपाला दिला. तर भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष किरण उटगे यांनी 'बिस्कुट फेंको' आंदोलनाचा इशारा देत सडेतोड उत्तर दिले आहे. मात्र या दोन्ही आंदोलनाची चर्चा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभरात होत असली तरी दोघांकडून आंदोलनाची तारीख अजून जाहिर करण्यात आली नाही. यामुळे आंदोलन होणार की 'सोशल मिडिया वार' ठरणार हे आजही गुलदस्त्यात आहे.

चार पाच महिन्यापुर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीपुर्वी आ. अभिमन्यू पवार यांनी औसा शहराच्या विकासासाठी जवळपास ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे शहरातील सर्व समाज बांधवांच्या वतीने आ. अभिमन्यू पवार यांचा भव्य सत्कार गांधी चौकात करण्यात आला. यावेळी शहरात लावण्यात आलेल्या विकासकामांच्या बॅनरवरील निधीवरुन एकमेकांना आव्हान देत उंट आणि सवारीची चर्चा सोशल मिडियावरुन पहावयास मिळाली. लोकसभा निवडणुकीपुर्वी आ. पवार यांनी पुढाकार घेत समेट घडवून आणला. आणि एकमेकांच्या खांद्याला खांदा देऊन लोकसभेची निवडणुक लढविली. कांही दिवसातच शहरातील पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनवरुन कुरबुरी झाल्या.यानंतर पुन्हा विधानसभा निवडणुकीला राष्ट्रवादी व भाजपा एकत्रित सामोरे गेले. या निवडणुकीत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांच्या मोजक्या सहभागामुळे अनेक चर्चाही झाल्या. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी झालेल्या आमदार व नेतेमंडळींचा सरकार बनविण्याचा कार्यक्रम सुरु असतानाच औसा शहरातील नागरी समस्या सोडविण्यास मित्रपक्षातील आ. अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखाली पालिका प्रशासनाला अपयश आले असल्याचा ठपका ठेवून 'भाजपा हटाव, औसा शहर बचाव'चा नारा जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी दिला. याचबरोबर शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा, पाणी समस्या सोडवा, मुदत संपलेल्या स्वच्छता व्यवस्थापनाचे कंत्राट रद्द करा, पथदिवे सुरु करा, चारपट केलेली करवाढ रद्द करा, जुन्या बसस्थानकाचा विकास करुन सर्व बस जुन्याच बसस्थानकातून मार्गस्थ करा, शहरातील औद्योगिक वसाहतीचा विस्तार करा, कागदपत्रासाठी पालिकेत होणारा भष्ट्राचार थांबवा, तिसऱ्या टप्प्यातील रस्ता, मुक्तेश्वर रस्ता व नागमोडी गटार कामाची चौकशी करा व कागदावर मंजुर असलेल्या कामांचा निधी दाखवून जनतेला वेड्यात काढणे बंद करा, अशी मागणी करीत भोंको आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी सोशल मिडियातून दिला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या भोंको आंदोलनाची शहरात चर्चा सुरु असतानाच भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष, माजी नगराध्यक्ष किरण उटगे यांनी भुंकणाऱ्या 'कुत्र्यांना हाड... हाड...'च्या आवाजातील बिस्कुट फेंकोचे बनर सोशल मिडियावर झळकावून राष्ट्रवादीला सणसणीत उत्तर दिले. या दोन्ही आंदोलनाची कांही तासातच औसा शहर व जिल्ह्यातून तर दुसऱ्या दिवशी राज्यभरातून औशातील 'भोंको' व 'बिस्कुट फेंको' आंदोलनाची चर्चा होत आहे. राज्यातील सत्तेच्या विस्तारात राजकीय मंडळी आणि पक्षीय नेतेंमंडळी अडकली असताना




महायुतील मित्रपक्षातील राष्ट्रवादीने भाजपाच्या विरोधात औशात दंड थोपटले आहे. तर भाजपाने जशास तसे उत्तर दिले आहे.

राज्यातील सत्तेत महायुतीत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने मित्रपक्ष असलेल्या भाजपाला सहा महिन्यात दोनदा खुले आव्हान दिले आहे. या आव्हानाला भाजपाने दिलेल्या खरमरीत उत्तरामुळे भाजपा व राष्ट्रवादी आगामी होणाऱ्या औसा नगरपालिकेच्या निवडणुकीत वेगळी चुल मांडणार असल्याचा तर्क आता जाणकारांतून निघत आहे. यामुळे पुन्हा एकदा तिरंगी लढत करुन फायदा उचलण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी करणार असल्याची चर्चा चांगलीच रंगत आहे.

## उदगीर येथे लेखिका साहित्य संमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**

आम्ही सिद्ध लेखिका, लातूर जिल्हा व साहित्यिक सखी समूह, उदगीर या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर येथे एक दिवसीय लेखिका साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. लेखिका साहित्य संमेलनाचे उद्घाटन स्नेहलता झरकर अंदुरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. रेखा ढगे, डॉ. सुलभा देशमुख कमल नलावडे, शिक्षक नेते गोविंद निटूरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक मराठवाडा विभाग प्रमुख अश्विनी निवर्गी यांनी केले.

सरस्वतीच्या तसेच शांताबाई शेळके यांच्या प्रतिमांचे पूजन करून व संत ज्ञानेश्वर यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संमेलन गीत प्रीती दुरूगकर यांनी सादर केले. उदघाटक स्नेहलता झरकर अंदुरे व डॉ. रेखा ढगे संस्थेअंतर्गत चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. सुलभा देशमुखांनी अक्षरवेल समूहाबद्दल माहिती दिली तर कमल नलावडे यांनी अध्यक्षीय समारोपात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जरी मिळाला असला तरी ती भाषा टिकावी यासाठी आपण सर्वांनी कोणते प्रयत्न केले पाहिजेत याविषयी सविस्तर विवेचन केले. शिक्षक नेते गोविंद निटुरे आपल्या भाषणात वाचनाचे महत्त्व सांगितले व पुढेही अशा पद्धतीचे कार्यक्रम घेण्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन अर्चना नळगीरकर यांनी केले. त्यानंतर सुनीता गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कथाकथन सत्रात अंबिका पारसेवार मंजुषा कुलकर्णी, सुनंदा सरदार, अश्विनी निवर्गी, प्रीती दुरूगकर, जयश्री तेरकर, नीता मोरे, सोनाली दीक्षित यांनी आपल्या कथा सादर केल्या. सूत्रसंचालन अनुराधा धोंड व राचम्मा मळभागे यांनी केले. शेवटच्या सत्रात प्रा. विद्या देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुण्या अपर्णा चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत कमल नलावडे, डॉ. सुलभा देशमुख, डॉ. रेखा ढगे, स्नेहलता झरकर अंदुरे, शिवनंदा माळी, मीना महामुनी, अश्विनी धाट, सारिका उमरकर, सारिका देशमुख, अर्चना गोरे, योगिता सुरवसे, जयश्री फुटाणे अर्चना नळगीरकर, ज्योती डोळे, मैना साबणे, अश्विनी देशमुख, मंजिरी चाकूरकर, वर्षा राठोड, रंजना जोशी, अनिता संकाये यांनी आपल्या कविता गझल सादर केल्या.

## माणसांच्या हृदयात जो जागा करतो तो गोपीनाथ मुंडे सारखा लोकनेता होतो : प्रा. सुरेखा दहिफळे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**



समाजकारण आणि राजकारण यांचे उत्तम संघटन कौशल्य गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वात होते. माणसांच्या हृदयात जो जागा करतो तो गोपीनाथ मुंडे सारखा लोकनेता होतो, असे मत राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेखा दहिफळे यांनी व्यक्त केले. ते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त बोलत होते. वाढवणा येथील श्री. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय व राजे संभाजी माध्यमिक विद्यालयात स्व. गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मुंजेवार वाय.के. उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अनिल मगर यांनी केले. या जयंती निमित्त केंद्र स्थरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकावलेल्या सय्यद रुबिना व अत्तार सानिया यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रामदास केदार यांनी केले. या जयंती सोहळ्यास प्रा. विष्णू केंद्रे, प्रा. मनोज मुळे, प्रा. माधव इंद्राळे, प्रा. रहिम पठाण, स्मिता हाळणे, सहशिक्षक नारायण रोंगे, मच्छिंद्र गडीकर, नरसिंग कांबळे, गोपिनाथ नागरगोजे, शंकर केंद्रे उपस्थित होते.

## उदगीर डेअरी पुनर्निर्माणसाठी सरसावले खासदार डॉ. शिवाजी काळगे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**

दिल्ली येथे भारत सरकारचे पंचायत राज्यमंत्री व मत्स्यपालन, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राजीव रंजन सिंह यांची भेट लातूरचे खा.डॉ. शिवाजी काळगे यांनी भेट घेतली. या भेटीदरम्यान लोकसभेत शून्य आवर दरम्यान उपस्थित केलेल्या उदगीर डेअरी प्रकल्पाचा पुनर्विकास करण्याबाबतच्या मुद्यावर चर्चा करून पाठपुरावा केला. प्रकल्पाच्या अडचणी, विकासासाठी आवश्यक उपाययोजना आणि त्याची महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी दुग्धविकास विकास मंत्री यांनी सविस्तर माहिती दिली. संबंधित माहिती महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांकडे सादर करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

## लालबहादूर शास्त्री प्राथमिक शाळेत गीता जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयमध्ये, मार्गशीर्ष शुक्ल मोक्षदा एकादशी हा भागवत गीतेच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे तर, प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रचारक कौशलजी महामुनी, विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व सुरेखाबाई कुलकर्णी उपस्थित होते.

प्रमुख अतिथी व व्यासपीठावरील मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून राजमाता अहिल्यादेवी होळकर व श्रीमद् भगवद्गीता ग्रंथास वंदन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविकामध्ये ज्येष्ठ शिक्षिका सुरेखा कुलकर्णी यांनी गीतेचा संस्कार मनावर झाल्यावर राष्ट्रभक्त पिढी तयार होईल, तसेच जागतिक स्तरावर गीता जयंती साजरी करण्यात येते. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या मनातील संभ्रम गीतेच्या माध्यमातून दूर केला, असे सांगितले.

भगवद्गीतेतील पंधराव्या अध्यायाचे सामुहिक पठण विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. इयत्ता तिसरी ते चौथीच्या एकूण ४७५ विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये अतिशय सुरेल आवाजात एकाच वेळी गीतेचा पंधरावा अध्याय म्हणून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुणे कौशलजी महामुनी यांनी गीतेचे महत्व सांगून,आपल्या संस्कार केंद्रातील विद्यार्थी हे संस्कारक्षम आहेत, असे विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# वातावरणाच्या बदलामुळे तुरीचा झाला खराटा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ डिसेंबर -**

तालुक्यातील शेतशिवारात अनेक शेतकऱ्यांच्या तुर पिकावर अस्मानी संकट अचानक वातावरणात बदल झाल्यामुळे तुरीचा खराटा झालेला दिसुन येतो आहे.

तालुक्यातील थेरगाव, हिप्पळगाव, गणेशवाडी, कांबळगा, रापका, आरी, लक्कडजवळगा, शिवपुर, भिंगोली, तळेगाव बोरी, कळमगाव, उमरदरासह तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले तुरीचे पीक या ढगाळ वातावरणामुळे गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित असलेल्या तुर पिकाच्या उत्पन्नाच्या अपेक्षा मावळल्या आहेत. दाट धुक्यामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे तुर तसेच रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा या पिकांवर करपा रोग पडला आहे. त्यामुळे रब्बी पिकांचे नुकसान होत असल्याचे



निदर्शनास येत आहे. त्यामुळे शेतकरी राजा पुर्णतः हवालदिल झाला आहे. अचानक झालेल्या वातावरणाच्या बदलामुळे ढगाळ वातावरणामुळे व धुक्यामुळे करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे तसेच जमिनीतील ओलावा यामुळे तुरीची फुलझड होवून झाडे वाळून गेली आहेत. त्यामुळे तुरीचा अक्षरशः खराटा झालेला दिसुन येतो आहे. गेल्यावर्षी बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे तुर पिकाच्या उत्पन्नाच्या प्रमाणात घट झाली होती.

गेलेली तुर आणि आलेली रब्बी याची तुलना करीत शेतकरी राजाच्या उत्पन्नाच्या अपेक्षा पुर्णतः तुरीवर अवलंबून असतात. परंतु वातावरणाने दिला झोला अन् शेतकरी झाला गोळा असं शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. तुरीचे पिक जाग्यावर वाळत असल्यामुळे परिणामी काढणीचा खर्च सुद्धा निघेल कि नाही याची भिती निर्माण झाली आहे.शेतकऱ्यांवर एका पाठोपाठ एक अशी अस्मानी संकट उभे राहत आहेत. खरीप हंगामातील सोयाबीन काढणीच्या वेळेस सतत चालू असलेल्या रिमझिम पावसामुळे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न तुरीचे मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु हातातोंडाशी आलेली तुर वातावरणात बदल झाल्यामुळे शेतकऱ्यांना अर्थीक संकटांना सामोरे जावे लागणार आहे.

त्यामुळे महसूल विभागामार्फत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे यांनी 'तरुण भारत'शी बोलताना म्हणाले.

## माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ डिसेंबर -**

भारताचे माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या ८५ वा वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.संभाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश सचिव महादेव आवाळे, शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे व जिल्हा सरचिटणीस प्रमोद धुमाळे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

यावेळी शिरूर अनंतपाळ शहरातील जिल्हा परिषदेच्या कन्या शाळा, मुलांची शाळा व समतानगर येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन साजरा करण्यात आला.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, जिल्हा उपाध्यक्ष मोहनराव भोसले, बाबुराव बिराजदार, जिल्हा सरचिटणीस प्रमोद धुमाळे, बाबुराव सुरवसे, शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे, इमाम शेख मिस्त्री, विश्वनाथ हांद्राळे, मुकेश गायकवाड, अमिन मुजेवार, गुरुनाथ अचवले, मैनोदिन्न मुजेवार आदी पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि** **दि. १८/१२/२०२४**
**अर्जदार :- श्री. शेख फयाज उम्मान**
**विरूध्द**
**गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर**
**अर्ज कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात श्री/श्रीमती शेख फयाज उम्मान रा. चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुलगा **कु. शेख बिलाल फयाजसाब जन्म दि. १६/०६/१९९५** झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. १२/१२/ २०२४**
**पुढील तारीख १५/०१/२०२५**

**आदेशावरून /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# उमेद बचतगटांच्या तीन उत्पादनांची होणार विक्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात ग्रामीण भागात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंतर्गत बचतगटाच्या माध्यमातून विविध प्रकारचे उत्पादने तयार केली जात आहेत. यापैकी तीन बचतगटांच्या उत्पादनांची विक्री आता विमानतळावरील स्टॉलद्वारे होणार आहे. त्यामुळे देश-विदेशातील प्रवाशांपर्यंत लातूरची उत्पादने पोहोचणार आहेत. हिरकणी लातूर या नावाने उत्पादनांची विक्री होईल.

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण भागातील बचतगटांच्या उत्पादनांना विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळावी, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमांतून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमांचा भाग म्हणून राज्यातील उमेद अभियानातील निवडक बचतगटांच्या उत्कृष्ठ उत्पादनांचे स्टॉल विमानतळावर प्रायोगिक तत्वावर लावण्याबाबत राज्य स्तरावरून उमेद अभियान व भारतीय विमान वाहतूक प्राधिकरण यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पारंपारिक गोधडी, मध तसेच लाकडी खेळणी तयार करणाऱ्या बचतगटांच्या उत्पादनांची नागपूर विमानतळावर स्टॉलद्वारे विक्रीसाठी निवड करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यातील उमेद बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांनी खुल्या बाजारपेठेत स्पर्धा करावी, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये पॅकेजिंग, ब्रॅण्डिंगचे प्रशिक्षण, हिरकणीचे प्रदर्शने आयोजित करण्यात येत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीतील घटनेच्या निषेधार्थ लातूर बाजार समिती कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** परभणी येथील संविधान शिल्पाचा अवमान केल्याबद्दल बुधवारी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत माथाडी कामगार संघटनांच्या वतीने बाजार समिती बंद ठेवण्यात आली. यावेळी माथाडी कामगार संघटनेच्यावतीने बाजार समिती परिसरातून निषेध रॅली काढून घडलेल्या प्रकाराचा निषेध करण्यात आला. परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची एका माथेफिरूने नासधूस करून विटंबना केली आहे. त्या माथेफिरूला तेथील नागरिकांनी चांगलाच चोप दिला आहे. त्याच्यावर कठोर कारवाई करावी, देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी येथील बाजार समितीतील माथाडी कामगारांच्या वतीने बाजार समिती परिसरातून निषेध रॅली काढण्यात आली. यावेळी असे कृत्य करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध करण्यात आला. यावेळी माथाडी कामगार संघटनेचे पदाधिकारी माणिक पाडोळे, लखन साबळे, सिद्धांत गायकवाड, भरत कांबळे, बालाजी जाधव, सचिन मुंडे, साधू गायकवाड, कसबे, उत्तम सोनवणे, लह लोहबंदे, अमोल ढालमरे, अमोल ढालमरे यांच्यासह शेकडो हमाल-मापाडी बांधव सहभागी झाले होते.

### श्री केशवराज विद्यालयात सामूहिक गीता पठण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात गीता जयंतीनिमित्त बुधवारी इयत्ता ८ वी ते १० वी विभागातील एकूण १९५० विद्यार्थ्यांनी १२व्या, १५व्या आणि १६व्या अध्यायाचे पठण केले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. दिलीप देशपांडे यांनी गीता जयंतीचा उत्सव सर्वसमाजासाठी उत्साहवर्धक असल्याचे व श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ सर्व जगामध्ये सर्वश्रेष्ठ आदर्श ग्रंथ म्हणून प्रसिद्ध असून गीतेवर श्रद्धा ठेवणाऱ्यांचा विजय निश्चित असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रिय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, डॉ. दिलीप देशपांडे, जनकल्याण निवासी विद्यालय प्रकल्प समिती उपाध्यक्षा प्रा. डॉ. लीला कर्वा, मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, परिचय, स्वागत व सूत्रसंचालन विष्णू इरळे यांनी केले. आभार श्रीमती शैला कुलकर्णी यांनी मानले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. पर्यवेक्षक बबन गायकवाड, राजश्री कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख प्रल्हाद माले, कार्यक्रम प्रमुख संतोष बिडकर व व्यवस्थेतील सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले.

### अपघातातील जखमींची भाजपाचे ऋषिकेश कराड यांच्याकडून विचारपूस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** अंबाजोगाई शहरापासून जवळच वाघाळा पाटीजवळ मंगळवारी झालेल्या कार आणि ट्रकच्या भीषण अपघातातील रेणापूर तालुक्यातील कारेपूर येथील जखमी दोघा रुग्णांची भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांनी



लातूर येथील रुग्णालयात जाऊन अस्थेवाईकपणे चौकशी केली व दिलासा दिला. अंबाजोगाई कारखाना नजीक वाघाळा पाटीजवळ कारचा आणि ट्रकचा भीषण अपघात झाला या अपघातात रेणापूर तालुक्यातील मौजे कारेपूर येथील बालाजी माने, दिपक सावरे, कृतवीक गायकवाड, फारुक शेख या चौघांचे दुर्दैवी निधन झाले तर शेख मुबारक आणि शेख अजीम या दोघांना अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी लातूर येथील पोद्दार हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव युवा नेते ऋषिकेश कराड यांनी बुधवारी हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमी शेख मुबारक आणि शेख अजीम या दोघा रुग्णांची भेट घेवून घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली व दिलासा दिला. त्याचबरोबर उपचार करणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी जखमी रुग्णांचे नातेवाईक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले, भाऊसाहेब गुळबिले उपस्थित होते.

# 'अभाविप'च्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** दि.२ ते ४ जानेवारी दरम्यान लातूर येथे अभाविप देवागिरी प्रांताच्या ५९ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात करण्यात आले असून स्वागत समितीची घोषणा देवागिरी प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ.सचिन कंदले यांनी केली.स्वागत समितीच्या अध्यक्षपदी उद्योजक प्रमोद मुंदडा यांची निवड करण्यात आल्याची घोषणा यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.




यावेळी महानगर अध्यक्ष प्रा.डॉ. प्रसाद कदम व महानगर मंत्री तेजुमई राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.डॉ.सचिन कंदले यांनी सांगितले की, स्वागत समितीमध्ये कार्याध्यक्षपदी प्रा. शिवराज मोटेगावकर,सचिव म्हणून सुनिल देशपांडे,उपाध्यक्षपदी जगदीश कुलकर्णी व जगदीश स्वामी यांची निवड करण्यात आली आहे.

समितीमध्ये सहसचिवपदी प्रविण कस्तुरे व प्रविण सावंत तर कोषाध्यक्ष म्हणून परमेश्वर हासबे यांचा समावेश करण्यात आला आहे. स्वागत समितीमध्ये मार्गदर्शक म्हणून लक्ष्मीनारायण लाहोटी,बी.बी. ठोंबरे, आ.संभाजीराव पाटील निलंगेकर,आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशअप्पा कराड, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, सदस्य म्हुणन बसवराज धाराशिवे,नरेंद्र काळे, जयप्रकाश दगडे, एम.आर. पाटील, अंगदराव तांदळे, उमाकांत होनराव, अजित पाटील कव्हेकर, माधवराव पाटील, अनुप देवणीकर, भूषण दाते, उदय पाटील, विश्वास लातूरकर, डॉ.विश्वास कुलकर्णी, डॉ. कल्याण बरमदे यांचा समावेश आहे.

लातूर येथे दिनांक २ ते ४ जानेवारी दरम्यान होणाऱ्या देवगिरी प्रांताच्या प्रदेश अधिवेशनाचे उद्घाटन दिनांक २ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. शहरातील दिवाणजी मंगल कार्यालय येथे हे अधिवेशन होत असून त्यासाठी प्रांतातील ९०० विद्यार्थी व विद्यार्थिनी, १०० पूर्व कार्यकर्ते व व्यवस्थेतील २०० कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

अधिवेशनापूर्वी दि.१ जानेवारी रोजी ध्वजारोहण होणार असून प्रदर्शनी कक्षाचे उद्घाटनही होणार आहे. अधिवेशनादरम्यान दुसऱ्या दिवशी दिवाणजी मंगल कार्यालयापासून शोभायात्रा काढली जाणार असून गंजगोलाईमध्ये या शोभायात्रेचा समारोप होणार आहे,अशी माहितीही प्रदेशाध्यक्ष डॉ.सचिन कंदले यांनी दिली.

या पत्रकार परिषदेस स्वागत समिती पदाधिकाऱ्यांसह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विभागीय क्रिकेट स्पर्धेत 'बिडवे'चा संघ उपविजेता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** नुकत्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या सोलापूर विभागातील आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेत एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले आहे. या संघाचे नेतृत्व अनिकेत कैले याने केले. तसेच सुमित चित्ताडे, नवनाथ कोलपुके, सोहेब सय्यद, शरीफ मणियार, शफी मणियार, भिष्णु गुप्ता, शाहीद शेख, स्वप्नील हापसे, स्वप्नील रत्नपारखे, कुणाल गावीत, अभय भोसले, सागर मोरे, शिवहर पाटील, लिंगप्पा नागरे आणि विश्वनाथ पांचाळ यांनी संघभावना जोपासत यशस्वीपणे साथ दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बस्वराज एरटे, काशिनाथ साखरे, ललिताताई पांढरे, महेश हलगे, प्रभूआप्पा पटणे, बाबुराव तरगुडे, गुरुलिंग धाराशिवे आदिंनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# दिवाळीमधील एस.टी.च्या जादा फेऱ्यातून लातूर विभागाला २ कोटी रुपयांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** लातूर एसटीच्या लातूर विभागाने २५ ऑक्टोबर, २०२४ ते १५ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत लातूर विभागातील लातूर, उदगीर, अहमदपूर, निलंगा व औसा बसस्थानकातून पुणे, सोलापूर, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, परांडा, माजलगाव या मार्गावर जादा फेऱ्या चालविण्यात आल्या. या माध्यमातून जास्तीत जास्त प्रवाशी चढ-उतार प्रवाशांना सुरक्षित सेवा दिली आहे. एस. टी. च्या लातूर विभागाला २ कोटी ४२ हजार ५०० रुपयांचे उत्पन्न मिळाले .

यामध्ये लातूर आगाराने दिवाळी कालावधीत ३५४ जादा फेऱ्या व ८२ हजार २३१ कि.मी. चालवून ४० लाख ४२ हजार ९३० एवढे सवलतीसह उत्पन्न मिळवले आहे. उदगीर आगाराने ४४३ जादा फेऱ्यामधून ६१ लाख ३८ हजार २९० रुपये उत्पन्न मिळवले आहे. अहमदपूर आगाराने १०२ जादा फेऱ्यामधून १९ लाख ३ हजार ३४८ रुपये एवढे सवलती सह उत्पन्न मिळवले आहे. निलंगा आगाराने १३४ जादा फेऱ्यामधून ३७ लाख ३७ हजार ९१४ रुपये, औसा आगाराने २७४ जादा फेऱ्यामधून ४२ लाख २० हजार १८ उत्पन्न याप्रमाणे लातूर विभागाने दिवाळी कालावधीत १ हजार ३३७ जादा फेऱ्यामधून २ कोटी ४२ हजार ५०० रुपये (सवलतीसह) उत्पन्न मिळविले आहे.

नोव्हेंबर या महिन्यात विभागाने ३४ कोटी ५१ लाख ८५ हजार एवढे (सवलतीसह) उत्पन्न मिळविले आहे. यामध्ये लातूर आगाराने ९६ लाख ५८ हजार रुपये , उदगीर आगाराने ८ कोटी १९ लाख २४ हजार रुपये , अहमदपूर आगाराने ६ कोटी १० लाख २८ हजार रुपये , निलंगा आगाराने ५ कोटींचे उत्पन्न मिळविले आहे.

# सर्व शाळांमध्ये दोन दिवसांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** बदलापूर प्रकरणानंतर जाग्या झालेल्या शाळांच्या परिसरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. राज्यातील प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे, तक्रार पेटी, सुरक्षा समिती गठीत करण्याच्या सूचना मागेच शिक्षणाधिकाऱ्यांनी देऊन लातूर जिल्ह्यातील काही शाळांनी त्यावर कार्यवाही केली नसल्याचे उघड झाल्याने शिक्षण विभागाने मंगळवारी पुन्हा आदेश काढून दोन दिवसांत सर्व शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे ठणकावून सांगितले आहे.

विद्यार्थी सुरक्षेबाबत शाळा फारशा संवेदनशील दिसत नाहीत. त्यामुळे बदलापूरसारख्या घटना घडतात, हे स्पष्ट झाले. आता तरी काळजी घ्यावी, अशा सूचना शिक्षण विभागाने शाळांना दिल्या. मात्र, बऱ्याच शाळांनी त्यावर कार्यवाही केली नसल्याचे उघड झाले असून, हा प्रकार गंभीर असल्याची भूमिका प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभागांनी शालेय परिवहन समिती बैठकीत बोलून दाखवली.

या बैठकीतच विद्यार्थी सुरक्षेबाबत शाळेत तक्रार पेटी, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच विद्यार्थी सुरक्षा समिती गठीत केली की नाही, यावर शंका उपस्थित करण्यात आली. यासंदर्भात मुख्याध्यापकांनी दक्षता घेण्याची गरज आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्यास्तरावरून शाळांच्या मुख्याध्यापकांना उपरोक्त बाबी पूर्ण करण्यासंबंधी बजावावे, असे बैठकीत सांगण्यात आले. याउपर, लातूर जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही दोन दिवसांत करावी, यावर भर देण्यात आला.

ज्या शाळा कार्यवाही करणार नाहीत, त्यांच्यावर काय कारवाई करणार? याबद्दल मात्र बैठकीत कोणत्या गोष्टींचा उल्लेख झाला नाही. शाळांना कठोर निर्बंध लावल्याशिवाय किंवा कारवाईचा बडगा उगारण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे याबाबतीत शिक्षण विभागाला कठोर व्हावे लागणार आहे.

# खडी, मुरुमाच्या वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** गौणखनीजची रॉयल्टी न भरल्याप्रकरणी लातूर तहसीलच्या महसूल पथकाच्यावतीने खडी, मुरुम, दगड व विटा अशा साहित्यांची वाहतूक करणाऱ्या आठ ते दहा वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

मागील काही दिवसांपासून लातूर शहरात गौणखनीजची रॉयल्टी न भरताच मोठ्या प्रमाणात खडी, दगड व मुरुमाची विक्री केली जात होती. त्यामुळे लातूर तहसीलच्या महसूल पथकाने शहरातील छत्रपती संभाजीमहाराज चौकात आणि बार्शी रोड या भागात १ ते १० डिसेंबर या कालावधीत आठ ते दहा वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून, याबाबतचा दंड आकारणीचा प्रस्ताव तहसील कार्यालयाने उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे. तहसीलच्या या कारवाई मुळे अवैधरित्या दगड, मुरुम व खडीची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांचे धाबे दणाणले आहेत. परंतु लातूर तहसीलच्या पथकाकडून मोठ्या धेंडांना सोडून लहान वाहनधारकांवर कारवाई केली जात असल्याची चर्चाही वाहनधारकांत आहे. लातूर जिल्ह्यात गंगाखेड आणि बिलोली येथून मोठ्या प्रमाणात येजगी वाळूची तस्करी करुन आणली जाते. ती लातूर शहरासह परिसरात मोठ्या प्रमाणात विकली जाते. त्यामुळे महसुल विभागाने कारवाई केली.

# दोन मोबाइल नेले; चालकाविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** एका ऑटोचालकाला चार्जिंगसाठी दिलेले दोन मोबाइल परत न देता निघून गेल्याची घटना लातुरात घडली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी ऋषिकेश श्रीधर आंधळे (वय २५, रा. बसवेश्वरनगर, अंबाजोगाई, जि. बीड) यांनी त्यांचे दोन मोबाइल (किंमत ३० हजार रुपये) हे चार्जिंग करण्यासाठी अज्ञात ऑटोचालकाकडे दिले होते. दरम्यान, त्याने हे मोबाइल परत न देता तो निघून गेला. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल मुळे करीत असल्याची माहिती ठाण्यात देण्यात आली आहे.

# श्री दत्त जयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम

## लातुरात गुरुचरित्र पारायण : कीर्तन सोहळा सुरु

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** शहरातील औसा रोड येथील श्री सदानंद दत्त मठात मंदिर समितीच्या वतीने यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे, कीर्तन सोहळ्याबरोबर संगीत दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. १७ डिसेंबरपर्यंत दत्त मंदिर येथे हे कार्यक्रम होत असून भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सदानंद दत्त मठ विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

१० डिसेंबरपासून श्री दत्त जयंती महोत्सवाला प्रारंभ झाला आहे. धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने लातूरसह धाराशिव, बीदर, बसवकल्याण येथून भाविक दर्शनाला येतात. दररोज पहाटे काकडा आरती, भूपाळी, रुद्राभिषेक, पूजा आरती, सकाळी सामूहिक श्री गुरुचरित्र ज्ञानेश्वरी पारायण, संत चरित्र गायन, दुपारी महानवैद्य व आरती, महिला मंडळाचे भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री प्रदोष आरती व प्रार्थना, तसेच सायंकाळी ५ वाजता शास्त्रीय गायन वादन, त्यानंतर महाप्रसाद आणि रात्री ८:३० वा. भजन, कीर्तन, प्रवचन होत आहे. १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य प्रदक्षिणा व मिरवणूक होईल. १४ डिसेंबर रोजी मार्गशीर्ष पौर्णिमा सूर्यास्तवेळी श्रीमत् योग योगेश्वर गुरुदेव दत्तात्रय जन्मकाळ सोहळा, सायंकाळी ५ वाजता आंदोलिका (पाळणा) पूजन, मंगल आरती तर दुपारी १२ ते रात्री १०:३० वाजेपर्यंत श्री दत्त जयंतीनिमित्ताने महाप्रसाद होईल. कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शहारातील श्री सदानंद दत्त मठ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अभिनव अध्यापक महाविद्यालयाच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२४ बी. एड. च्या परीक्षेमध्ये मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट लातूर द्वारा संचलित लातूर येथील अभिनव अध्यापक महाविद्यालयातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते बुधवारी आशियाना निवासस्थानी नुकताच करण्यात आला.



यावेळी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी सुबोध सर्वोत्तम गांदळे हे ९१.९२ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वप्रथम तर संगीता भगवान पवार या ९१.३६ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वद्वितीय तसेच महानंदा रामू पांचाळ यास ९०.६४ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वतृतीय उत्तीर्ण झालेले असून महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.१६ टक्के इतका लागलेला असून गेली १५ वर्षापासून गुणवत्तेची परंपरा महाविद्यालयाने कायम ठेवून घवघवीत यशाचा आलेख कायम ठेवलेला आहे .

याप्रसंगी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर कुलकर्णी, प्रा. उमेश सुर्यवंशी, संगीता पवार, महानंदा पांचाळ व सुबोध मांदळे यावेळी उपस्थित होते यावेळी मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या .

### महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा टिकवली

मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशाची परंपरा कायम राहिली असून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात अशी परंपरा टीकवणारे अभिनव अध्यापक महाविद्यालय पहिले आहे अशी माहिती मांजरा ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी डॉ. अजय पाटील यांनी दिली.

# विकास कामांचा शंभर टक्के निधी खर्च करा : सागर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ डिसेंबर-** राज्य शासन स्तरावरील योजना खर्चाबाबत सद्य:स्थितीचा आढावा घेऊन उद्दिष्टाप्रमाणे विकास कामे पूर्ण करावित तसेच योजना व विकास कामांवर शंभर टक्के निधी खर्च करण्याचे निर्देश लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी जिल्हा परिषदेचे खाते प्रमुख, बीडीओंच्या उपस्थितीत आयोजिलेल्या आढावा बैठकीत दिले.

### बीडीओंची साप्ताहिक आढावा बैठक

लातूर जिल्ह्यातील सर्व दहा पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांनी (बीडीओ) त्यांच्या अधिनस्त तालुकास्तरीय खातेप्रमुखांची नियमित साप्ताहिक आढावा बैठक आयोजित करून दिलेल्या उद्दिष्टांप्रमाणे विकासकामे पूर्ण करून शंभर टक्के निधी खर्च करण्याची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी सागर यांनी केली. बीडीओंनी वारंवार आढावा घेतला तरच कामांना वेग येईल आणि ती वेळेत पूर्ण होतील. निधी शिल्लक राहिला तर त्याचे बालंट जि. प. वर येईल, याकडे त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागांतर्गत सेवानिवृत्त व कुटुंबनिवृत्ती वेतन प्रकरणे रखडली आहेत. सेवानिवृत्तांची माहिती संगणकीय प्रणालीत भरली जात नाही. सेवेत नव्याने रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करावे, यावर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना सागर यांनी दिल्या. तालुकास्तरावर ई - ऑफिसची अंमलबजावणीसाठी दिलेल्या नमुन्यात माहिती सादर होत नाही. पंचायत विभागांतर्गत राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान, ग्रामपंचायत लेखाशक पूर्तता, १५वा वित्त आयोग तसेच जन सुविधा, नागरी सुविधांतील मंजूर कामाचा व त्यावर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन अपूर्ण कामे कधी पूर्ण करणार, असा सवाल उपस्थित केला. समाजकल्याण विभागांतर्गत दलित वस्ती सुधार योजना, पं. स. स्तर व ग्रामपंचायत स्तरावर पाच टक्के दिव्यांगांवर खर्च केला जातो का? असा प्रश्न करून नरेगाची सुरू असलेली कामे पूर्ण होत नाहीत. याची विभाग प्रमुखांनी कारणे शोधावित. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे अंतर्गत सर्व घरकूल योजनेची हल्लीची परिस्थिती काय आहे, जे जाणून बरीच कामे राहिलेली आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशनची कामे मुदतीत पूर्ण करावित.



स्वच्छ भारत मिशनकडील घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन, सामूहिक शौचालयाची स्थिती पाहून कार्यवाही होतेय का? ते पाहा. महिला व बाल कल्याण विभागांतर्गत कार्यान्वित मवन स्टॉप सोल्यूशन सेंटर फॉर वुमन अॅण्ड चिल्ड्रनफ या नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे अंगणवाडीच्या ठिकाणी बालकांना, महिलांना विविध आरोग्यविषयक तपासण्या, विविध योजनांचा लाभ, बालकांची ऑटिझम तपासणी वेळापत्रकाप्रमाणे करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सूचित केले.